# नवभारत

वर्ष २१ वे ] मे १९६८ [ अंक ८



वार्षिक वर्गणी ९ रु. ] [ किरकोळ अंक १ रु.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत



मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

नवभारत
७५
अमृतमहोत्सवी
वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
**राज्य मराठी विकास संस्था**
**एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,**
**धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६**
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.**

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.**

अनुक्रमणिका

प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, यांचे मासिक

वर्ष एकविसावे — अंक आठवा

# नवभारत

मे १९६८

( महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत )

संपादक-मंडळ

प्रा. वि. म. बेडेकर—प्रा. गोवर्धन पारीख का. संपादक



वार्षिक रु. ९ सहामाही रु. ५ अंकास रु. १

हे मासिक श्री. म. शं. साठे यांनी दी प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी, वाई येथे छापून प्रा. वि. म. बेडेकर यांनी प्राज्ञपाठशाळामंडळ वाई यांचेकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

पत्रव्यवहाराचा पत्ता : १ संपादकीय : कार्यकारी संपादक, ' नवभारत ' मासिक,
' गणेश भुवन ' २७६, तेलंग रोड, माटुंगा– मुंबई १९

२ व्यवस्थापकीय : व्यवस्थापक, ' नवभारत ' मासिक,
C/o प्राज्ञ प्रेस, वाई ( जि० सातारा )

३ चौकशी : श्री. वा. वि. कोनकर
१८८ एफ्, भीमराववाडी, मुंबई २
फोन नं. ३५४८५४

प्रा. वा. के. लेले

# ‘ प्रहेलिका ’

## कृत्रिम साहित्याची विविधता व विपुलता

प्राचीन भारतीय, विशेषतः संस्कृत-प्राकृत, साहित्यामध्ये प्रतिमा–शाकुंतल– उत्तररामचरित– मृच्छकटिक –प्रभृति प्रेक्षणीय नाटकांची, रघुवंश– किरातार्जुनीयांसारख्या आस्वादनीय महाकाव्यांची, मेघदूत, अमरुशतक इत्यादी रमणीय भावकाव्यांची,[१] पंचतंत्र-हितोपदेशवत् चटकदार कथांची, हर्षचरित–नवसाहसाङ्कचरितांसारख्या सरस आख्यायिकांची, भवदज्जुक, मत्तविलास अशा प्रहसनांची तसेच महिषमङ्गल, शृंगारविलास ह्यांसारख्या भाणांची जशी विपुलता आहे तशीच विविध स्वरूपाच्या कृत्रिम काव्यांचीही विपुलता आहे. प्राचीन कवींचे संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश अशा अनेक भाषांवर प्रभुत्व असल्यामुळे त्यांनी कृत्रिम काव्यांचे अनेक प्रकार हाताळले. उदाहरणार्थ, व्याकरणशास्त्रातील आपल्या पांडित्याचे प्रदर्शन करण्यासाठी अनेक कवींनी व्याकरणातील वैकल्पिक रूपे प्राचुर्याने वापरली. कालिदासप्रयुक्त अनुगिरं ( पर्वतावर ), सौस्नातक ( स्नान चांगले झाले ना ? ), माघ–प्रयुक्त खलु ( प्रतिषेधार्थी ), मा जीवन् (तो न जगो ) विश्वन् ( आवाज करून ला ), वि-स्वन ( आवाज ), शंकराचार्य–प्रयुक्त ‘ उपद्येतराम् ’ ही ह्या प्रकाराची उदाहरणे होत. ह्यांच्या जोडीला विशिष्ट स्वरूपाचे आणि भिन्नार्थक ( म्हणजेच अनेकार्थक ) समास रचून प्राचीनांनी भाषिक कृत्रिमता प्रदर्शित केली. प्राचीन कवींनी रचिलेली अनेकाश्रय काव्ये हा कृत्रिम रचनेचा दुसरा प्रकार होय. प्रयुक्त शब्दांच्या द्वारे एकाहून अधिक कथानकांचा बोध करवून देणाऱ्या काव्यास अनेकाश्रय काव्य म्हणतात. उदा० संध्याकरनंदीने रचिलेले ‘ रामपालचरित ’ काव्य सीतापती रामाची तसेच बंगालचा राजा रामपाल ह्याची अशी दोघांची कथा निवेदित करते. धनंजयाचे राघवपांडवीय, चिदंबराचे राघवपांडवीयं–यादवीयम्, हरदत्तसूरिकृत राघवनैषधीयम्, विद्यामाधवरचित पार्वतीरुक्मिणीयम्, वेंकटाध्वरिविरचित यादवराघवीयम् ही अशा प्रकारच्या ‘ अनेकसंधान[२] ’ काव्यांची काही उदाहरणे होत. परंतु, कृत्रिम रचनेची चटक लागलेल्या काही प्राचीन कवींचे एवढ्यानेच समाधान झाले नाही. त्यांनी आपले बुद्धिसर्वस्व वेचून कृत्रिम रचनेची आणखी एक पद्धत शोधून काढली. ती म्हणजे एकच काव्य डावीकडून उजवीकडे वाचीत गेले तर ते एका व्यक्तीचे चरित्रपर कथानक आहे असे कळावे आणि उजवीकडून डावीकडे वाचीत गेल्यास दुसऱ्याच व्यक्तीचे चरित्रकथन असल्याचे लक्षात यावे. उदाहरणार्थ श्रुतकीर्तिकृत राघवपांडवीयम् काव्य डावीकडून उजवीकडे वाचल्यास रामकथा असल्याचे लक्षात येते, परंतु उजवीकडून डावीकडे वाचल्यास पांडवकथा असल्याचे प्रतीत होते. दैवज्ञसूर्यरचित रामकृष्ण-विलोमकाव्य हे अशाच प्रकारचे आहे. रामचन्द्राने आपल्या रसिकरंजन काव्यात आणखी एक चमत्कृती साधली आहे. ती अशी की, ते काव्य एकीकडून वाचले तर शृंगारपर असल्याचे प्रतीत होते, दुसरीकडून वाचले तर वैराग्यपर असल्याचे ध्यानात येते. ह्या सर्व कसरती केवळ संस्कृत भाषेत रचिलेल्या काव्यातल्या झाल्या. परंतु, एकाच प्रबन्धात संस्कृत-प्राकृत-मिश्र रचना करून वैचित्र्य साधण्याची कल्पना काही कवींच्या डोक्यात आली आणि त्यांनी ती लगेच अमलातही

---

१. संस्कृततही ‘ भावकाव्य ’ हा शब्द रूढ होता हे ‘ एवं च भावकाव्यस्य प्रेयस्वदिति लक्षणया व्यपदेशः । ’ (कासार, पृ. ५२) ह्या वचनावरून लक्षात येईल.

२. अशाच एका द्विसंधान काव्याचा–राघवीयपांडवीयम्‌चा–कर्ता कविराज स्वतःविषयी प्रौढीने म्हणतो. ‘ सुबन्धुर्बाणभट्टश्च कविराज इति त्रयम् ।
वक्रोक्तिमार्गनिपुणाश्चतुर्थो विद्यते न वा ॥ ’ राघवीयपांडवीयम्, १.४०.

आणली. कोण्या एका अज्ञात कवीच्या कथाकोश-नामक प्रबंधातील गद्यभाग संस्कृत भाषेत असून पद्ये प्राकृतात आहेत. आनंदकवीची माधवानल-कथाही अशाच प्रकारे सिद्ध झाली आहे. शिवस्वामीने आपल्या कप्फणाभ्युदय महाकाव्यातील १८-१२८ हा श्लोक सहा भाषांमध्ये वाचता येण्याची सोय करून ठेवून ह्या प्रवृत्तीचा अक्षरशः कडेलोटच केला ! परंतु, वर वर्णिलेली कृत्रिम रचनाही प्राचीन कवींना पुरेशी वाटेना. म्हणून त्यांनी समस्त काव्यच यमकबद्ध करण्याची शक्कल शोधून काढली आणि विनाविलंब कार्यान्वितही केली ! वासुदेवाची नलोदय, युधिष्ठिरविजय, त्रिपुरदहन, मानाङ्काचे वृन्दावनयमक, नीतिवर्मन्चे कीचकवध, वेंकटेशकृत रामयमकार्णव, नारायणरचित सीताहरण अशी असंख्य यमककाव्ये एकामागून एक झपाट्याने रचिली गेली.[१] ह्यामध्येच आनंदवर्धनरचित देवीशतक, अवतारकृत ईश्वरशतक, विश्वेश्वराचे कवीन्द्रकर्णाभरण, इत्यादी गदा, चक्र, खड्ग छत्र प्रभृति बंधांनी ‘ जखडलेल्या ’ चित्रकाव्यांची[२] भर पडून कृत्रिम काव्याला उधाण आले. अशा चमत्कृति-पूर्ण काव्यांना उच्च दर्जाचे काव्य जरी म्हणता आले नाही, तरी चतुराईने सिद्ध केलेले काव्य निश्चित-पणे म्हणता येते. त्यामध्ये कवीच्या प्रतिभाविलासापेक्षा पांडित्याचे व भाषाप्रभुत्वाचे प्रदर्शनच प्राधान्याने होते. अशी कृत्रिम कविता विनासायास रचिलेली व सुबोध होती, ही त्यातल्या त्यात संतोषाची बाब होती, असे डॉ. राजा[३] म्हणतात. प्रस्तुत लेखात ज्यांचा विचार करावयाचा आहे या प्रहेलिकांचाही अन्तर्भाव वरील प्रकारच्या चमत्कृतिपूर्ण अथवा कृत्रिम काव्यातच होतो.

**प्रहेलिका म्हणजे काय ?**

स्वतःच्या बुद्धीची चमक प्रदर्शित करून घटकाभर स्वतःचे तसेच इतरांचे मन रिझविण्याची इच्छा किशोरांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच मनात असते. प्रशालेत जाणारी चुणचुणीत मुले एकत्र जमली की ती एकमेकांना—

‘ पर्वताग्रे रथो याति भूमौ तिष्ठति सारथिः ।
भ्रमंश्च वायुवेगेन पदमेकं न गच्छति ॥ ’

( = कुंभाराचे चाक )

अशा प्रकारचे कूटप्रश्न विचारून करमणूक करताना आढळतात. सण–समारंभाच्या निमित्ताने युवती एकत्र आल्या की, एकमेकींना पुढीलसारखे उखाणे घालून किती खसखस पिकवितात ते सर्वांच्याच परि-चयाचे आहे—

‘ कात नाही, चुना नाही; तोंड कसे रंगले ?
पाऊस नाही, पाणी नाही; रान कसे हिरवे ? ’
‘ हलतडुलत येशील तर देशील मजवर पाय
देईन तुजवर पाय तर करशील माझे काय ?
पिंपळावरचे पंतोजी ! ऐका यांचे बोल
राहू द्या हो पुतळाबाई ! एवढेसेसे पोर ! ’

अशा प्रकारच्या कूटप्रश्नांची उत्तरे शोधून काढण्यासाठी क्षणभर विचार करावा लागतो, डोके खाजवावे लागते.

---

१. घटकर्परकुलक काव्याचा कर्ता पुढील गंमतीदार प्रतिज्ञा करतो—

‘ आलम्ब्य चम्बु तृषितः करकोशपेयं भावानुरक्तवनितासुरतैः शपेयम् ।
जीयेय येन कविना यमकैः परेण तस्मै वहेयमुदकं घटकर्परेण ॥ ’

२. चित्रकाव्यांच्या ह्या अतिरेकी प्रवृत्तीचा आपल्या अन्तर्भेदी दृष्टीने आढावा घेताना डॉ. राघवन् म्हणतात– “ ... The Jain monks produced now not only a Sapta- Sandhāna, or sevan-themed poem, but a twenty-four theme poem too, a verse of hundred meanings and another called Ashta-laksha-arthi ! All this soon became child's play; so new records were set up ... ” SL, pp. 113-114.

३. “ All such poems show the prodigious intellect of the poets and their control of the language. They may not be high-class poetry; but they are certainly clever poetry. It must be noted that they do not exhibit any effort and there is no sort of obscurity also in diction. ”

– SSL, p. 341.

परंतु, एकदा अचूक उत्तर सुचले की अतिशय आनंद होतो. प्रश्न जितका गुंतागुंतीचा, तितका त्याच्या उत्तरापासून होणारा बौद्धिक आनंद अधिक व उत्कट. दोन बुद्धिमान व्यक्ती एकत्र आल्या तर त्या एकमेकींच्या बुद्धीच्या कुशाग्रतेची परीक्षा घेण्याचा पवित्रा घेतात, एकमेकींना बौद्धिक आव्हाने देतात. परिणामी ह्या खेळाची रंगत अधिकच वाढते. ही बौद्धिक क्रीडा प्राचीनांनाही चांगल्या प्रकारे अवगत होती. तिलाच त्यांनी प्रहेलिका, प्रश्नोत्तर इत्यादी नावे दिली होती. ह्यावरून प्रहेलिका म्हणजे कोडी किंवा कूटप्रश्न, हे स्पष्ट होईल. ह्या कूटप्रश्नात मनात एक विशिष्ट अभिप्राय बाळगून तो वेगळयाच, गूढ अशा शब्दांनी व्यक्त केलेला असतो. हे लक्षात घेऊन हेमचन्द्र नावाच्या एका प्राचीन विद्वानाने अभिधानचिंतामणी नावाच्या आपल्या कोशात (२·१७३) ' प्रहेलयति अभिप्रायान् सूचयति ' असे प्रहेलिका शब्दाचे निर्वचन ( = लक्षण, स्वरूप-स्पष्टीकरण ) केले आहे. भिक्षु-गौरीशंकर[१] यांनी प्रहेलिका शब्दाचे दुर्विज्ञानार्थ प्रश्नः व अपहनुतवागर्थपरिज्ञानम् असे अर्थ दिले आहेत. त्यांनी अन्यत्र केलेल्या उल्लेखांवरून प्रहेलिका, दृष्टकूट, कूटप्रश्न, कूटार्थभाषितवाक्य[२] आणि नालिका[३] हे सर्व संस्कृत शब्द प्रायः समानार्थक असल्याचे लक्षात येते. कूटार्थभाषितवाक्याचे उदाहरण-

' पञ्चभर्त्री न पाञ्चाली द्विजिव्हा न च सर्पिणी !
श्यामास्या न च मार्जारी यो जानाति स पण्डितः ।।'[२]
( = लेखणी )

- असे असून ' नालिके'चे लक्षण खालीलप्रमाणे दिले गेले आहे -

' यत्तु वाच्यं प्रपञ्चेन वदेद्वा हास्यहेतुना ।
प्रहेलिकेव गूढार्था सा ज्ञेया नालिका बुधैः ।। '[३]

## प्रहेलिकेची लोकप्रियता आणि स्थितिगती

प्रहेलिका हा प्राचीन भारतीयांचा एक अतिशय आवडता क्रीडाप्रकार असावा असे वाटते. कारण डॉ. प्रियबाला शहा[४] ह्यांनी प्रतिपादिल्याप्रमाणे ऋग्वेदाच्या ऐतरेय, कौषीतकी इ. ब्राह्मण-ग्रंथांमध्ये प्रहेलिकांचा उल्लेख आढळतो. त्यांना ' कोडे ' असे म्हणत असत. ब्राह्मण ग्रंथांमध्ये आध्यात्मिक कोड्यांचाही निर्देश आढळतो.[५] उत्तरकाळात ह्या वाङ्मयीन क्रीडा-प्रकाराची लोकप्रियता इतकी वाढली की, वात्स्यायनाला आपल्या कामशास्त्रामध्ये ६४ कलामध्ये ( कामसूत्र १-३-१६ ) प्रहेलिकांची गणना करणे आवश्यक वाटले. वात्स्यायनावरील टीकेत टीकाकाराने प्रहेलिकेचे ' लोकप्रतीता ' म्हणजे ' समाजात प्रसिद्ध ' असे वर्णन केले असून तिच्या क्रीडार्था (केवळ बौद्धिक क्रीडा हेच जिचे प्रयोजन आहे अशी ) आणि वादार्था ( म्हणजे निरनिराळ्या शास्त्रीय विषयांवरील चर्चेत उपयोगी पडणारी ) अशा दोन भेदांचाही उल्लेख केला आहे. ह्या बौद्धिक क्रीडाप्रभेदाच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे संस्कृत भाषेतील कोशकार व काव्यशास्त्रज्ञ ह्यांना ह्याची दखल घेणे आवश्यक होऊन बसले. अमरसिंहाने आपल्या अमरकोशात प्रवल्हिका व प्रहेलिका यांचा एकत्र उल्लेख केला.[६] विष्णुधर्मोत्तरपुराणाच्या[७] संकलकाने तर प्रहेलिकांच्या लक्षण-वर्णनासाठी एक अखंड अध्याय खर्ची घातला, आणि तो देखील प्रहेलिका ह्या दोषास्पद असतात असे मानणाऱ्या काही विचारवंतांच्या विरोधास न जुमानता, हे लक्षात घेण्यासारखे आहे. काव्यालंकार नावाच्या काव्यशास्त्रीय ग्रंथाच्या कर्त्याने- भामहाने देखील पुढील शब्दात प्रहेलिकांविषयी आपली नापसंती व्यक्त केली होती-

१. सर्वतन्त्रसिद्धान्तपदार्थलक्षणसंग्रहः , काशी, षष्ठ संस्करण, संवत् २००९, पृ. १४०·१४१

२. तत्रैव, पृ. १००

३. तत्रैव, पृ. १०८

४. पुराण. II. पृ. २२

५. तत्रैव, पृ. २३.

६. अमरकोषः- ( संशोधक )- नारायण राम आचार्य, मुंबई, द्वादश संस्करण, १९५०, पृ. १७.

७. पुराण- I अध्याय १६.

**“ नानाधात्वर्थगम्भीरा यमकव्यपदेशिनी ।
प्रहेलिका सा ह्युदिता रामशर्माच्युतोत्तरे ॥ १९ ॥
काव्यान्यपि यदीमानि व्याख्यागम्यानि शास्त्रवत् ।
उत्सवः सुधियामेव हन्त “दुर्मेधसो हताः ” ॥२०॥ [१]**

अर्थात्, ‘ धातूच्या अनेक अर्थांपैकी अप्रसिद्ध अर्थांची बुद्धिपुरस्सर निवड करून त्यांच्या साह्याने दुर्बोध अशी जी रचना कवी सिद्ध करतात ती जरी यमक ह्या नावाने मिरवत असली तरी ती वस्तुतः प्रहेलिकाच होय. अशा प्रहेलिकांची उदाहरणे रामशर्माच्या ‘ अच्युतोत्तर ’ काव्यात अनेक आढळतात. शास्त्रे स्वभावतःच कठीण दुर्बोध असल्यामुळे त्यांच्या आकलनासाठी अभ्यासकाला टीका-टिप्पण्यांची मदत घ्यावी लागते, आणि हा प्रकार आपण समजू शकतो. परंतु, आबालवृद्धांच्या आनंदासाठी रचिलेल्या काव्यांनाही स्पष्टीकरणात्मक लंब्याचौड्या टीका-प्रटीकांची गरज भासू लागली तर मन्दबुद्धीच्या सर्वसाधारण रसिकांची कंबख्तीच भरली म्हणावयाची ! कारण अशा टीकांचा अर्थ फक्त बुद्धिवंतांना कळणार व त्यांनाच काय तो (झालाच तर ! ) काव्यानंद होणार. बिचाऱ्या सर्वसामान्य रसिकांना मात्र त्या आनंदास मुकावे लागणार ! ’ परंतु, भामहाच्या ह्या निषेधाच्या सुराची मुळीसुद्धा तमा न बाळगता दण्डी नावाच्या अलंकार शास्त्रकाराने आपल्या काव्यलक्षण ’ नामक ग्रंथामध्ये प्रहेलिकांचे प्रयोजन स्पष्ट करून, त्यांचे सोळा प्रकारभेद सांगून प्रत्येकाचे उदाहरणही दिले आणि अशाप्रकारे प्रहेलिका ह्या काव्यरचनाप्रकारास साहित्यशास्त्रात स्थान मिळवून दिले. परंतु, दण्डीच्या नंतरच्या काळात ह्या काव्यप्रकाराचा, दण्डीप्रमाणे, ठासून पुरस्कार करणारा काव्यशास्त्रज्ञ निपजला नाही. किंबहुना, दण्डीनंतर होऊन गेलेल्या उद्भट-वामनांनी प्रहेलिकेचा उल्लेखसुद्धा केला नाही. इसवी सन ८२५-८५०[२] च्या आसपास होऊन गेलेल्या रुद्रटाने ‘ क्रीडा ’ इतकेच प्रहेलिकेचे प्रयोजन असल्यामुळे तिचा अलंकारांमध्ये अन्तर्भाव केला नाही. परंतु, काव्यामध्ये प्रहेलिका रचिल्या जात असल्यामुळे त्यांचे स्वरूप, थोडक्यात तरी का होईना, स्पष्ट करणे आवश्यक आहे असे मानून मात्राच्युतक, बिन्दुच्युतक, कारकगूढ, क्रियागूढ व प्रश्नोत्तर ह्या चित्रालंकारांबरोबर स्पष्टप्रच्छन्नार्था व व्याहृतार्था ह्या दोन प्रहेलिकांचे[३] लक्षण विवरण केले. रुद्रटोत्तरकालीन भोजाने आपल्या सरस्वतीकण्ठाभरणामध्ये द्वितीय परिच्छेदात सहा प्रकारच्या प्रहेलिकांचे वर्णन केले आहे. भोजाच्या समकालीन काव्यप्रकाशकर्त्या मम्मटाने (काळ इ. स. १०५०–११००)[४] प्रहेलिकांचा उल्लेखसुद्धा केला नाही. मम्मटानंतर होऊन गेलेल्या हेमचन्द्र ( काळ इ. स. १०८८–११७३ )[५] नावाच्या प्रसिद्ध व बहुप्रसू काव्यशास्त्रकाराने पुढील शब्दात प्रहेलिकेची संभावना केली आहे–

‘ गूढादीत्यादिपदेन प्रश्नोत्तर–प्रहेलिका–दुर्वचकादि-
परिग्रहः ॥

---

१. भामहालंकार– पृ. ३७.

२. KSP, Part I, p. 155

३. ‘ मात्राबिन्दुच्युतके प्रहेलिका कारकक्रियागूढे ।
प्रश्नोत्तरादि चान्यत्क्रीडामात्रोपयोगमिदम् ॥ २४ ॥

– मात्रेति । च्युतकशब्दो गूढशब्दश्चोभयत्र संबध्यते । ततश्च मात्राच्युतकबिन्दुच्युतकप्रहेलिकाकारकगूढक्रियागूढानि प्रश्नोत्तरादि । चः समुच्चये । अन्यत्पूर्वालंकारेभ्यो व्यतिरिक्तं **तत्क्रीडामात्रोपयोगम् । मात्रग्रहणेनाल्पप्रयोजनतां सूचयति । अल्पप्रयोजनत्वादेवालंकारमध्ये न संगृहीतम् । काव्येषु च दर्शनाद्वक्तव्यमिति ॥** ’ – रुद्रटालंकार– पृ. ५८; तसेच, ‘ स्पष्टप्रच्छन्नार्था प्रहेलिका व्याहृतार्था च ॥ २५ ॥ ’ – तत्रैव. ह्या दोन्ही प्रकारांचे एकच उदाहरण देण्यात आले आहे ते असे—

‘ कानि निकृत्तानि कथं कदलीवनवासिना स्वयं तेन ।
कथमपि न दृश्यतेऽसावन्वक्ष हरति वसनानि ॥ २९ ॥ – तत्रैव, पृ. ५९.

४. KSP, Part I, p. 274.

५. Ibid, p. 290.



अनुक्रमणिका

एतच्च कष्टकाव्यत्वात्क्रीडामात्रफलत्वाच्च न काव्यरूपतां दधातीति प्रतन्यते[१] ॥ '

ह्यावरून हेमचन्द्रही प्रहेलिकेस, रुद्रटाप्रमाणेच, केवळ क्रीडार्थोपयोगी व अतएव काव्यशून्य मानीत होता, हे स्पष्ट होते. साहित्यदर्पण ह्या अलंकारशास्त्रीय ग्रंथाचा कर्ता विश्वनाथ (काळ इ. स. १३००–१३८४)[२] ह्याने प्रहेलिका म्हणजे केवळ उक्तिवैचित्र्य असल्यामुळे त्या रसानुकूल नसतात, त्यामुळे त्यांचा अलंकारांमध्ये अंतर्भाव करणे योग्य नाही, असे आपले स्पष्ट मत नमूद करून चमत्कृतिपर काव्याचा एक प्रकार ह्या नात्याने च्यूताक्षरा, दत्ताक्षरा व च्यूतदत्ताक्षर ह्या तीन प्रहेलिका-प्रकारांचे उल्लेख केले आहेत.[३]

प्रहेलिकेच्या वाटचालीचा जो ऐतिहासिक आढावा वर घेतला आहे त्यावरून ध्यानात येईल की, एक साहित्यप्रकार ह्या नात्याने प्रहेलिकेचे महत्त्व दण्डीनंतरच्या काळात झपाट्याने ओसरू लागले आणि इसवी सनाच्या चवदाव्या शतकात ती जवळजवळ नामशेष झाली. हे असे का घडून आले त्याची चर्चा करणे निष्प्रयोजन आहे. एक गोष्ट सर्वस्वी ग्राह्य मानण्याजोगी आहे आणि ती ही की, प्रहेलिकेचा खरा व खंदा पुरस्कर्ता दण्डी हाच ग्रंथकार होय. त्यानेच तिची उद्दिष्टे स्पष्टपणे प्रतिपादून, तिच्या निरनिराळ्या भेदांची लक्षणे व उदाहरणे देऊन तिचे महत्त्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. दण्डी हाच तिचा खऱ्या अर्थाने आद्य व अखेरचा ' वाली ' ठरत असल्यामुळे त्याच्याच ग्रंथाच्या आधाराने आता प्रहेलिकेचे स्वरूप-भेदादी समजून घेऊ.

## प्रहेलिकेचे दण्डीप्रोक्त प्रयोजन

' क्रीडागोष्ठीविनोदेषु तज्ज्ञैराकीर्णमन्त्रणे ।
परव्यामोहने चापि सोपयोगाः प्रहेलिकाः ॥९७॥'
— काव्यलक्षण, पृ. २४०

ह्या शब्दात दण्डीने (काळ इ. स. ६६०–६८०)[४] प्रहेलिकेचे कोणते उपयोग असतात ते सांगितले आहे. ह्या कारिकेवर टीका लिहिताना रत्नश्रीज्ञान पुढील खुलासा करतो:— " गोष्ठीनामनेकविधत्वात् क्रीडारूपाः प्रीतिस्वभावा रसवत्यो या गोष्ठ्यः समवायाः काव्यालापरूपा विदग्धानां ता एव सुखेन कालप्रेरणारूपत्वात् विनोदाः तेषु क्रीडागोष्ठीविनोदेषु । तज्ज्ञैः प्रहेलिकावेदिभिः सह आकीर्णे जनसंबाधे स्थाने क्वचिन्मन्त्रणे गुप्तभाषणे तद्विदामेव तत्र गूढार्थानां प्रहेलिकानां रहस्यभूतार्थप्रतिपत्तिः । इतरेषां तत्र सन्निहितानामपि किमिदमुच्यत इति तदनवगमात् आकीर्णेऽपि मन्त्रणं प्रहेलिकाभिः साध्यते । [सामर्थ्यं चेद्] ज्ञायतां किमस्माभिरुच्यत इति व्यामोहने तत्त्वानिश्चयादाकुलीकरणे, नर्मरूपे वापि विषये । चैवेत्यपि पाठः । सहोपयोगेन प्रयोजनेन वर्तत इति सोपयोगा उपकारिण्यः । ततस्ता अप्यलङ्कारवत् [ 108 a ] काव्यलक्षणे चिन्तनीयाः । ... उपयोगवत्तया अवश्यवक्तव्यात् प्रहेलिकानामलङ्कारवदिति ॥ ' (तत्रैव, पृ. २४०-२४१).

अर्थात् गोष्ठी म्हणजे सभा किंवा बैठक. गोष्ठींचे विद्वद्गोष्ठी, कविगोष्ठी, संगीत गोष्ठी[५] विदग्ध गोष्ठी[६] असे अनेक प्रकार असतात (ह्या संस्कृत शब्दांनाच मराठी भाषेत विद्वत्सभा, कविसंमेलन, संगीताची मैफल किंवा बैठक व विदग्धांचा मेळावा हे शब्द वापरले जातात.) चार बहुश्रुत (विदग्ध) व रसिक माणसे एकत्र (समवायाः) आली की, त्यांच्यात काव्यशास्त्रविनोद चालू होतो; त्यांच्या दृष्टीने ही एक प्रकारची क्रीडा-करमणूकच असते व तिच्यापासून त्यांना आनंदच मिळतो. अशा क्रीडार्थ केलेल्या काव्यशास्त्रविनोदामध्ये प्रहेलिकांचा उपयोग होत असतो. जेथे बराच जनसंमर्द जमलेला असतो,

---

१. काव्यानुशासनम् , पृ. २७२.
२. KSP, Part I, p. 298.
३. पुराण. II, पृ. २३.
४. KSP, Part II, p. 414.
५. तुळा– ' त्वदर्पितदृशस्तस्या गीतगोष्ठ्यामवर्धत । ' – काव्यलक्षण, पृ. १५६.
६. तुळा– ' कृशे कविस्वेऽपि जनाः कृतश्रमा
विदग्धगोष्ठीषु विहर्तुमीशते ॥ १०५ ॥, तत्रैव, पृ. ६०.

अशा ठिकाणी काही गुप्त संभाषण करावयाचे असल्यास ते सांकेतिक भाषेवाचून होऊ शकत नाही. अशा प्रसंगी प्रहेलिकावेत्ते परस्परांशी प्रहेलिकांच्या साह्याने संभाषण करून आपल्या भाषणाची गुप्तता राखू शकतात. हा प्रहेलिकांचा दुसरा उपयोग झाला. तिसरा उपयोग म्हटला म्हणजे आपल्या अंतःकरणातील खऱ्या अभिप्रायांचा दुसऱ्याला पत्ता लागू न देता त्याला गोंधळात टाकणे आणि 'असेल बुद्धिसामर्थ्य तर ओळख माझे हृद्गत,' असे त्याला आव्हान देणे हा होय. क्वचित्, थट्टामस्करीच्या बोलण्यातही प्रहेलिकेचा उपयोग होऊ शकतो. एवंच, प्रहेलिकेस काही ना काही प्रयोजन असल्यामुळे, तिचा काही ना काही उपयोग असल्यामुळे तिचाही काव्यलक्षणपर ग्रंथात अलंकारांप्रमाणेच परामर्श घेणे आवश्यक ठरते. रत्नश्रीज्ञानाच्या ह्या विचारांचा आणखीही एक सूचित अर्थ ध्यानात घ्यावयास हवा. तो असा की, कवी एखाद्या काव्यामध्ये विद्वत्सभेचे वर्णन करताना किंवा दरबार चालू असताना एखाद्या महत्त्वाच्या विषयावर राजा आपल्या मंत्र्यांबरोबर सल्लामसलत करीत असल्याचे दाखवतेवेळी किंवा पतिपत्नी वा प्रियकर-प्रेयसी (काव्यातील नायक-नायिका) थट्टामस्करीत परस्परांशी संभाषण करीत असल्याचे दाखवावयाचे असल्यास प्रहेलिकांचा उपयोग करू शकतो.[1] प्रहेलिकारूप चतुरोक्तीमुळे बोलणाऱ्याच्या भाषणाला खुलावट प्राप्त होत असल्यामुळे दण्डीने प्रहेलिकेचा समावेश अलंकारात केला आहे.

## प्रहेलिकेचे रचना-तंत्र

प्राचीन शास्त्रकार एखादा विचारयोग्य विषय नजरेसमोर येताच त्याच्या सूक्ष्म छाननीस प्रारंभ करीत असत– मग तो विषय साहित्यिक वा शास्त्रीय, कोणत्याही स्वरूपाचा असो. त्या विषयाचे प्रयोजन, लक्षण (म्हणजे स्वरूप) निश्चित करून, त्याचे तंत्र ठरवून टाकणे ही प्राचीन शास्त्रकारांची स्थायी प्रवृत्ती होती. ह्या प्रवृत्तीसच अनुसरून त्यांनी प्रहेलिकेचाही साचा पुढीलप्रमाणे मुक्रर केला आहे–

"श्लोकेनैकेन वा द्वाभ्यां कर्तव्यास्तु नरोत्तम
न कर्तव्याश्च ता राजन्बहुश्लोकनिबन्धनाः ॥ २ ॥
अश्लीलमेतास्वपि नैव कार्यं
तद्वर्ज्यमाहुः कवयो नरेन्द्र ।
उद्वेजनीयं तु सतां तदुक्तं
अश्लीलवन्ध्यं सुखदं हि काव्यम् ॥" १५ ॥

(पुराण. I, अध्याय १६)

अर्थात्, (मार्कंडेय ऋषी वज्रनामक राजाला संबोधून म्हणतो) प्रहेलिका एका किंवा फार तर दोन श्लोकांच्या असाव्यात. त्या अनेक श्लोकांच्या रचलेल्या नसाव्यात. (कोडी किंवा उखाणे यांची गोडी थोडक्यातच असते. लांबण लावल्यास त्यांचा कंटाळा येतो.) शिवाय अशा प्रहेलिकांमध्येही अश्लीलता (म्हणजे व्रीडोत्पादक, जुगुप्सोत्पादक किंवा अमंगळ अशी कल्पना) येऊ देऊ नये. अश्लीलता केवळ काव्यातच नव्हे तर प्रहेलिकातही दोषास्पद मानण्यात आली आहे. अश्लील काव्य सज्जनांना उबग आणते. अश्लीलतारहित काव्यच रसिकांना आनंद देऊ शकते. पुराणकाराने प्रहेलिकेच्या लांबीरुंदीचे बंधन घालून देतानाच कवींना अश्लीलतेपासून अलिप्त राहण्याचा इषारा कसा दिला आहे, ते ध्यानात घेण्याजोगे आहे. थट्टामस्करीत, हास्यविनोदात किंवा काव्यशास्त्रविनोदातही अश्लील शब्द तोंडावाटे निघू नयेत, हा एक अत्युच्च आदर्शच पुराणकाराने येथे कवींसमोर ठेवला आहे.

## प्रहेलिकेचे प्रकार

दण्डीच्या काव्यलक्षण ग्रंथाच्या आधारे प्रस्तुत लेखात प्रहेलिकेच्या भेदोपभेदांचे विवेचन केले जात असल्याचे वर म्हटलेच आहे. दण्डीने जुन्या शास्त्रकारांच्या प्रथेस अनुसरून प्रथमतः सर्वच्या सर्व म्हणजे १६ प्रहेलिकांच्या नामोल्लेखपूर्वक व्याख्या दिल्या आहेत आणि त्यानंतर प्रत्येक प्रहेलिका–प्रभेदाचे एकेक उदाहरण दिले आहे. ही पद्धती संस्कृत ग्रंथांच्या दृष्टीने सोयीची असली तरी मराठी वाचकांच्या दृष्टीने थोडीशी गैरसोयीचीच आहे. त्यामुळे इतःपर प्रथमतः त्या त्या विशिष्ट प्रहेलिका–प्रभेदांचे दण्डीप्रोक्त लक्षण

---

१. हाच अर्थ डोळ्यासमोर ठेवून रुद्रटाने 'काव्येषु च दर्शनाद् वक्तव्यमिती ॥" (रुद्रटालंकार पृ. ५८) असे म्हटलेले दिसते. 'प्रेरण' नामक गेयकाव्ये प्रहेलिकायुक्त असत.

उद्धृत करून, त्याचा शब्दार्थ देऊन लगेच त्याच्या खाली दण्डीने दिलेले उदाहरण सादर करून त्या त्या प्रहेलिका-प्रकाराचे विवेचन संपवावयाचे असे धोरण अवलंबिण्याचे ठरविले आहे. शिवाय, विष्णुधर्मोत्तर-पुराणातील समान प्रहेलिकेचे लक्षण त्या विवेचनाखाली दिले जाईल. विष्णुधर्मोत्तरपुराणकाराने प्रहेलिकांची उदाहरणे दिलेली नसल्यामुळे त्याला अभिप्रेत असलेल्या प्रहेलिका-प्रकाराचा संपूर्णपणे उलगडा होत नाही, ही एक अडचणीची बाब आहे, हे येथे नमूद करून ठेवणे जरूरीचे आहे.

प्रकार– १

' आहुः । समागतां नाम गूढार्थां पदसन्धिना । '
– ( काव्यलक्षण ३।९८ )

अर्थात्, नामांना तसेच क्रियापदांना लागणाऱ्या प्रत्ययांच्या योगे सिद्ध होणाऱ्या पदांच्या ( म्हणजेच शब्दांच्या ) संधीच्या कारणाखातर जिच्यामधील अर्थ मोठ्या कष्टाने लक्षात येतो, तीस 'समागता' प्रहेलिका म्हणतात. एवंच, संधी हे ह्या प्रहेलिकेच्या निष्पत्तीचे साधन होय. उदाहरणार्थ,

' न मयागोरसाभिज्ञं चेतः कस्मात् प्रकुप्यसि ।
अस्थानरुदितैरेतैरलमालोहितेक्षणे ॥ '
तत्रैव, ३/१०८, पृ. २४५

अर्थात्, ' बा अंतःकरणा, अपराधाचा स्वादसुद्धा मला ठाऊक नाही ( मी कोणताही अपराध केलेला नाही ), असे असताना तू मजवर का रागावतोस ? हे आरक्तनेत्रे प्रिये, हे जे उगीचच रडणे तू आरंभले आहेस, ते पुरे कर. ' येथे कोण्या एका स्त्रीस आपला प्रियकर परस्त्रीवर अनुरक्त झाल्याचा संशय येतो व ती रडू लागते. तिची समजूत काढण्यासाठी प्रियकर वरीलप्रमाणे भाषण करून आपण ' तसे ' काही पाप केले नसल्याचा निर्वाळा देत आहे. ह्या श्लोकाच्या पूर्वार्धात ' मे आगोरसाभिज्ञं ' या दोन शब्दांचा ' अयादेश ' होऊन ' मयागोरसाभिज्ञं ' असा संधी झाल्याकारणाने विवक्षित ( म्हणजे अभिप्रेत ) अर्थ गूढ राहतो. म्हणून ही समागता प्रहेलिका. हिला समान्तर प्रहेलिका विष्णुधर्मोत्तरात वर्णिलेली आढळत नाही.

प्रकार– २

' वञ्चितान्यत्र रूढेन यत्र शब्देन वञ्चना ॥
– ( तत्रैव, ३/९८, पृ. २४१ )

अर्थात्, एखादा शब्द ज्या अर्थाने रूढ म्हणजे प्रसिद्ध असतो त्याहून भिन्न म्हणजेच अप्रसिद्ध अर्थाने त्याचा प्रयोग केला गेल्यास ऐकणाऱ्याची फसवणूक होते, त्याच्या मनाचा गोंधळ उडतो. अशी रचना ज्या प्रहेलिकेत असते तीस ' वंचिता ' म्हणतात. उदाहरणार्थ,

' कुब्जामासेवमानस्य यथा ते वर्धते रतिः ।
नैवं निर्विशतो नारीरमरस्त्रीविडम्बिनीः ॥ '
तत्रैव ३।१०९, पृ. २४५.

अर्थात्, ' ह्या कुब्जेशी रममाण होताना तुला जितका आनंद होतो तितका आनंद देवांगनासमान स्त्रियांशी रममाण होतानाही होत नाही. हा प्रकट अर्थ श्रोत्याला बुचकळ्यात टाकणारा आहे, कारण श्रोता ' कुब्जा ' शब्दाच्या ' कुबडी स्त्री ' ह्या प्रसिद्ध अर्थाचे ग्रहण करतो. परंतु, वक्त्याला तो अर्थ अभिप्रेत नाही. त्याला ' कन्याकुब्जा ' ( कान्यकुब्ज नगरी ) हा अप्रसिद्ध अर्थ अभिप्रेत आहे. ( भामा शब्द ' रागीट स्त्री ' ह्या अर्थी प्रसिद्ध असताना ' सत्यभामा ' ह्या अप्रसिद्ध अर्थी त्या शब्दाचा प्रयोग करण्यातलाच हा प्रकार आहे.) वक्त्याच्या ह्या हृद्गताचा बोध प्रयुक्त पदांनी होत नसल्यामुळे ऐकणारा चकतो, म्हणूनच ही वंचिता प्रहेलिका. विष्णुधर्मोत्तरपुराणकाराने वंचितेचे ' पर्याय-वचनाद्यस्यां वंदि( वञ्चि )ता सा प्रकीर्तिता ॥ ' ( पुराण. I. १६/३ ) असे लक्षण दिले आहे. पुराणकाराचे मत दण्डीच्या मताहून वेगळे दिसते. कारण दण्डीच्या लक्षणोदाहरणांमध्ये पर्याय-वचनाचा कोठेही संबंध नाही. तेथे शब्द प्रसिद्धेतर अर्थाने वापरलेला असतो. कदाचित्, दण्डी ज्या पूर्वाचार्यांच्या मतास धरून ( ' एताः षोडश निर्दिष्टाः पूर्वाचार्यैः प्रहेलिकाः । ' – काव्यलक्षण ३/१०६, पृ. २४३ ) प्रहेलिकांचे लक्षण-विवरण करीत आहे, त्याहून वेगळ्या पूर्वसूरींची मतप्रणाली पुराणकारासमोर असावी, असे वाटते.

प्रकार-३

' व्युत्क्रान्तातिव्यवहितप्रयोगान्मोहकारिणी । '
( तत्रैव, ३/९९, पृ. २४१ )



अनुक्रमणिका

अर्थात् जिच्यामध्ये वापरलेल्या शब्दात अनेक व्यवधाने असल्यामुळे वक्त्याला अभिप्रेत अर्थाचा निश्चितपणे बोध न होता उलट विपरीत अर्थाचीच प्रतीति येते, तीस ( मनाचा गोंधळ उडवणारी ह्या नात्याने ) **व्युत्क्रान्ता** म्हणतात. कोणत्याही वाक्यापासून सुसंगत अर्थाचा बोध होण्यासाठी त्या वाक्यामध्ये, वापरलेल्या शब्दांमध्ये आकांक्षा, योग्यता व सांनिध्य हे तीन गुण असणे आवश्यक असते, असे मानण्यात आले आहे. नामे, सर्वनामे तसेच क्रियापदे यांची प्रत्ययान्वित रूपे वाक्यात इतस्ततः विखुरलेली असल्यास ती समुचित अर्थाचा बोध करून देऊ शकत नाहीत. अशा समयी वाक्यातील शब्दात उपर्युक्त गुणत्रयीपैकी सान्निध्यगुणाच्या अभावी अर्थ-प्रतिपत्ती होत नाही. व्युत्क्रान्ता प्रहेलिकेत असाच प्रकार घडून येत असतो, हे खालील उदाहरणावरून स्पष्ट होईल–

**दण्डे चुम्बति पद्मिन्याः हंसः कर्कशकण्टके ।**
**मुखं वल्गुरवं कुर्वंस्तुण्डेनाङ्गानि घट्टयन् ॥'**

( तत्रैव, ३/११०, पृ. २४५ )

ह्या श्लोकातील शब्दांमध्ये सान्निध्यगुणाचा अभाव आहे, त्यामुळे शब्दांचा पुढीलप्रमाणे अन्वय लावल्याशिवाय श्लोकार्थ निष्पन्न होत नाही– 'कर्कशकण्टके दण्डे अङ्गानि घट्टयन्, वल्गुरवं कुर्वन्, हंसः तुण्डेन पद्मिन्या मुखं चुम्बति ।' अर्थात् 'खरखरीत काटे असलेल्या कमलदेठावर आपले अंग घासणारा, मधुर कूजन करणारा हंस पक्षी आपल्या चोचीने कमलिनीचे मुख चुंबत आहे.' परस्पर-योग्य पदे मूळ श्लोकांत एकमेकांपासून व्यवहित असल्यामुळे ( दूरदूर असल्यामुळे) मूळ श्लोक ऐकल्यानंतर मनात गोंधळ उत्पन्न होतो, निश्चित अर्थाचा बोध होत नाही. म्हणून हिला 'व्युत्क्रान्ता' असे म्हणावयाचे. विष्णुधर्मोत्तरपुराणकाराने जिला 'विक्रान्तगोपिता' संबोधिले आहे, ती दण्डीप्रणीत व्युत्क्रान्तेसारखी आहे. विक्रान्तगोपितेचे लक्षण असे– 'विक्रान्तगोपिता या तु पदैर्व्यवहितैर्भवेत् । ( पुराण. I १६–४ )

**प्रकार–४**

**'सा स्यात् प्रमुषिता यस्यां दुर्बोधार्था पदावली ॥'**

( काव्यलक्षण ३–९९)

अर्थात्, ज्या प्रहेलिकेत वापरलेल्या शब्दांचे आकलन मोठ्या कष्टाने होते ( म्हणूनच जिच्यातील पदे दुर्बोध असतात ) त्या प्रहेलिकेला **प्रमुषिता** म्हणतात. तसे पाहता प्रत्येक प्रहेलिकाच दुर्बोध असते. ( अर्थात, ती तशी नसेल तर प्रहेलिकाच ठरणार नाही. ) प्रस्तुत प्रकारच्या प्रहेलिकेत एखादाच नव्हे तर सर्वच्या सर्व शब्द अप्रसिद्ध अर्थी वापरलेले असतात (म्हणून लक्षणामध्ये 'दुर्बोधार्था पदावली' म्हटले आहे ). वरील प्रकार दोनच्या म्हणजे 'वञ्चिता' प्रहेलिकेत एकच शब्द अप्रसिद्ध अर्थाने वापरलेला असतो ( म्हणून तेथे 'शब्देन' असा एकवचनी प्रयोग केलेला आहे ), हा ह्या दोन प्रकारच्या प्रहेलिकांमधील फरक आहे. तो पुढील उदाहरणाने अधिक स्पष्ट होईल–

**खातयः कनि काले ते स्फातयः स्फीतवल्गवः ।**
**चन्द्रे साक्षाद्भवन्त्यत्र वायवो मम चारिणः ॥**

( तत्रैव, ३.१११, पृ. २४६ )

अर्थ– 'मुली, तुझ्या पायातील पैंजणाचा खणखणीत आवाज तू चालू लागलीस की अधिकच गोड वाटू लागतो. ( शब्दशः अधिक व गोड होतो). अशा ह्या गोड आवाजाची साक्षात् अनुभूती घेण्यासाठी माझे प्राण तुझ्या मनोज्ञ चरणातच मुक्काम ठोकतात !' ह्या श्लोकातील खातयः= पैंजणांचा ध्वनी; कनि=मुली ( कनी शब्दाचे संबोधन ); काले = चरणामध्ये; स्फातयः = वाढलेला, स्पष्ट; स्फीतवल्गवः = मोठा व गोड; चन्द्रे = मनोज्ञ (' चन्द्रे ' शब्दाचे 'कनि' ह्या संबोधनाचे विशेषण म्हणूनही ग्रहण करता येईल. तसे केल्यास, 'हे सुंदर मुली ' असे संबोधन होईल ) वायवः = प्राण; चारिणः = अवस्थायी होतात, राहतात, हे सर्वच अर्थ दुर्बोध असल्यामुळे श्लोकातील अर्थाचे गोपन झाले आहे. म्हणून ही प्रमुषिता प्रहेलिका होय. विष्णुधर्मोत्तरपुराणकाराने हिचे 'अप्रसिद्धैस्तु पर्यायैर्मुषिता नाम सा स्मृता ॥' (पुराण I. १६/४ ) असे लक्षण केले आहे.

**प्रकार–५**

**समानरूपा गौणार्थारोपितैर्ग्रथिता पदैः ॥ '**

( काव्यलक्षण ३/१००, पृ. २४१)

अर्थात्, जी मुख्य अर्थाहून भिन्न अशा अर्थामध्ये आरोपित शब्दांनी रचिलेली असते ती **समानरूपा**



अनुक्रमणिका

प्रहेलिका होय. मुख्य अर्थाहून वेगळया अर्थाचे प्रतिपादन करणारी असल्यामुळे तीस समानरूपा म्हणतात. उदाहरणार्थ–

'अत्रोद्याने मया दृष्टा वल्लरी पञ्चपल्लवा ।
पल्लवे पल्लवे चार्द्रा यस्याः कुसुममञ्जरी ॥ '

( तत्रैव, ३/११२, पृ २४६ )

अर्थ– 'मी ह्या उद्यानात पंचपल्लवांनी युक्त अशी वेल पाहिली. तिच्या प्रत्येक पल्लवावरील पुष्पमंजरी आर्द्र होती.' ह्या श्लोकात वक्त्याला लतेचे वर्णन करावयाचे नाही, तर 'वल्लरी'च्या निमित्ताने कोण्या एका हाडामांसाच्या वल्लरीचे ( सुंदर युवतीचे) वर्णन विवक्षित आहे. वेलीची कोवळी पालवी आणि लावण्यवतीची नाजूक बोटे ह्यांमध्ये तसेच वेलीच्या फुलांचा मोहर आणि युवतीच्या बोटांची नखे ह्यांमध्ये साम्य असल्यामुळे ( किमान ते तसे असते असे कवी मानीत असल्यामुळे ) वक्त्याने येथे वल्लरी, पल्लव, मञ्जरी इत्यादी शब्द गौणार्थाने वापरून आपल्या मनातील खरा अभिप्राय सूचित केला आहे, परंतु प्रत्यक्ष शब्दामध्ये सांगितलेला नाही. श्लोकातील प्रयुक्त शब्दांपासून अर्थबोध होत नाही असे नाही, परंतु तो अर्थ विवक्षित नसतो, तत्समान दुसरा अर्थ विवक्षित असतो, म्हणून ही समानरूपा प्रहेलिका होय. विष्णुधर्मोत्तरपुराणात हिचे लक्षण पुढीलप्रमाणे दिलेले आढळते–

' समानरूपतुल्यार्था शब्दैरन्यैः प्रकीर्तिता ॥ '

( पुराण. I १६–५ )

प्रकार–६

' परुषा लक्षणास्तित्वमात्रव्युत्पादितश्रुतिः ॥ '

(काव्यलक्षण ३/१०० पृ. २४१)

अर्थात् ' जिच्यातील शब्द ( = श्रुतिः ) लक्षणाच्या म्हणजे शब्दशास्त्राच्या अर्थात् व्याकरणाच्या अस्तित्वमात्रेकरून परिष्कृत असतात, तीस परुषा प्रहेलिका म्हणतात. ' अशा प्रहेलिकेतील शब्द व्याकरणशास्त्राच्या आधाराने शुद्ध असल्याचे सिद्ध करून दाखवता येत असले तरी असे शब्दप्रयोग रूढ नसतात, म्हणूनच वरील लक्षणात 'लक्षणास्तित्वमात्रव्युत्पादित' असे म्हटले आहे. शिवाय, अशा शब्दप्रयोगांपासून कोणतीही रसप्रतीती होत नसल्यामुळे असे शब्दप्रयोग (म्हणजेच पर्यायाने अशा शब्दप्रयोगांनी युक्त प्रहेलिका) परुष (रसहीन) असतात, म्हणून ह्या प्रहेलिकेसही 'परुषा' म्हटले आहे. उदाहरणार्थ–

' सुराः सुरालये स्वैरं भ्रमन्ति दशनार्चिषा ।
मज्जन्त इव मत्तास्ते सौरे सरसि संप्रति ॥ '

( तत्रैव ३/११३, पृ. २४६ )

अर्थात्, ' हसण्यामुळे ज्यांच्या दातांची प्रभा इतस्ततः फाकली आहे असे कलाल मद्याच्या सरोवरात जणू डुंबून दारूच्या नशेत सध्या मदिरागृहात यथेष्ट भ्रमण करीत आहेत. ' ह्या श्लोकात ल 'सुराः' शब्द शौण्डिक म्हणजे कलाल ह्या अर्थाने प्रसिद्ध नाही, तो देव ह्या अर्थाने प्रसिद्ध आहे. परंतु, सुरा तयार करणारा ( व विकणारा ) तो सुर असे रूप व्याकरणशास्त्राच्या नियमाप्रमाणे सिद्ध होऊ शकते. तद्वत् सौर शब्द 'सुरासंबन्धि' या अर्थाने रूढ नाही, परंतु तो देखील व्याकरणाच्या आधारे सिद्ध करता येतो. एवंच, ह्या श्लोकातील शब्द व्याकरणाच्या नियम-मात्रेकरून 'संस्कृत' असल्यामुळे झिडकारता येत नाहीत. श्लोकाच्या अर्थामध्ये सरसतेचा पूर्णपणे अभावच असल्यामुळे हा श्लोक 'परुषा' प्रहेलिकेचा नमुना ठरतो. ह्याच श्लोकाचा 'मानस सरोवरातील स्नानामुळे प्रसन्न झालेले देव दन्तप्रभा फाकवीत स्वर्गात सध्या स्वच्छंदपणे विहार करीत आहेत' असा दुसरा अर्थही निष्पन्न होतो. विष्णुधर्मोत्तरपुराणकाराने प्रस्तुत प्रहेलिकेचे दिलेले पुढील लक्षण बरेचसे संदिग्धच आहे– ' दुर्बोधाक्षरबन्धा च परुषा नामतः स्मृता । ' ( पुराण. I, १६-६ )

प्रकार–७

' संख्याता नाम संख्यानं यत्र व्यामोहकारणम् । '

( काव्यलक्षण ३/१०१ )

' ज्या प्रहेलिकेत वापरलेले एक, दोन इत्यादी संख्यावाचक शब्द विवक्षित अर्थाच्या प्रतीतीच्या आड येऊन श्रोत्याच्या मनाचा गोंधळ उडवून देण्यास कारणीभूत ठरतात, त्या प्रहेलिकेस **संख्याता** म्हणतात.' विवक्षित अर्थ अनुक्त असतो, परंतु तो उक्त संख्यावाचक शब्दांच्या साह्याने शोधून काढावयाचा असतो, तसा तो काढता येतो. म्हणजेच, उक्त संख्यावाचकेच अनुक्त विवक्षित अर्थाच्या बोधास कारणीभूत ठरत

असल्यामुळे, ह्या अर्थाने, ह्या प्रहेलिकेस **संख्याता** म्हणता येते. उदाहरणार्थ–

**‘ नासिक्यमध्या परितश्चातुर्वर्ण्यविभूषिता ।**
**अस्ति काचित् पुरी यस्यामष्टवर्णाव्हया नृपाः ॥ ’**

( तत्रैव, ३/११४, पृ. २४६ )

श्लोकार्थ असा– ‘ ज्या पुरीच्या म्हणजे नगरीच्या नावामध्ये नासिक्य म्हणजे नाकातून उच्चारला जाणारा वर्ण ( येथे ‘ ञ ’ हा वर्ण अभिप्रेत आहे) ती नासिक्यमध्या. जिच्या परितः म्हणजे सुरुवातीपासून अखेरीपर्यंत चार वर्णांचे भूषण आहे ती ‘ चातुर्वर्ण्यविभूषिता पुरी. ’ ज्या नगरीत आठ वर्णांचे नाव असलेले राजे राज्य करीत आहेत ती ‘ अष्टवर्णाव्हया पुरी ’ अशी कोणी एक नगरी आहे. ’ येथे ‘ काञ्ची ’ ही नगरी आणि त्या नगरीत राज्य करणारे ‘ पल्लव ’ हे राजे, असे दोन अर्थ विवक्षित आहेत. ‘ काञ्ची ’ शब्दाची घटना ‘ क् + आ + ञ् + च् + ई ’ लक्षात घेता ती नासिक्यमध्या व ‘ परितः चातुर्वर्ण्यविभूषता ’ आहे असे म्हणणे युक्तियुक्तच ठरते. तसेच ‘ पल्लवाः ’ शब्दात प् + अ + ल् + ल् + अ + व् + आ + विसर्ग’ असे आठ वर्ण असल्यामुळे ‘अष्टवर्णाव्हया[1] नृपाः हे म्हणणे देखील योग्यच ठरते. परंतु, ‘ चातुर्वर्ण्य ’ हा शब्द ब्राह्मणादी चार वर्णांचाही बोधक असल्यामुळे ऐकणाऱ्याच्या मनात संदेह निर्माण होतो. तसेच, अव्युत्पन्न श्रोता ‘ अष्टवर्णाव्हया शब्दाचा ‘ अष्टवर्ण ’ नावाचे राजे असा अर्थ लावून मोकळा होतो. ही चूक संख्येमुळेच होते, म्हणून ही संख्याता प्रहेलिका. तसेच विवक्षित अर्थ संख्येमुळेच ध्यानात येत असल्यामुळे ही ‘ संख्याता ’ प्रहेलिका ठरते. विष्णुधर्मोत्तरपुराणकाराने ह्या प्रहेलिकेचे जे ‘ संख्यामात्रसमानत्वात्संख्याताख्या तथोच्यते ॥ ’– ( पुराण I १६/६ ) असे लक्षण दिले आहे; त्यावरुन त्याची ह्या प्रहेलिकेविषयीची कल्पना दण्डीच्या कल्पनेहून वेगळी असावी असे वाटते.

**प्रकार ८**

**‘अन्यथा भासते यत्र वाक्यार्थः सा प्रकल्पिता ॥’**

( काव्यलक्षण ३. १०१, पृ. २४२ )

‘ ज्या प्रहेलिकेतील प्रयुक्त शब्दसमूहाचा अर्थ एक असून तो त्याहून विपरीत भासतो तीस ( अन्य अर्थाची कल्पना आणून देणारी असल्यामुळे ) **प्रकल्पिता** म्हणतात. उदा०–

**‘ गिरा स्खलन्त्या नम्रेण शिरसा दीनया दृशा ।**
**तिष्ठन्तमपि सोत्कम्पं वृद्धे ! मां नानुकम्पसे ॥ ’**

( तत्रैव, ३/११५, पृ. २४७ )

‘ हे वृद्ध स्त्री ! मी आपल्या व्याकुळ झालेल्या वाणीने, तुझे आराधन करण्यासाठी मस्तक लववून, दीनवाण्या दृष्टीने, थरथरा कापत, मोठ्या उत्कंठेने उभा आहे, तरी तू मजवर अनुग्रह का करीत नाहीस ’ हा वरील श्लोकात वापरलेल्या शब्दांपासून होणारा अर्थ झाला. परंतु, वक्त्याला तो अभिप्रेत नाही. तर ‘ हे लक्ष्मी ! दैवदुर्विलासामुळे ज्याच्या तोंडातून शब्दही फुटेनासा झाला आहे, ज्याने विनम्रतेने आपले मस्तक नमविले आहे, दारिद्र्यामुळे ज्याच्या दृष्टीतील आनंद मावळला आहे आणि जो अत्यंत क्षीण झाला आहे असा हा तुझा दास तुजसमोर उभा आहे. तरी तू त्याला प्रसन्न का होत नाहीस ? हा अर्थ विवक्षित आहे. हा अर्थ विवक्षित असूनही श्रोत्याला मात्र वरील वृद्धाविषयक अर्थाचा प्रतिभास होतो, म्हणून येथे प्रकल्पिता प्रहेलिका झाली आहे. समानरूपा प्रहेलिकेत ( वरील क्रमांक ५ ) शब्द गौण अर्थाने वापरलेले असल्यामुळे तेथे मुख्य अर्थाहून भिन्न अर्थाचा बोध होतो, म्हणजे त्या प्रहेलिकेत गौण–मुख्य–भाव असतो. प्रस्तुत प्रहेलिकेत तो नसतो. हा एक फरक. दुसरा फरक म्हणजे प्रस्तुत प्रहेलिकेतील शब्दांचे दोन–दोन अर्थ असतात; समानरूपेतील शब्दांचे विवक्षित अर्थ अनुमेय असतात. विष्णुधर्मोत्तरपुराणामध्ये ह्या प्रकारच्या

---

१. प्रस्तुत प्रहेलिकेत वापरलेले ‘ काञ्ची ’ व ‘ पल्लवाः’, हे दोन्ही शब्द दण्डीच्या कर्मभूमीची निश्चिती करण्यास उपयुक्त ठरतात. त्याच्या ग्रंथाचा प्राचीनतम टीकाकार रत्नश्रीज्ञान हादेखील ‘ चातुर्वर्ण्यविभूषिता ’ व ‘ अष्टवर्णाव्हया नृपाः ’ या शब्दांचे ‘ अत्र काञ्ची पुरी पल्लवाश्च तस्यां नृपा इति परमार्थः । ’ ( काव्यलक्षण, पृ. २४७ ) असेच स्पष्टीकरण करतो. त्यावरून त्याच्या मते तरी दण्डी हा काञ्चीच्या पल्लव राजांचा आश्रित होता, असे सूचित होते. दण्डीची कर्मभूमी हा विद्वानांमधील एक वादविषय आहे.

प्रहेलिकेस ' कल्पिता ' असे नाव देण्यात आले असून तिची व्याख्या अशी करण्यात आली आहे-- ' अर्थान्तराकल्पनया कल्पिता च तथोच्यते।' - पुराण. I, १६/७

प्रकार–९

' सा नामान्तरिता यस्या नाम्नि नानार्थकल्पना। '
(काव्यलक्षण ३/१०२)

' ज्या प्रहेलिकाच्या संज्ञेसंबंधी अनेक अर्थांच्या कल्पना होतात तीस नामान्तरिता म्हणतात. ' तिचे स्वरूप खालील उदाहरणावरून होईल.

" आदौ राजेत्यधीराक्षि ! पार्थिवः कोऽपि गीयते ।
सनातनश्च नैवासौ राजा नैव सनातनः ॥ "
(तत्रैव, ३/११६, पृ. २४७)

' हे चंचलाक्षी स्त्री ! प्रथमतः कोणी एक पृथ्वीपती राजा म्हणून ख्याती पावतो तो सनातनही (शाश्वतही) म्हणवला जातो. परंतु, हा राजाही नाही किंवा सनातनही नाही. ' मग हा कोण, असा प्रश्न साहजिकपणेच उपस्थित होतो. त्याचे उत्तरही वरील श्लोकातच दिलेले आहे. पार्थिव शब्दाचा, पृथ्वीपती ह्यांखेरीज वृक्ष असाही श्लिष्ट अर्थ होतो. त्यामुळे वरील श्लोकाच्या पूर्वार्धाचा पुढीलप्रमाणे अर्थ होतो.

' प्रथमतः कोणी एक वृक्ष राजा म्हणून ख्याती पावतो. परंतु, तो सनातन म्हणजे शाश्वत किंवा विष्णु नाही. तसेच तो ' स-न-अतन ' असाही नाहीच (ज्यामध्ये 'तन' शब्दाभाव नाही तो = सः न अ-तनः– म्हणजेच 'तन' शब्दयुक्त आहे) अर्थात् राजा + तन = राजातन. राजातन हे एका वृक्षविशेषाचे नाव आहे. या श्लोकात सनातन शब्दाचे प्राचीन, शाश्वत विष्णू व ज्यामध्ये ' तन ' शब्द नाही असे नाही तो, इतके विविध अर्थ कल्पिलेले आहेत. म्हणून हिला 'नामान्तरिता' प्रहेलिका म्हणतात. विष्णुधर्मोत्तरपुराणात हिचे लक्षण पुढीलप्रमाणे दिलेले आढळते– ' अन्यस्य संज्ञाव्यामोहान्नामान्तरितसंज्ञिता ॥ ' –पुराण I, १६/७.

प्रकार–१०

' निभृता निभृतान्यार्था तुल्यधर्मस्पृशा गिरा। '
(काव्यलक्षण, ३/१०२)

' विवक्षित तसेच अविवक्षित अशा दोन्ही अर्थांमध्ये राहणाऱ्या (म्हणजेच उभयसमान) धर्माच्या संयोगाने युक्त अशा शब्दप्रयोगाच्या द्वारे जेव्हा विवक्षित अर्थाहून दुसरा अर्थ व्यक्त होतो तेव्हा निभृता प्रहेलिका होते,' हा प्रस्तुत लक्षणपर कारिकेचा एक अर्थ झाला. ह्याच कारिकेचा आणखी एक अर्थ पुढीलप्रमाणे होऊ शकतो- विवक्षित अर्थासारख्या धर्माने युक्त शब्दप्रयोगाच्या द्वारे जेव्हा अप्रकट म्हणजेच गूढ असा अर्थ व्यक्त होतो तेव्हा निभृता प्रहेलिका होते. (एतद्विषयक आधार म्हणजे रत्नश्रीज्ञानाची पुढील टीका हा होय– ' तुल्यो वा विवक्षितेनार्थेन सदृशोधर्मो गुणोऽस्येति तुल्यधर्माणमर्थं स्पृशतीति तुल्यधर्मस्पृक्। ... तुल्यधर्मस्पृशा गिरा कारणेन निभृतः अप्रकटोऽन्यो गृहितार्थापेक्षया अर्थोऽभिधेयं यस्यामिति योज्यम्। ' – तत्रैव, पृ. २४२) उदाहरणार्थ—

' हृतद्रव्यं जनं त्यक्त्वा धनवन्तं वजन्ति काः ।
नानाभङ्गिशताकृष्टलोका वेश्या न दुर्धराः ॥
(तत्रैव, ३/११७, पृ. २४७)

अर्थात्, ' निर्धन मनुष्याचा त्याग करून पैसेवाल्याकडे कोण जातात ? (असा प्रश्न आहे. त्याचे उत्तर पुढील ओळीत दिले आहे ते असे-) विविध शृंगारचेष्टांच्या द्वारे शेकडो लोकांना स्वतःकडे आकृष्ट करणाऱ्या, दुर्निवार वेश्या नव्हेत, तर धनसंपदा. ' पूर्वार्धातील प्रश्नाचे अभीष्ट उत्तर ' वेश्या ' हे नसून ' धनसंपत्ती ' हे आहे. तेच वरील प्रश्नाचे बिनचूक उत्तर आहे. ' नानाभङ्गिशताकृष्टलोका ' हा तुल्यधर्म वेश्या व धनसंपत्ती ह्या दोहोंनाही लागू पडतो. म्हणून येथे वेश्या ह्या अर्थाहून ' धनसंपत्ती ' हा दुसरा वा गूढ (अप्रकट) अर्थ व्यक्त होत असल्यामुळे निभृता प्रहेलिका झाली आहे. प्रकल्पिता (वरील क्रमांक ८) प्रहेलिकेत विपरीत अर्थांच्या अवभासामुळे अन्यार्थाची कल्पना होत असते, शिवाय तीत द्व्यर्थी शब्दप्रयोग असतो, प्रस्तुत प्रहेलिकेत व्यक्त व गूढ अशा दोन्ही अर्थांना लागू पडणाऱ्या एका समान धर्माचे प्रत्यक्ष कथन असते, हा दोहोतील फरक आहे. विष्णुधर्मोत्तरपुराणातील ह्या प्रहेलिकेचे लक्षण अर्थदृष्ट्या स्पष्ट नाही. लक्षण असे आहे– ' अर्थव्यामोहतः प्रोक्ता निभृता च महानृप। ' (पुराण. I, १६/८) अर्थाचा व्यामोह प्रत्येक प्रहेलिकेत असतो, तेव्हा अर्थव्यामोहत्व हे तर प्रहेलिका ह्या उक्तिप्रकाराचे सामान्यलक्षण झाले. ते ' निभृता ' प्रहेलिकेचे विशेष

लक्षण ठरू शकत नाही. म्हणूनच वरील व्याख्या संदिग्ध वाटते.

प्रकार ११

**समानशब्दोपन्यस्तशब्दपर्यायसाधिता ।'**

(काव्यलक्षण ३/१०३, पृ. २४२)

' विवक्षित अर्थाच्या अनुरोधाने कल्पिलेल्या दुसऱ्याच शब्दांच्या साह्याने जेव्हा विवक्षित अर्थ साधलेला असतो तेव्हा **समानशब्दा** प्रहेलिका होते. समान (म्हणजे विवक्षित) अर्थाचे प्रकटीकरण करणारे शब्द वापरलेले असल्यामुळे ही समानशब्दा ठरते. उदाहरणार्थ—

**' जितप्रकृष्टकेशाख्यो यस्तवाभूमिसाह्वयः ।**
**असौ मामुत्कमधिकं करोति कलभाषिणी ॥'**

(तत्रैव, ३/११८, पृ. २४८)

अर्थात्, ' प्रकृष्ट (म्हणजे उत्कृष्ट) केशाची (म्ह. केसाची) आख्या (म्हणजे संज्ञा) आहे ज्याला तो जो प्रकृष्टकेशाख्य म्हणजे प्रवाल; त्याने जो जित (म्हणजे उपमित अर्थात् प्रवालाची उपमा ज्याला दिली जाते तो) तुझा हा (असौ) अधर; (ज्याला भूमी नाही तो अभूमिः, त्याच्यासारखी अर्थदृष्ट्या समान आहे आव्हा म्हणजे संज्ञा ज्याची तो अभूमिसाह्वयः म्हणजेच अधर) मला, हे मंजुभाषिणि ! समुत्सुक करीत आहे.' ह्या श्लोकात प्रवाल व अधर ह्या प्रसिद्ध कल्पनांसाठी अनेक पर्यायी शब्दांची कल्पना करून विवक्षितार्थ साधला आहे, म्हणून येथे समानशब्दा प्रहेलिका झाली आहे. प्रकल्पिता, निभृता व समानशब्द ह्या तीन प्रकारांतील अंतर स्वतःस्पष्ट असल्यामुळे त्यासंबंधी स्पष्टीकरण न करता विष्णुधर्मोत्तरपुराणातील प्रस्तुत प्रहेलिकेचे लक्षण उतरून घेऊ—

**समानशब्दा** कथिता तुल्यशब्दनिबन्धना ' ।

(पुराण. १६-८)

तुल्यशब्दनिबन्धना हा पुराणकाराचा शब्दप्रयोग ' उपन्यस्तशब्दपर्यायसाधिता ' ह्या दण्डीच्या शब्दप्रयोगाहून वेगळा आहे, हे उघड आहे. त्यामुळे पुराणकाराची एतद्विषयक कल्पना भिन्न असावी असे वाटते निदान त्याला निश्चितपणे काय अभिप्रेत होते, ते सांगणे शक्य नाही, एवढे जरूर म्हणता येते.

प्रकार—१२

**संमूढा नाम या साक्षान्निर्दिष्टार्थापि मूढये ॥ '**

(काव्यलक्षण, ३–१०३, पृ. २४२)

' जिच्यातील अर्थ प्रयुक्त शब्दांच्या अभिधा व्यापाराच्या द्वारे साक्षात् प्रतिपादिलेला असला तरी तत्त्वार्थाविषयी श्रोत्यांच्या मनात गोंधळच राहतो, तीस **संमूढा** प्रहेलिका म्हणतात. ' या प्रहेलिकेत सामान्यपणे असा एखादा शब्द वापरलेला असतो की, त्यातच सारी ' ग्यानबाची मेख ' असते. त्या शब्दामुळेच श्रोत्यांचा गोंधळ उडतो आणि त्याच शब्दामुळे गोंधळाचे निवारण होऊन तत्त्वार्थाचा बोधही होतो. हा चमत्कार कसा घडतो ते पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल—

**' शयनीये परावृत्य शयितौ कामिनौ रुषा ।**
**तथैव शयितौ रागात् स्वैरं मुखमचुम्बताम् ॥ '**

(तत्रैव, ३/११९, पृ. २४८)

अर्थात्, एकदा एक तरुण दांपत्य प्रेमकलहामुळे परस्परांपर रुष्ट होऊन शेजेवर एकमेकांकडे पाठ करून झोपले. आणि त्याच स्थितीत झोपून त्यांनी एकमेकांची प्रेमाने यथेष्ट चुंबने घेतली. दांपत्य एकमेकांकडे पाठ करून झोपले असता त्या दोघांनी परस्परांची चुंबने कशी घेतली असा प्रश्न येथे साहजिकच उत्पन्न होतो. त्याचे उत्तर ' तथैव ' ह्या शब्दातच दडलेले आहे. ' तथैव ' म्हणजे भांडणापूर्वी परस्परांकडे तोंड करून झोपलेल्या स्थितीतच हा अर्थ लक्षात घेतला की संदेहाचे निवारण होऊन वरील गोड कोड्याचा उलगडा होतो ! आणि हा उलगडा करणारा अर्थही ' तथैव ' ह्या प्रयुक्त शब्दाच्या अभिधा व्यापाराच्या द्वारे प्रतिपादिलेला असल्यामुळे येथे संमूढा प्रहेलिका झाली आहे.

विष्णुधर्मोत्तरपुराणकाराने ' व्यामूढा ' नामक प्रहेलिकेचे असे लक्षण केलेले आढळते— ' अर्थानुलोमदुर्बोधा व्यामूढेति तथोच्यते । ' (पुराण I, १६-९) हे लक्षण तितकेसे स्पष्ट नाही.

प्रकार १३—

**' योगमालात्मकं नाम यस्याः सा पारिहारिकी । '**

(काव्यलक्षण ३/१०४)

' जिची संज्ञा अनेक संबंधांच्या स्वरूपाची ती पारिहारिकी; म्हणजेच जिच्यात अनेक प्रसिद्ध नावांचा

उत्तरोत्तर-संबंधांमुळे परिहार होतो, ती **पारिहारिकी प्रहेलिका.** ह्या कोड्याचा उलगडा खालील उदाहरणानेच चांगल्या प्रकारे होऊ शकेल—

" **विजितात्मभवद्वेषिगुरुपादहतो जनः ।**
**हिमापहामित्रधरैर्व्याप्तं व्योमाभिनन्दति ॥** "
( तत्रैव, ३/१२०, पृ. २४८ )

अर्थात्, ' सूर्यकिरणांनी पोळून निघालेला मनुष्य मेघाच्छादित आकाशाचे आनंदनिर्भर अंतःकरणाने स्वागत करतो, ' हा वरील श्लोकाचा सारार्थ आहे. तो शब्दांची पुढीलप्रमाणे फोड करीत गेल्यानेच प्राप्त होतो —

'वि' ने म्हणजे गरुडाने, जित म्हणजे आत्मसात् केले. अन्न म्हणजे अमृत ज्याचे असा, तो इन्द्र ( = विजितान्नः ). त्यापासून झालेला तो विजितान्नभव म्हणजे इन्द्रपुत्र अर्जुन. त्याचा द्वेष करणारा तो कर्ण, त्याचा गुरु म्हणजे सूर्य, ह्याच्या पादांनी म्हणजे किरणांनी, हत म्हणजे संतप्त. थोडक्यात सूर्यकिरणांनी तापलेला. हिम म्हणजे बर्फ, त्याचा नाश करणारा तो ' हिमापहः ' म्हणजे अग्नी. त्याचा अमित्र अर्थात् शत्रू म्हणजे जल. ते धारण करणारे ते मेघ, त्यांनी व्याप्त म्हणजे मेघाच्छादित.

ह्या श्लोकामध्ये वापरलेल्या विजित शब्दाने अमृताच्या जाणिवेचे निवारण होते. तद्वत् पुढेही विजितान्न, विजितान्नभव, विजितान्नभवद्वेषी, विजितान्नभवद्वेषिगुरू, हिमापह, हिमापहामित्र, हिमापहामित्रधर ह्या शब्दांनी अनुक्रमे इन्द्र, अर्जुन, कर्ण, आदित्य, अग्नी, जल व मेघ यांच्या भानाचे निवारण होते. ह्या शब्दांचा परिहार वेगवेगळ्या शब्दातील परस्परसंबंधामुळे घडून येतो म्हणून हिला संबंधपारिहारिकी प्रहेलिका असेही म्हणतात. येथे संपूर्ण श्लोकाचा अर्थ लावण्यासाठी केवढा खटाटोप करावा लागतो, ते स्पष्टपणे दिसून येते. प्रमुषिता ( वरील क्रमांक ४ ) प्रकारात श्लोकात वापरलेले सर्व शब्द जरी दुर्बोध असले तरी त्यांचा परस्परसंबंधामुळे परिहार होत नसतो. संख्याता प्रहेलिकेत संख्येमुळे गूढता आलेली असते. नामान्तरितेमध्ये एकाच शब्दाचे अनेक अर्थ संभवत असल्यामुळे ऐकणाऱ्याच्या मनात संदेह उत्पन्न होतो. समानशब्दा प्रकारातही पारिहारिकीतल्याच प्रमाणे शब्दांचे विग्रह करीत जाऊन विवक्षित अर्थ शोधून काढावा लागत असतो हे जरी खरे असले तरी शब्दांचा परस्पर-परिहार होत नसतो हा ह्या सर्व प्रहेलिकांमधील फरक आहे. विष्णुधर्मोत्तरपुराणकाराने परिहासिका म्हणून जिचे पुढीलप्रमाणे लक्षण केले आहे ती परिहासिका व दण्डीची पारिहारिकी सारख्याच वाटतात-

' कल्पनागोपितार्थात्तु कथिता परिहासिका । – '
पुराण– I. १६/५.

प्रकार १४–

' **एकच्छन्नाश्रितं व्यज्य यस्यामाश्रयगोपनम् ॥** '
( काव्यलक्षण ३/१०४, पृ. २४३ )

अर्थ– ' जिच्यामध्ये आश्रितरूप ( म्हणजेच आधेयस्वरूपी ) पदार्थाचे स्पष्ट शब्दात कथन करून आश्रयरूप ( म्हणजेच आधारस्वरूपी ) पदार्थ दडवलेला असतो तिला ( आश्रय व आश्रित ह्या दोहोंपैकी फक्त आश्रित ह्या एकाचेच गोपन असल्यामुळे ) एकच्छन्ना प्रहेलिका म्हणतात.' हिच्या स्पष्टीकरणासाठी दण्डीने खालील उदाहरण दिले आहे–

' **न स्पृशत्यायुधं जातु न स्त्रीणां स्तनमण्डलम् ।**
**अमनुष्यस्य कस्यापि हस्तोऽयं न किलाफलः ॥** '
( तत्रैव, ३/१२१, पृ. २४९ )

कोण्या एका मानवेतराचा हा हात कोणत्याही शस्त्राला कधीसुद्धा स्पर्श करीत नाही, तसेच स्त्रियांच्या स्तनमंडलालाही शिवत नाही. असे असूनही (म्हणजेच फलस्वरूपी कर्माने रहित असूनही ) तो निष्फळ नाही ( किंबहुना तो सफलच आहे, अशी आमची दृढ धारणा आहे.) येथे हात हा त्या कोण्या एका मनुष्येतराचा आश्रितरूप पदार्थ स्पष्ट शब्दात सांगितला आहे. परंतु, त्या हाताच्या मालकाची स्पष्टपणे वाच्यता केलेली नाही. तो मालक म्हणजे एरंडाचे झाड ( गन्धर्वहस्त=एरण्डवृक्ष ) हा होय. एरंडवृक्ष कधी आयुधाला स्पर्श करीत नाही किंवा स्त्रियांच्या स्तनाला शिवत नाही. परंतु, त्याला फळे लागत असल्यामुळे तो निष्फळ नसतो, सफल अवश्य असतो. ही प्रहेलिका आधार-आधेय-भावावर आधारित असल्यामुळे पूर्वोक्त सर्व प्रकाराहून भिन्न ठरते. म्हणूनच दण्डीने हिचे स्वतंत्रपणे लक्षणोदाहरण दिले आहे. हिचा तसेच हिच्यानंतर दण्डीने

वर्णिलेल्या उभयच्छन्ना ह्या दोन्ही प्रकारांचा विष्णु-धर्मोत्तरात 'एकोभयबहुच्छन्ने यथार्थपरिगोपिते।'—पुराण. I १६-१०, असा एकत्र निर्देश केलेला आढळतो.

प्रकार १५

'सा भवेदुभयच्छन्ना यस्यामुभयगोपनम् ॥'

(काव्यलक्षण ३-१०५, पृ. २४३)

ह्या कारिकार्धाचा पूर्वोक्त कारिकार्धाशी संबंध लावून असा अर्थ होतो— 'जिच्यामध्ये आश्रित तसेच आश्रय ह्या दोहोंचे गोपन केलेले असते ती उभयच्छन्ना समजावी.' उदाहरणार्थ—

केन कः सह सम्भूय सर्वकार्येषु सन्निधिम्।
लब्ध्वा भोजनकाले तु यदि दृष्टो निरस्यते ॥

(तत्रैव, ३-११२, पृ. २४९)

अर्थात्, दुसऱ्या एका पदार्थाबरोबर उत्पन्न होऊन, त्या दुसऱ्या पदार्थाच्या सान्निध्यात सर्व कार्यात राहून, जर जेवणाच्या वेळी दिसला तर जो दूर फेकला जातो, असा पदार्थ कोणता ? ह्या प्रश्नात्मक प्रहेलिकेत आश्रय व आश्रित ह्या दोहोंना दडवले आहे. वरील श्लोकातील 'कः' शब्दाचा 'कस्य मस्तकस्य अयं केशः' असा उलगडा करावयाचा असून 'केन' म्हणजे 'मस्तकेन' असा अर्थ ग्रहण करावयाचा आहे. केस डोक्यावर उत्पन्न होतात व स्नान करणे, अलंकार वा फुले धारण करणे इत्यादी सर्व कार्यामध्ये डोक्याच्या समीपच असतात. परंतु, जेवताना पानात केस आढळला तर मात्र तो पानाबाहेर टाकून दिला जातो, हेच येथे सांगितले आहे. आधार (मस्तक) व आधेय (केस) ह्या दोन्ही पदार्थांचे गोपन येथे केलेले असल्यामुळे येथे उभयच्छन्ना प्रहेलिका झाली आहे.

प्रकार १६

'संकीर्णा नाम सा यस्यां नानालक्षणसंकरः ॥'

(काव्यलक्षण, ३/१०५, पृ. २४३)

अर्थ— 'समागतादी अनेक प्रकारच्या प्रहेलिकांच्या संकराला (एकत्र अवस्थानाला) संकीर्णा प्रहेलिका असे म्हणतात.' थोडक्यात अनेक प्रकारच्या प्रहेलिकांचे मिश्रण म्हणजे संकीर्णा प्रहेलिका होय; अनेक अलंकारांच्या संयोगाला भामह (भामहालंकार ३/४९-५२), उद्भट (कासार ६/५), वामन (सूत्रवृत्ति पृ. ७५) इत्यादी सर्व आलंकारिक 'संसृष्टी' म्हणतात. दण्डीने एकस्थानेच त्याचा संकीर्ण शब्दाने उद्देश केला आहे— 'सहोक्तिः परिवृत्त्याशीः संकीर्णमथ भाविकम्।—' (काव्यलक्षण २/७). परंतु, ह्या अलंकाराचे लक्षणासह निरूपण करताना मात्र त्यांनेही संसृष्टी ह्याच शब्दाचा प्रयोग केला आहे (पाहा, तत्रैव, २/३५७-३५८). अलंकारांच्या संसृष्टीच्या धर्तीवरच दंडीने प्रहेलिकांच्या संकराची कल्पना केलेली दिसते. तिचे दंडीने दिलेले उदाहरण असे—

'सहया सगजा सेना सभटेयं न चेज्जिता।
अमातृकोऽयं मूढः स्यादक्षरज्ञस्तु नः सुतः ॥'

(तत्रैव, ३/१२३, पृ. २५०)

'घोडदळ, गजदळ यांनी युक्त आणि जीत अनेक लढवय्ये योद्धे आहेत अशी ही शत्रुसेना जिंकली गेली नाही तर आमचा हा पुत्र शिकलेला-सवरलेला असूनही मातेपासून न जन्मलेला आणि मूढच म्हणावा लागेल,' हा वरील श्लोकामधील शब्दापासून निघणारा व वरकरणी प्रतीत होणारा अर्थ झाला. परंतु, तत्त्वार्थ असा आहे-ह आणि य या वर्णांनी, ग आणि ज ह्या वर्णांनी तसेच इ व न आणि भ व ट ह्या वर्णांनी युक्त अशी ही वर्णमाला आमच्या ह्या पुत्राने आत्मसात् केली नाही तर संपूर्ण वेद मुखोद्गत करूनही हा पुत्र अक्षर-ओळख नसल्यामुळे मूर्खच ठरेल. कोणी एक पिता आपल्या अक्षरशत्रू लेकराविषयी काळजीत पडलेला असून वरील उद्गार काढीत आहे! ह्या श्लोकात नामान्तरिता प्रहेलिकेशी वञ्चिता प्रहेलिकेचा संयोग झाला असल्याचे खुद्द दण्डीनेच पुढील कारिकेत प्रकट केले आहे—

'सा नामान्तरितामिश्रवञ्चितारूपयोगिनी।
एवमेवेतरासामप्युन्नेयः संकरक्रमः ॥

तत्रैव, ३/१२४, पृ. २५०.

वरील श्लोकामधील 'मातृका' शब्दाच्या बाबतीत सहया, सगजा इत्यादी शब्दप्रयोगांच्यामुळे अनेक कल्पना मनात उत्पन्न होतात त्यामुळे येथे नामांतरिता प्रहेलिका (वरील क्रमांक ९) झाली आहे. तिच्यामध्ये वञ्चिता प्रहेलिका, मूढ व अक्षरज्ञ ह्या शब्दाच्या अर्थामुळे होणाऱ्या वंचनेमुळे,

मिसळून गेली आहे. वरील उदाहरणात नामांतरिता-वंचिता-संकराचेच वर्णन केलेले आहे. ह्याच पद्धतीने इतरही प्रहेलिकांचा संकर वाचकाने आपल्या कल्पनेने जाणावा असे दण्डीने येथे ' ऊह्य ' नामक तंत्रयुक्तीच्या द्वारे सुचवले आहे. (' अत्र यदनिर्दिष्टं युक्तिगम्यं तदूह्यमिति । ' – पुराण– I, अध्याय ६, पृ. १३ )

वरील पद्धतीने दण्डीप्रोक्त एकूण १६ प्रहेलिकाचे Permutations & Combinations च्या 16c2 ह्या नियमानुसार एकूण १२० संकर–प्रकार होतील. ही कल्पना बुद्धिमान अभ्यासकाच्या कक्षेतील असल्यामुळे आणि इतक्या सर्व प्रकाराचे उदाहरणांद्वारे निरूपण करण्याने ग्रंथाचा निष्कारण विस्तार होणार असल्यामुळे दण्डीने तसे करण्याचे टाळले आहे.

विष्णुधर्मोत्तरपुराणामध्ये संकीर्णा प्रहेलिकेचे लक्षण पुढीलप्रमाणे केलेले आढळते–– ' संकीर्णा संभवोपेता या तदर्थकरी भवेत् । ' ( पुराण– I. १६/१० )

पुराणकाराने निरूपिलेल्या प्रहेलिकांचे दण्डीच्या कोणत्या प्रहेलिकांशी साम्य आढळते ते वर वेळोवेळी दाखवलेच आहे. परंतु वरीलखेरीज आणखी काही प्रहेलिकांची लक्षणे मात्र पुराणकाराने दिली आहेत. ती अशी–

( अ ) ' यस्यां मात्रावशादर्थो गोप्यते सा **समात्रता** । ' ( तत्रैव, १६/३ )

( आ ) **गूढाख्या** कथिता वृत्ते नानाबन्ध-
निबन्धना ।। ( तत्रैव, १६–९ )

( इ ) ' **तदर्थकारी** यत्रार्थो ज्ञायतेऽन्यार्थकारकः ।
' राजञ्शब्दवशात्सा च कथिता **व्यभि-
चारिणी** ॥ ' ( तत्रैव १६–११ )

( ई ) ' उक्तेऽर्थे वृत्तबन्धेन मात्राभिः ख्यापिता
तु या ।
**नष्टार्था** वा [क्] च सा प्रोक्ता वृत्तबन्धनिदर्शिता ॥'
( तत्रैव १६–१२ )

( उ ) ' **नष्टाक्षरा** तु कथिता बिनैकेन तदर्थता । '
( तत्रैव, १६–१३ )

( ऊ ) '**अन्यार्थता** तथैवोक्ता वर्णभ्रष्टा नरेश्वर ॥ '
( तत्रैव )

( ए ) 'कालस्य रूपरूपाणां व्याख्यानेन तदर्थता । '
( तत्रैव १६–१४ )

(ऐ) ' बीजमात्रेण लेशाख्या भूमिपाल प्रकीर्तिता ॥'
( तत्रैव )

वरीलपैकी ( अ ) चा समावेश दण्डीने निरूपिलेल्या समागता ( वरील क्रमांक १ ) ह्या प्रहेलिका प्रकारामध्ये होऊ शकतो. दण्डीने प्रहेलिका-निरूपणात छन्दाचा ( म्हणजेच वृत्ताचा ) कोठेही उल्लेखसुद्धा केलेला नसल्यामुळे वरीलपैकी ( आ ) व ( ई ) या दोन प्रकारांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करावे लागेल, वरील (इ) हा प्रकार कर्त्रादिकारकाच्या साह्याने साधला जात असल्यामुळे तोही पृथक्च मानला पाहिजे. तरी देखील दण्डीप्रोक्त समागता ( वरील क्रमांक १ ) मध्ये क्वचित् त्याचा अन्तर्भाव करता येईल. वरील ( उ ), ( ऊ ), ( ए ) व ( ऐ ) ह्या चार प्रकारांचा समावेश दण्डीकृत व्यवस्थेमध्ये कोठेच होत नसल्यामुळे त्यांचे स्वतंत्र प्रकार ह्या नात्याने ग्रहण करण्यावाचून गत्यंतर नाही. एकंदरीने पुराणकाराने प्रतिपादिलेल्या प्रहेलिकांची संख्या तर अधिक आहेच, पण त्याशिवाय त्याने दिलेली वेगवेगळया प्रहेलिकांची लक्षणेही दण्डीप्रोक्त लक्षणांहून निराळी आहेत. पुराणकाराने दिलेली लक्षणे अतिसंक्षिप्त अतएव संदिग्ध आहेत आणि त्याने स्वतःच्या विवेचनाच्या स्पष्टीकरणार्थ उदाहरणेही दिलेली नाहीत ह्या दोन्ही बाबी जमेस धरूनही असेच म्हणावे लागेल की, पुराणकाराने आपल्या विवेचनासाठी आदर्श मानलेला संदर्भग्रंथ दण्डीने आधारभूत मानलेल्या ग्रंथाहून भिन्न असावा.

## ' दुष्ट प्रहेलिका '

दण्डीने सोळा प्रहेलिकांची क्रमशः लक्षणे सांगितल्यावर ' दुष्ट ' प्रहेलिकांसंबंधी जे संक्षिप्त विवेचन केले आहे त्याचा थोडक्यात परामर्श घेऊन, येथवर केलेल्या प्रहेलिका-विषयक चर्चेचे सार सांगून हा बराच लांबलेला लेख संपवावयाचा आहे. दुष्ट प्रहेलिकांविषयी दण्डी म्हणतो–

' **दुष्टप्रहेलिकाश्चान्यास्तैरधीताश्चतुर्दश** ॥ '
( काव्यलक्षण ३/१०६, पृ. २४३ )

' **दोषानपरिसंख्येयान् मन्यमाना वयं पुनः** ।
साध्वीरेवाभिधास्यामस्ता दुष्टा यास्त्वलक्षणाः ॥ '
(तत्रैव, ३/१०७ पृ. २४४ )

अर्थात् , "(ज्या पूर्वाचार्यांनी वरील सोळा प्रकारच्या प्रहेलिकांचे प्रतिपादन केले आहे ) त्या पूर्वाचार्यांनी

आणखी चौदा दुष्टप्रहेलिकांचेही निरूपण केले आहे. परंतु, आम्ही (तसे निरूपण येथे टाळले आहे, कारण) प्रहेलिकांचे दोष परिगणनीय नाहीत असे मानणारे असल्यामुळे केवळ अदुष्ट (म्हणजे शुद्ध) प्रहेलिकांचेच लक्षण– उदाहरणांसह विवेचन करू. लक्षणरहित त्या दुष्ट प्रहेलिका होत- "

दण्डीचे वरील सर्वच उद्गार महत्त्वाचे आहेत. दण्डीच्या पूर्वी होऊन गेलेल्या शास्त्रकारांनी ' अदुष्ट ' १६ + ' दुष्ट ' १४ = ३० प्रहेलिकांचे निरूपण केलेले होते, असे स्पष्टपणे प्रतीत होते. वर पुराणकाराने एकूण दण्डीप्रोक्त १६ + स्वतंत्र ८ मिळून एकूण २४ प्रहेलिकांचे विवेचन केल्याचे दाखवलेच आहे. ह्यावरून दण्डीच्या पूर्वाचार्यांची विचारसरणी भिन्न होती आणि पुराणकाराच्या पूर्वाचार्यांची विचारधारा वेगळी होती, असेच अनुमान निघते. पुराणकाराने ' अदुष्ट ' व ' दुष्ट ' असे प्रहेलिकांचे दोन प्रकारभेद प्रतिपादिलेले नाहीत, ही बाबही ह्या अनुमानास बळकटी आणून देणारी आहे. दण्डीचे हे ' पूर्वाचार्य ' कोण त्याचा खुलासा रत्नश्रीज्ञानाने आपल्या टीकेत पुढील शब्दांमध्ये केला आहे- ' एता यथोक्तलक्षणाः षोडश प्रहेलिका निर्दिष्टा उक्ताः पूर्वाचार्यैः रामशर्मादिभिः । ' (काव्यलक्षण, पृ. २४४). काव्यलक्षणातील २/७ ह्या कारिकेच्या उत्तरार्धातील ( ' इति वाचामलङ्काराः स्मर्यन्ते पूर्वसूरिभिः । ' ) ' पूर्वसूरिभिः ' पदाचे स्पष्टीकरण करताना रत्नश्रीज्ञान लिहितो– ' पूर्वसूरिभिः आद्यैराचार्यैः रामशर्मादिभिः काव्यालङ्कारकारैः । ' ( काव्यलक्षण, पृ. ६९ ) ह्याच रामशर्मांचा भामहाने आपल्या ग्रंथामध्ये पुढील दोन स्थळी उल्लेख केला आहे—

' **नानाधात्वर्थगम्भीरा यमकव्यपदेशिनी ।**
**प्रहेलिका सा ह्युदिता रामशर्माच्युतोत्तरे ॥** '
( भामहालंकार २/१९, पृ. ३७ )

' स पतीवासः प्रगृहीतशार्ङ्गो
मनोज्ञभीमं वपुराप कृष्णः ।
शतन्हदेन्द्रायुधवान्निशायां
संसृज्यमानः शशिनेव मेघः ।।' ५८ ।।
रामशर्मणः । ( तत्रैव, पृ. ५३ )

भामह व रत्नश्रीज्ञान ह्या दोघांनी रामशर्मासंबंधी केलेले उल्लेख संकलित केले तर रामशर्माविषयी पुढील अनेक अनुमाने संभवतात– ( अ ) रामशर्मा हा भामह व दण्डी ह्या दोघांचा पूर्वसूरी होता. ( आ ) तो भामह–दण्डीसारखाच काव्यशास्त्रकार होता; (इ) त्याच्या शास्त्रीय ग्रंथाचे नाव काव्यालङ्कार असावे; (ई) त्या ग्रंथातच त्याने गुण, अलंकार इ० काव्यशास्त्रीय विषयांच्या जोडीला प्रहेलिकांचेही निरूपण केलेले असावे; ( उ ) त्याने ' अच्युतोत्तर ' नावाचा काव्य–ग्रंथ लिहिला असावा व त्यात केवळ प्रहेलिकांचीच उदाहरणे असावीत; (ऊ) किंवा त्याने आपल्या काव्यालङ्कारपर ग्रंथाला ' अच्युतोत्तर ' ( सुब्रह्मण्यकृत यशवन्तयशोभूषण,' रामकर्णरचित ' यशोवन्तयशोभूषण ' – KSP, P. 429, विद्यानाथकृत ' प्रतापरुद्रयोभूषण ' – Ibid, pp. 293-295 ह्या नावांच्या धर्तीवर ) असे नाव दिले असावे आणि त्यामध्ये गुणालंकारादी विषयांबरोबरच प्रहेलिकांचेही विवेचन केले असावे. (ए) दण्डीने रामशर्मा नावाच्या ज्या आपल्या विद्वान मित्राचा उल्लेख अवन्तिसुन्दरीकथेमध्ये केला आहे,[१] तो रामशर्मा रत्नश्रीज्ञानाने उल्लेखिलेला काव्यालंकारकार रामशर्माच असावा. ( ऐ ) रत्नश्रीज्ञानाच्या वरील विधानावरून दण्डीने आपले प्रहेलिका-निरूपण रामशर्मांच्या आधाराने केलेले असल्याचे लक्षात घेता, रामशर्मांची परंपरा विष्णुधर्मोत्तरपुराणकाराच्या परंपरेहून निराळी आहे, हेही अनुमित होते. दण्डीच्या काव्यलक्षणातील ३/१०६ ह्या कारिकेच्या वर उद्धृत केलेल्या उत्तरार्धाची चिकित्सा येथवर केली. आता दण्डीच्या उपर्युद्धृत ३/१०७ ह्या कारिकेचा परामर्श घेऊ.

दण्डीची ती कारिका वाचून प्रहेलिकेचे दोष अपरिसंख्येय का मानले आहेत, ते अगणनीय ठरत असतील तर अपार्थादी दोषही तसेच का ठरू नयेत, अशा शंका चिकित्सकाच्या मनामध्ये उत्पन्न होतात.

१. " In the Avantisundari, there is a reference to one Rāmas'armā, a learned friend of its author Dandin but he is not known to have written any poem. " VHSL, p. 176

त्यांचे कल्पनापूर्वक निरसन रत्नश्रीज्ञानाने पुढील शब्दांमध्ये केले आहे–

" वयं पुनः । विशेषविवक्षायां पुनः शब्दः । दोषाः प्रहेलिकासम्भाविनः हेयाः प्रहेलिका [ श्च ] अपरिसंख्येयाः । न लक्षणतो न लक्ष्यतश्च गुणवदादरेणाप्रतिपाद्यान् मन्यमानाः पश्यन्तः साध्वीरेव प्रहेलिका अभिधास्यामः ।

नन्वेवमपार्थादयोऽपि दोषा अपरिसंख्येयाः स्युः, विशेषहेत्वभावात् ? नैतदेवम् । अपार्थादयो हि दोषा क्वचिद् गुणा अपि । यद्वक्ष्यति–

तन्मत्तोन्मत्तबालानामुक्तेरन्यत्र दुष्यति । [३.१२८] इत्यादि । ततस्ते चिन्तनीयाः । प्रहेलिकादोषास्तु न क्वचिद् गुणा अपि, यतोऽपार्थादिवन्निरूपणीयाः स्युः । अतश्च अपार्थादयो वक्तव्या यतः सर्वकाव्यसम्भविनस्ते दोषाः । प्रहेलिकादोषास्तु प्रादेशिका इत्याशयवता उक्तम् – दोषानित्यादि । यद्वा, प्रहेलिकादोषा अपरापरदोषसम्भवेन चतुर्दशेति इयत्तया अपरिसंख्येयाः । ततश्चातिप्रसङ्गान्नोच्यन्ते इत्यभिप्रायेणोक्तम्– दोषानित्यादि । अपार्थादयस्तु सर्वकाव्यदोषाः परिसंख्या [ ताः ] । तथैव न तद्वचनेऽतिप्रसङ्ग इति चाकूतम् । अत एवाभिधास्यतिदोषा दशैव [ ३.१२६ ] इति । कथं तर्हि दुष्टप्रहेलिका ज्ञायन्त यथा [ 109b ] वर्ज्येरन् । न हि दुष्टतया अज्ञातानां परिहारः संभवतीत्याशङ्क्य तत्प्रत्युपायमाह– याः प्रहेलिकाः । तुशब्दः अर्थान्तरविवक्षायाम् । यथोक्तलक्षणविरहात् न विद्यते लक्षणमासामित्यलक्षणाः, ताः स्वयमेव दुष्टा ज्ञायन्ते । प्रतिनियतलक्षणव्युत्पत्तेः, अतल्लक्षणानां तदाभासताप्रतिपत्तेः । किं तासां प्रपञ्चप्रयासेनेति ? " ( काव्यलक्षण, पृ. २४४–२४५ )

अर्थात्–– 'दण्डीला पूर्वाचार्यांहून काहीतरी विशेष प्रतिपादन करावयाचे असल्यामुळे त्याने उपर्युक्त कारिकेत ' पुनः ' शब्द वापरला आहे. प्रहेलिकांमध्ये संभवणारे दोष मोजदाद करण्याजोगे नाहीत. काव्यातील गुण जसे आदराने प्रतिपादनीय असतात तसे प्रहेलिकादोष असतात असे आम्ही मानीत नाही, त्यामुळे त्यांची आम्ही लक्षणेही सांगितलेली नाहीत, तसेच उदाहरणेही दिली नाहीत. म्हणून आम्ही फक्त निर्दोष प्रहेलिकांचेच विवेचन करू.

मग का हो, अपार्थ, व्यर्थ इत्यादी दहा काव्यदोषांचे तुम्ही पुढे ( काव्यलक्षण ३/१२५ ते १८५ ) उद्देशपूर्वक लक्षणे देऊन आणि उदाहरणे. तसेच अपवाद उद्धृत करून विस्ताराने जे विवेचन केले आहे, त्याचे प्रयोजन काय ? कारण सांगून– सवरून अपार्थादी दोष दोष होत, त्यांची गणना ती काय करावयाची ? गणना करण्यास तसे काही विशेष कारण दिसत नाही. परंतु हे ( पूर्वपक्षाचे ) म्हणणे युक्त नाही ( इति ग्रंथाकार ) कारण अपार्थादी दोष क्वचित्प्रसंगी गुणदेखील होतात ( आणि म्हणून ते सादर प्रतिपाद्य ठरतात, हा ग्रंथकाराचा अभिप्राय ). म्हणूनच तर पुढे एके ठिकाणी म्हटले आहे की, अपार्थ उक्ती मत्त, उन्मत्त व बाल यांच्या तोंडी शोभते, एरव्ही दोषास्पद होय. म्हणून दोष चिन्तनार्ह ठरतात. प्रहेलिकादोष हे सर्वदा दोषच असतात, ते अपार्थादींप्रमाणे क्वचित्स्थळी गुणरूपसुद्धा पावत नाहीत, म्हणूनच ते निरूपण करण्याच्या लायकीचे नाहीत. म्हणूनच अपार्थादी दोषांचे विवेचन करावयाचे कारण ते सर्व काव्यामध्ये संभवतात. प्रहेलिकादोषा हे प्रादेशिक[1] ( म्हणजे फक्त त्या त्या काव्यभागात राहणारे ) असतात अशी कल्पना करून 'दोषानपरिसंख्येयान्...' असे ग्रंथकार म्हणतात. अथवा ग्रंथकारांच्या उक्तीचा वेगळयाही पद्धतीने अर्थ लावता येईल, तो असा– प्रहेलिकादोष हे एकामधून दुसरा, त्यामधून तिसरा असे उद्भवत असल्यामुळे प्रहेलिकादोष चौदाच असे निर्धारण करता येणार नाही ( म्हणजेच प्रहेलिकादोष असंख्य, अनेक वा अगणित संभवतात. वर अपरिसंख्येय शब्दाचा 'परिगणनास अयोग्य असा अर्थ केला होता, येथे 'अगणित' असा अर्थ केला आहे, हा दोहोमधील फरक आहे. ) तेव्हा अतिप्रसंगा-

---

१. रत्नश्रीज्ञानाने प्रादेशिक व प्राबन्धिक ह्या कल्पनांचा उल्लेख दण्डीच्या भाविकत्व अलंकारावरील कारिकांवर ( काव्यलक्षण २/३६२-३६३ ) वृत्ती लिहितांनाही पुढील शब्दांत केला आहे– " तथापि यो भाव [ : ] प्राबस्थिको विशिष्टः, तदायत्तमिह भाविकमभिप्रेतम् । ... जात्यादिकं तु प्रादेशिकभावाधानम् । " तत्रैव, पृ. १९८

मुळे ते अगणित दोष निरूपिले जात नाहीत हा अभिप्राय मनात बाळगून ग्रंथकारांनी ' दोषानपरिसंख्येयान् ... ' इत्यादी उद्गार काढले आहेत. सर्वकाव्यदोष जे अपार्थ इत्यादी आहेत त्यांची गणती केली आहे. म्हणून ती गणती करण्यात अतिप्रसंग नाही. म्हणूनच दोष दहाच असे निश्चयात्मक विधान केले आहे. पण मग प्रश्न असा उपस्थित होतो की, दुष्टप्रहेलिका वर्ज्य म्हणून ओळखावयाच्या कशा ? त्यांच्या वर्ज्यतेचे गमक काय ? ह्या शंकेचे उत्तरही ग्रंथकारांनी स्वतःच ' दुष्टा यास्त्व-लक्षणाः ' या शब्दांमध्ये दिले आहे. येथे ' तु ' शब्द भिन्न अर्थाची विवक्षा असल्यामुळे वापरलेला आहे. यथोक्त लक्षणांच्या अभावी प्रहेलिका दुष्ट समजाव्यात. त्यांच्यामध्ये लक्षण विद्यमान नसल्यामुळे त्यांचा आपल्या आपणच बोध होतो. प्रत्येक प्रहेलिकेच्या लक्षणाचे यथार्थ आकलन झाले की, त्या लक्षणाचा अभाव अस-लेली प्रहेलिका ही ' प्रहेलिका ' नसून केवळ 'प्रहेलिका'-भास होय, हे त्वरित लक्षात येईल. अशा प्रकारे जिचे स्वरूप सुगम्य आहे तिचे विस्ताराने विवेचन करण्याचा खटाटोप कशाला करावयाचा ?' एवंच रत्नश्रीज्ञाने प्रहे-लिकादोषाची वर्ज्यता अगण्यता व अगणितता अशी दोन वेगवेगळया कसोट्यांच्या आधारे निश्चित केली आहे. तसेच, प्रहेलिकादोष प्रादेशिक असून अपार्थादी दोष प्राबन्धिक असतात असा महत्त्वाचा खुलासाही केला आहे. अशा प्रकारे पूर्वाचार्यांनी प्रतिपादिलेल्या ' दुष्ट ' प्रहेलिका दण्डीच्या मती अप्रतिपादनीय ठरतात.

## निष्कर्ष

येथवर प्रहेलिका ह्या रचनाप्रकाराविषयी जे विस्ता-राने विवेचन केले त्यामधून हाती आलेले प्रमुख निष्कर्ष खाली संकलित केले जात आहेत–

१. प्रहेलिका म्हणजे शब्दकोडी किंवा उखाणे होत. हा एक कृत्रिम काव्य-प्रकार आहे.

२. प्रहेलिकेला दृष्टकूट, कूटप्रश्न, कूटार्थभाषितवाक्य आणि नालिका असेही म्हणत असत.

३. प्रहेलिका हा बौद्धिक रंजनप्रकार वैदिक काळा-पासून चालत आला आहे.

४. विष्णुधर्मोत्तरपुराणाच्या काळाच्या आसपास ह्यास एक काव्यप्रकार म्हणून प्रतिष्ठा लाभली.

५. प्रहेलिकेचा खरा व खंदा पुरस्कर्ता (शास्त्रज्ञ) दण्डी हाच होय.

६. दण्डीनंतरच्या काळात प्रहेलिकेची ' एक काव्य-रचनाप्रकार ' ह्या नात्याने लोकप्रियता घसरगुंडीस लागून १४ व्या शतकाच्या आसपास कायमची नष्ट झाली.

७. विद्वानांच्या काव्यशास्त्रविनोदाची आनंददाय-कता वाढवणे, भाषणाची गुप्तता टिकवून धरणे आणि दुसऱ्याची बौद्धिक कुवत अजमावून क्षणभर त्याला नामोहरम करणे, अशी प्रहेलिकेची त्रिविध प्रयोजने दंडीने सांगितली आहेत.

८. प्रहेलिका एका किंवा फार तर दोन श्लोकात रचिलेली असते. तीत अश्लील कल्पना कटाक्षाने टाळलेल्या असतात.

९. दंडीने समागता, वंचिता इत्यादी एकूण सोळा ' अदुष्ट ' प्रहेलिकांची लक्षणे दिली असून प्रत्येकीचे एकेक उदाहरण दिले आहे.

१०. विष्णुधर्मोत्तरपुराणकाराने दंडीपेक्षा आणखी ८ प्रहेलिकांची लक्षणे दिली आहेत परंतु, त्याने एकही प्रहेलिका-प्रकाराचे उदाहरण दिले नाही.

११. दण्डी व विष्णुधर्मोत्तरपुराण हे दोन्ही ग्रंथ प्रहेलिकांच्या बाबतीत भिन्न विचारसरणींचे अनुकरण करीत असल्याचे स्पष्टपणे दिसते.

१२. दण्डीपूर्वकालीन रामशर्मप्रभृती विचारवंतांनी स्वीकारलेल्या अधिकच्या १४ ' दुष्ट ' प्रहेलिका दंडीने, प्रहेलिका-दोष अगणनीय व अगणित असल्यामुळे, मानल्या नाहीत.

१३. लक्षणरहित प्रहेलिका ती ' दुष्ट प्रहेलिका ' असे दंडीचे मत होते.

१४. प्रहेलिका हा प्राचीनांचा बौद्धिक क्रीडा-प्रकार, त्यांच्या काव्य-नाटकांइतकाच, विदग्ध होता.

१५. प्रहेलिकांवरूनही प्राचीन भारतीयांच्या मान-सिक सुसंस्कृतपणाची आणि बौद्धिक उंचपणाची अट-कळ बांधता येते.

## संक्षेपांचा खुलासा

' काव्यलक्षण ' :– दण्डिकृतं काव्यादर्शापराभिधम् ' काव्यलक्षणम् ' रत्नश्रीज्ञानकृतया रत्नश्रिया टीकया





अनुक्रमणिका

समलंकृतम् - ( संपाः ) अनंतलाल ठक्कुर व उपेन्द्र झा :- दरभंगा, १९५७.

' काव्यानुशासन ' :- श्रीहेमचन्द्रविरचितं ' काव्यानुशासनम् ' सटीकम्. संपादक शिवदत्तशर्मा, काशीनाथ पांडुरंग परब आणि वासुदेव लक्ष्मणशास्त्री पणशीकर- मुंबई, काव्यमाला ७०, द्वितीय आवृत्ती, इ. स.,१९३४

' कासार ' - ' श्रीमदुद्भटाचार्यप्रणीतः ' काव्यालंकारसारसंग्रहः ' श्रीन्दुराजविरचितलघुवृत्तिसमेतः- संपादक- नारायण दशरथ बनहट्टी, पुणे, प्रथमाङ्कनावृत्तिः, इ. स. १९२५.

पुराण- *I- Viṣṇudharmottara- Purāna* Third Khanda Val. I ( Ed. )- Miss P. Shah, Oriental Institute, Baroda, 1958.

पुराण- *II- Vasnudharmottara Purāna* Third Khanda, Vol II, (Ed.)- Miss P. Shah, Oriental Institute, Baroda, 1961.

भामहालंकार- काव्यालंकारः श्रीभामहप्रणीतः- ( संपा. ) सी. शंकर रामशास्त्री, मद्रास, १९५६

रुद्रटालंकार- श्रीरुद्रटप्रणीतः काव्यालंकारः नमिसाधुकृतया टिप्पण्या समेतः- ( संपा. ) दुर्गाप्रसाद, वासुदेव लक्ष्मणशास्त्री पणशीकर- मुंबई, काव्यमाला २, तृतीयावृत्तिः, इ. स. १९२८

सूत्रवृत्ति- श्रीवामनविरचिता काव्यालंकारसूत्रवृत्तिः ( कामधेनुटिप्पणीसहिता )- ( संपा. ) नारायण नाथाजी कुलकर्णी, पुणे, १९२७

KSP – *History of Sanskrit Poetics* P. V. Kane: Delhi: Third revised edition, 1961

SL – *Sanskrit Literature*: V. Raghavan : New Delhi : 1961

SSL – *Survey of Sanskrit Literature*: C. Kunhan Raja : Bombay, 1962.

VHSL- *A History of The Sankrita Literature* : V. Varadachari Allahabad, second edition, 1960.

श्री. विनायकराव करमळकर

# गीतेतील दुसरी योगनिष्ठा म्हणजे पंथराजच

मागील लेखांकात गीतेतील द्विविधानिष्ठा म्हणजे ज्ञान व योग होत हे आम्ही निर्भ्रान्त सिद्ध केले. आता साहजिकच प्रश्न उद्भवेल की हा योग कोणता ? याचे उत्तर आम्ही सांगू इच्छितो की हे शक्तिपात-रहस्य, अथवा महायोग किंवा कुण्डलिनी योग नामाने प्रचलित आहे. ज्ञानेश याला शांभव अद्वयानंद वैभव म्हणूनच अलंकारितात.

**' मन्त्रोलयो हठो राजयोगोऽन्तर्भूमिकाक्रमात् ।**
**एकएवं चतुर्धाऽयं महायोगोभिधीयते ॥**

—योगशिखोपनिषद

योगशब्द बहुधा दुसऱ्या शब्दाशी सरसकट संलग्न असा आढळतो. त्याचे व्यावहारिक अर्थही आहेत. ' योग ' शब्दात युज् व युजिर असे चवथ्या व सप्तम गणाचे दोन धातू असून एकाचा अर्थ जोडणे संलग्न करणे हा आहे तर दुसऱ्याचा अर्थ समाधी आहे. मानवी जीवनाची इतिकर्तव्यता जो मोक्ष अथवा आत्मलाभ त्याची अनेकविध साधने जरी सांगण्यात येत असली तरी ' ज्ञानादेव तु कैवल्यम् ' अशी श्रुति आहे म्हणजे कैवल्यप्राप्ती अथवा मोक्ष केवळ ज्ञानानेच होतो हे निर्भेळ सत्य आहे. ज्ञानप्राप्तीसाठी अनेकविध साधने आहेत; पण आमचे मते गीतेत निर्देशिल्याप्रमाणे ज्ञान व योग तुल्यबल होत. पाचवे अध्यायी भगवान स्पष्टच सांगतात ' सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति न पंडिताः । एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम् ॥ ४ ॥ ज्ञान व योगात फरक करणारे अथवा अंतर पाहणारे बाल अर्थात् अतज्ञ, मूढ होत; ज्ञानी असे समजत नाहीत. कारण एकानेही जरा सम्यक् ज्ञान झाले तरी निःश्रेयसाची प्राप्ती होते हेच मनात वागून योगवासिष्ठकार लिहितात ' द्वौक्रमौचित्त-नाशश्च योगो ज्ञानं च राघव । योगोस्तद्वृत्तिरोधोहि ज्ञानं सम्यगवेक्षणम् ॥ ज्ञान हा सिद्धांत पक्ष तर योग हा सक्रिय पक्ष होय; एवढ्यासाठी योगी याज्ञवल्क्य-स्मृतीत समर्पक दृष्टान्त योजिला आहे. ज्याप्रमाणे पक्षी केवळ एकाच पंखाने उडावयास समर्थ होत नाही त्यास दोन्ही पंखांची सारखीच आवश्यकता असते तद्वतच योग व ज्ञान यांची आत्मलाभास सारखीच आवश्यकता आहे. ज्ञानेश 'ज्ञानयोगव्यवस्थिती' यावरील आपल्या टीकेत म्हणतात :

**' आतां आत्मलाभा विखीं ।**
**ज्ञानयोगामाजीं एकी ।**
**जे आपुलिया ठाकीं । हा ेभरे ॥ ८१ ॥**

योगोपनिषदात स्पष्ट सांगितले आहे की—

' योगेनरहितं ज्ञानं न मोक्षाय भवेद्विधे । ज्ञानेनैव विना योगो न सिद्ध्यति कदाचन । तस्माज्ज्ञानं च योगं च मुमुक्षुर्दृढमभ्यसेत् । जन्मान्तरैश्च बहुभिर्योगोज्ञानेन लभ्यते ॥ ज्ञानेश यांनी आपल्या हरिपाटांत एका अभंगात म्हटले आहे 'योगयागविधि येणे नव्हे सिद्धि, वायांचि उपाधि दंभधर्म 'यास अनुलक्षून भोळे भाबळे वारकरीच नव्हेत तर एकांगी विद्वान योगास निषेधितात ती त्याची अक्षम्य चूक होय. ज्ञानेश हे स्वतः फार मोठ्या अधिकाराचे योगी होते. त्यांनी आपल्या ग्रंथात यौगिक दिव्यानुभव लिहिले आहेत. मायानदीचे तरण कसे दुष्कर आहे याचे विवेचन करते प्रसंगी गीता सातवा अध्याय श्लोक चवदावा, त्याची टीका अभ्यासावा कर्म, वैराग्य, विचारादिकेकरून या मायानदीचा थांग लागत नाही; पण योगासंबंधी अपवाद करूनच ते लिहितात ' **वरी कांहीं तरो ये योगें । तरी विपाये तो** । या योगाभ्यासात जी किंचिन्मात्र उणीव आहे ती ईश्वरप्रसाद अथवा सद्गुरुनिष्ठेचीच होय. ज्ञानेश्वरीमधून अशी अनेक स्थळे दाखविता येताल की ज्या ठिकाणी म्हणून ज्ञानेशांना योगाविषयी काही सांगावयाचा प्रश्न उद्भवतो त्या ठिकाणी त्यांनी योगाची मातब्बरी निःसंकोच वर्णन केली आहे आणि याचे कारण ' अंतरीचे धांवे स्वभावें बाहेरीं ' ही सदुक्ति होय.

## गीतेतील दुसरी योगनिष्ठा म्हणजे पंथराजच

विषयापासून परत फिरलेली इंद्रिये आत्माकारवृत्तिरूपी पवित्र गंगेच्या तीराला आणून ठेविली मग मनेसि योगधारणे मेळविली ॥ १०१८ ॥ मनाचा उंबरा वृत्तीसी देखों नेदी ॥ १०३० ॥ म्हणौनि तो मुमुक्षु । आत्मज्ञानी जाला दक्षु । परी पुढांसूनिपक्षु । योगाभ्यासाचा ॥ १०३५ ॥ कुंडलिनी जागवूनि । मध्यमा विकाशूनि । आधारादि भेदूनि । आज्ञावरी ॥ १०३८ ॥ कोठपावतो उद्धरणे देणार ? गीता अ० १८ मधील श्लोक ५१ ५२ वरील राजयोगवरील ज्ञानेशांचे व्याख्यानच अभ्यासावे. शाब्दिक ज्ञानाचे पण्डित म्हणजे परोक्षज्ञानी यांचे कषाय अर्थात् मल सुटत नाहीत म्हणून हा खटाटोप आहे. श्रीविद्यारण्य आपल्या पंचदशीमधील ध्यानदीपात म्हणतात 'बहुव्याकुलचित्तानाम् विचारात्तत्त्वधीर्नहि योगोमुख्यस्ततस्तेषां धीदर्पस्तेन नश्यति ॥ ६,१३२ ॥ असो. आम्ही मागेच लिहून चुकलो की उपास्ती ते योग्य ते । आधीन असे ॥ ४० ॥ अ० ३. योग्यते वाचून सर्व व्यर्थ आहे.

सद्गुरु प्राप्ती न झाली तर साधा, सौकर्याचा नामस्मरणाचा मार्ग हा घण्टापथ सर्वास उपयुक्त होय. कारण नाथ भागवतात भक्तियोगाचे वर्णन करतेसमयी लिहितात ' यानास्थायनरोराजन्न प्रमाद्येत कर्हिचित् । धावन्निमील्यवानेत्रे न स्खलन्न पतेदिह ॥ ३५ श्लोक. अ. २. हे जसे भक्तियोगात आहे तसेच सद्गुरुकडून योगदीक्षा व कुंडलिनीचे जागरण झाले म्हणजे होते. मनाचा हनमारु । कां पवनाचा धरू । ध्यानाचा आदरु । नाही परा । अ. ६ ॥ २८९ ॥ फरक जो आहे तो कालावधीचा. कारण भक्तियोगाने हे साध्य जन्मावधीवरही जाऊ शकते. दोर्दण्डांत पोहण्याचे सामर्थ्य लागते हे तर खरेच तथापि सद्गुरुकृपा आवश्यकच नसून अपरिहार्य आहे. पण नद्यातरणोपायास नावेचे साह्य असले म्हणजे कोणीही बसावे व तरी पार करावी तसा भक्तियोग होय. आता हा योग कोणता ते सांगण्यापूर्वी गीतेतील सहावे अध्यायी पातञ्जलयोग, हठयोग वा कर्मयोगच विवक्षित आहे असे जे अपसमज आहेत त्याचे निराकरण ओघानेच येते. निदान ज्ञानेश्वरांना ते सम्मत नसल्याचे स्पष्ट दाखविणे आहे. गीतेचा समय साधारण स्थूल मानाने ३२००–३१०० वर्षांचा आहे असे प्राच्यविद्याकोविदांनी ठरविले आहे. त्यासमयी भगवान पतञ्जलींचे अस्तित्व नव्हते कारण त्याचा समय १५०–१०० वर्षे ख्रिस्तपूर्व पासून दुसरे अथवा तिसरे शतक ख्रिस्ताब्द आहे. श्री. राजवाडे आपल्या राधामाधव विलासाचे प्रस्तावनेत पतञ्जलीचा समय ख्रिस्त पूर्व दुसरे शतक देतात तो १५३ वर्षे ख्रिस्तपूर्व आहे. बौद्ध व जैन धर्मियांना धर्माचे प्रचाराबरोबरच आक्रमक वृत्तीने पारतंत्र्याचाही पुरस्कार चालविलेला होता. तेव्हा ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकात पतञ्जलींच्या प्रेरणेने पुष्यमित्र शुंग व पहिला सातकर्णी सातवाहन यांच्या नेतृत्वाखाली धर्माने बौद्ध पण जातीने भारताला परकीय यवनराज मिनँडर विरुद्ध उठाव करून यवनसत्ता रसातळाला पोहोचवली. दुसरे असे की गीतेत 'सिद्धानाम् कपिलो मुनिः ' असा कपिलांचा स्पष्ट उल्लेख आहे. तसा तो पतञ्जलींचा नाही, तरीही टिळक गीतेत पातञ्जल योगच सांगतात ( श्रीमद्भगवद्गीता, मूळ श्लोक व भाषांतर. लहान प्रथम आवृत्ती पान ११७ पहा ). डॉ. वंडर आपल्या प्रदीर्घ निबंधात तसेच म्हणतात ( ज्ञानेश्वरदर्शन भाग द्वितीय ). हे सत्याला सोडून आहे. योग किती प्राचीन आहे याची मोजदाद अद्यापीही होऊ शकली नाही; पण योग ५–६ हजार वर्षे तरी जुना असावा. भारतीय जुन्या संस्कृतींच्या अवशेषांचे उत्खनन मोहनजोदारो, हरापा, लोथल येथे करण्यात आले त्यात ध्यानमग्न योग्यांच्या प्रस्तरमूर्ती आढळून आल्या आहेत. योग ही आर्यांची देणगी असे तर हमखास म्हणता यावयासारखे नाही कारण वैदिक आर्यांचे सारे तत्त्वज्ञानच विजिगीषु व आक्रमक स्वरूपाचे आहे. हिरण्यगर्भ यांनी सांगितलेला योग कोणता ? हे आज निश्चयाने सांगता येत नाही पण अहिर्बुध्न्य संहितेत असा स्पष्ट उल्लेख आहे की त्यांनी एक निरोधयोग संहिता लिहिली होती ( धर्मशास्त्राचा इतिहास डॉ. पां. वा. काणेकृत पहा. पृष्ठ १३९१) त्याची अंगे किती ? आठ वा अधिक याचा खुलासा नाही. अश्वघोषाचे बुद्ध चरित्रात असा श्लोक आहे 'जैगीष्व्योऽपिजनकोवृद्धश्चैव पराशरः । इमं पंथानमासाद्य मुक्ताह्यने च मोक्षिणः १२-६७. पाणिनी निदान ख्रिस्तपूर्व आठशे वर्षे जुने होत, त्याहून अधिक वृद्ध पराशर. कारण ' पाराशर्यशिलालिभ्यां भिक्षुनटसूत्रयोः' असा उल्लेख ४–३–११० आहे. स्वतः बुद्ध

अराद या तत्त्वज्ञाकडे प्रश्नार्थी मुमुक्षू म्हणून गेला असता त्याने विमुक्तीचा मार्ग म्हणून योगच उपदेशिला असेही बुद्ध चरित्रात नमूद आहे. आता टिळक गीताधारे 'कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः' असे जे सांगतात त्यात संसिद्धि याचा अर्थ मोक्ष नसून वैराग्यचित्तशुद्धि आहे; विषयविरसता. तो केवळ फलाशात्याग नसून सुरेश्वराचार्यांना अभिप्रेत असलेली नैष्कर्म्यसिद्धी होय. म्हणजे आम्ही म्हणतो त्याप्रमाणे निष्कामकर्मयोगसाधन, कर्मसाम्यदशा, सद्गुरुलाभ, योगदीक्षा, कुंडलिनीउद्बोध व सहजस्थिती होय. श्रीयुत वि. बा. आठल्ये यांचा 'श्रीमद्भगवद्गीतेतील सिद्धी' हा दीर्घ निबंध पहा. त्यात त्यांनी सिद्धि, संसिद्धि, परानिष्ठा, परमां गतिं, परमधाम यांचे साधार सयुक्तिक विवेचन केले असून ज्ञान–निष्ठा–योग्यता म्हणजे चित्ताची शुद्धि एवढाच अर्थ सिद्धि व संसिद्धेने विविक्षित आहे. पण परमागति, परमधाम हेच शब्द मोक्षाबद्दल लागू होत. मोक्षप्राप्तीस एक ज्ञानच समर्थ आहे 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' हे श्री ज्ञानेश **' मोक्षदानीं स्वतंत्र । ज्ञान–प्रधान हे शास्त्र । येतुलालें दूजीं सूत्र । उभारिलें ॥ १४३६ ॥** मग अज्ञाने बांधलेयां । मोक्षपदीं बैसावया । **साधनारंभु तो तृतीया–ध्यायीं** बोलिला ॥ १४३७ ॥ असे अगदी संशयच्छेदी शब्दात सांगत आहेत. योगाचार्यांचा क्रमच लावणे झाले तर तो आम्ही हिरण्यगर्भजैगीषव्य, सनत्कुमार, मार्कण्डेय, पतञ्जली व योगीयाज्ञवल्क्य असा लावू. पण पौर्वापर्याचा आग्रह आम्ही धरीत नाही. प्रकृतस्थली या प्रत्येकाचा योग काय होता ही चर्चाही विस्तारभयास्तव आम्हास टाळावी लागत आहे. दुसरे असे की पतञ्जलप्रणीत 'कैवल्य' हे वैदिकप्रणालीचे आचार्यापेक्षा भिन्न आहे. श्री आद्याचार्यांचा 'जीवो ब्रम्हैव नाऽपरः' हा अढळ सिद्धांतच आहे आणि ज्ञानराजांना हेच सम्मत आहे ' म्हणौनि मी होणे नाही । तया मीचि आहे केही । मग भजेल हे कायीं । बोलोकीर ॥ ११४६ ॥ यालागी तो **क्रमयोगी** । मी जालाचि मातें भोगी । तारुण्य कां तरुणांगीं । जियापरी ॥ ११४७ ॥ ज्ञानेश यांचे इतर जागी रूप करितात-- अर्जुनपण न घेतां । मी ऐसें जें पंडु सुता । उठतसे तें तत्त्वता । तयाचे रूप ॥ १३१५ ॥ अ. १८. ही तर प्रसिद्धच गोष्ट आहे की पातञ्जल योग हा सेश्वर सांख्य सिद्धांत होय. त्यांचा ईश्वर अथवा पुरुष त्यांनी आपल्या सूत्रांत प्रतिपादिला आहे. 'क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेषईश्वरः' समाधिपाद सूत्र १-२४. त्यांचे हे **पुरुष अनेक व अगणित आहेत**. हा मूलग्राही फरक त्यांच्यात व गीतेत आहे. पतञ्जलींनी अनेक गोष्टी गीतेंतूनच उचलिल्या आहेत. त्यांचे विवेचन येथे अप्रस्तुत आहे. पण ईश्वराचा वाचक प्रणव असेही ते सांगतात 'तस्यवाचकः प्रणवः' हे ते सूत्र होय. योगसूत्रे ही वास्तविक सांख्य प्रवचने समजली जातात, गीता चतुर्थ अध्यायी परंपरा विच्छिन्न झाल्याने जो योग नष्ट झाला तो काय होता ? ते आता पाहणे आहे. 'योगो नष्टः' अ. ४ श्लोक. १-२. ज्ञानेश्वरीत या नष्टप्राय योगाचा ठावठिकाणा सांगण्यास्तव जो उपोद्घात ज्ञानेश करितात त्या ओव्या मनन करावयासारख्या आहेत. जी परमगुह्य गौप्य, गोष्ट देव वसुदेव, देवकी बलराम, प्रत्यक्ष लक्ष्मीस सांगत नाहीत. 'सनकादिकाच्या आशा बहुवसाकीर वाढिन्नल्या होत्या' त्यांचेही पदरात काही पडत नाही. ते असे आगळेच योगतत्त्व काय होते ? हे योगतत्त्व जाणून घ्यावयास एक अर्जुन केवळ आपल्या निरतिशय देवाबद्दल असलेल्या प्रेमामुळे पात्र झाला. तो काही निष्कामकर्मयोग, पतञ्जलींनी पुढे पुरस्कारलेला अष्टांगयोग वा हठ योग किंवा भक्तियोग असू शकत नाही. कारण **त्यांच्या प्रणाली व आचरण उघड आहेत**. तो योग निश्चये करून **महायोग, शक्तिपातरहस्य** किंवा ज्ञान राजांना नाथसंप्रदायातून प्रतीत झालेला **पंथराजच** आहे याची खात्री ज्ञानेश्वरीचे सहावे अध्यायाचे अभ्यासाने होणारी आहे. मूळ गीतेत ध्वन्यार्थाने सुचविलेला पण ज्ञानेशांना परंपरेने प्राप्त झालेला कुण्डलिनीयोग अधिकारी साधकास्तव जीवाचे कळवळयाने त्यांनी उपदेशिला आहे. ज्ञानेश्वरीतील पंथराजाचे वर्णन विस्तृत असले तरी मुख्य शक्तिपातरहस्य सांप्रदायिक दंडकास अनुसरून गुप्तच ठेविले आहे.

' का त्रिद्यागुरूपदिष्टा । बोभाइलिया चोहटा ।
इष्टदापरी अनिष्टा । हेतु होती ॥२१९॥ अ. १६.

एरवी गीतेत व पातञ्जल योगसूत्रात 'कुंडलिनी' हा शब्दही नाही हे सर्व जाणतातच आणि म्हणून

'एऱ्हवीं हा योगियां नाडळे ।
वेदार्थासी नाकळे ।
जेथ ध्यानाचेही डोळे । पावतीना ॥१३॥

ही ओवी हेतुपुरस्सरच लिहिली आहे व हे रहस्य सहावे अध्यायी परिस्फुटित झाले आहे ते एका अत्यंत महत्वाचे ओवीने. ती ओवी–

'पिंडे पिंडाचा ग्रासू ।
तो हा नाथ संकेतीचा दंशु ।
दाऊनि गेला उद्देशु ।
महाविष्णु ॥ २९१ ॥

नाथपंथातील परमगौप्य मर्म म्हणजे 'पिंडे पिंडाचा ग्रास' होय. ज्ञानेश्वरीचे बहुतेक टीकाकारांना या ओवीचा उलगडा झाला नाही हे आम्ही महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या १९६६ च्या मे अंकात दाखविले आहे. आम्हास तरी हा अर्थ १० वर्षे पूर्वयोगी चांगदेव यांच्या 'तत्त्वसार' ग्रंथावरून प्रतीत झाला. कारण त्यात 'पिंडु म्हणिपे शक्ती, कुण्डलिणि विख्याति ॥६२०॥ पृष्ठ ६. वटेश्वर चांगदेव परमयोगिनी मुक्ताबाईचे शिष्य. हा योग दीक्षाविधीचा असल्याने त्याचे प्रात्यय व त्या योगे समाधान केवळ सांगोवांगी गोष्टींनी होण्यासारखे नाही. म्हणूनच ज्ञानेश हेतुगर्भ ओवी लिहितात. 'म्हणोनि तेथींचो मातु । न चढेचि बोलाचा हातु । जेणे संवादाचिया गांवा आंतु । पैठी कीज ॥३११॥ अ. ६. ते पुढे सांगतात 'तेवी पिंडाचेनि मिषे । पदींपद प्रवेशे । ते एकत्व होय तैसे । पंडु कुमरा ॥ ३०८ ॥ याचा अर्थ योगदीक्षाविधीने एकदा का कुण्डलिनी उत्थान पावली म्हणजे जीवात्मा व परमात्मा यांचे ऐक्यच होते 'ते वेळी कुण्डलिनी हे भाषजाये । मारुत ऐसें नाम होये । परि शक्तिपण ते आहे । जंव न मिळे शिवी ॥३०१॥ फार काय उत्थित कुण्डलिनी हाच जीवात्मा होय. कुण्डलिनी=प्राणशक्ती = चित्शक्ती हाच जीवात्मा होय असे अध्यात्म रामायणावरून दिसून येते.

'अविद्याकृतदेहादिसङ्घा ते प्रतिबिंबिता ।
चिच्छक्तिर्जीव लोकेऽस्मिन् जीव इत्यभिधीयते ॥
बालकाण्ड सर्ग ७ श्लोक ३४

देहादि संघातात म्हणजे अविद्याकृत मायेत पडलेले परब्रह्माचे जे प्रतिबिंब अर्थात् चित्शक्ती तीच या जगतात जीव म्हणून म्हणविली जाते. परब्रह्मापासून त्याची चिच्छक्ति भिन्न नसल्याने जीवात्मा व परमात्मा यांचे अखंड ऐक्य आहेच. पिंडे पिंडाचा ग्रास याचा अर्थ उद्बोधित कुण्डलिनीने पाच भौतिक शरीराचा ग्रास केला जातो. शरीरातील तीन स्थूल भूते म्हणजे पृथ्वी, आप व तेज ही जागरित कुण्डलिनीने आटविली जातात. मग तो देह केवळ वायू व आकाश या सूक्ष्म भूतांचाच राहतो. याला छांदोग्योपनिषदात आधार आहे तो असा–– 'तेषां खल्वेषां भूतानाम् त्रीण्येव बीजानि भवन्ति " ॥ अ० ६. तृतीय खंड. ज्ञानेश्वरीत अगदी हेच सांगितले आहे. 'लोप आथीं भूत त्रया । देहींच्या देहीं ॥ २९८ ॥ अ० ६. देह सावयव तर असतो पण केळीतील पोकळीवरील सोपटे काढून ती पोकळी जशी उभी करावी तसा तो प्राणवायूरूप देह काही कालेकरून अवकाशात म्हणजे मूर्ध्नि आकाशात मिळतो. मग ब्रह्मरंध्रि स्थिरावोनि । सोऽहं भावाच्या बाह्या पसरोनि । परमात्मलिंगा धावोनि । आंगाधडे ॥ ॥३०५॥ अ० ६. हा दिव्य देह जनांचे दृष्टीस अगोचर होतो व त्यात लोकोत्तर सिद्धींचे अतींद्रिय सामर्थ्य येते. त्यास दिव्य ज्ञानानुभव येतात. सिद्धी या समाधीत अंतराय असल्याने त्या साहजिकच निषेधिल्या जातात. कारण ज्ञानेश सांगतात 'परि तेणे काय काज आपणपयां ' योगी चांगदेवांचे गुरुही सांगतात दिव्य असा अमरदेह मिळविणे हे चौरंगी गोरक्षा साजे...... आपण आत्मवस्त्व जाणिजे । मोक्षु येकु पाविजे । येथ विपईं न लविजें । विन्दु पैं ॥ ६५० ॥ तत्त्वसारातील यापुढच्या चौदा पंधरा ओंव्या बहारीच्या आहेत. त्या मुळातूनच वाचाव्यात; तथापि 'पवन प्रबोधे मातली । जीवभावां मुकली ॥ ६६१ ॥ जें जाणतां जाणणें सरे । जेण मनाचें मनत्वमुरे ॥ ६६४ ॥ ज्ञानेश या स्थितीला 'तुरोनिया ठेला ' म्हणतात. अमनस्कभाव तो हाच. एकनाथ सांगतात 'निरभिमान निरवधी या नांव अखंडसमाधि ॥ ६६४ ॥ आणि 'सर्वसंकल्पांची अवधी । त्या नांव निर्विकल्पसमाधी ॥ ६६९ ॥ पण हे सर्व ईशप्रसादे । श्रीगुरुसंप्रदायलब्धे । सांचज्ञान उद्बोधे कोंवळें । जें ॥ १४४६ ॥ अ. १८. असे ज्ञानेश सांगतात. 'गुरु तेथ ज्ञान । ज्ञानीं आत्मदर्शन । दर्शनी समाधान । आथीं जैसे ॥ ॥ १६३६ ॥ अ. १८. गुरु व संप्रदायावाचून ज्ञान कोणी बुद्धिवैभवावर मिळविल्याचे

आजपांवेतो ऐकिवांत नाही; एरवी 'नैषातर्केण मतिऽरापनीया' असे उपनिषद आवर्जून सांगते ना !! केनोपनिषदाचे भाष्यात भाष्यकार स्पष्टच म्हणतात 'तर्कस्तु अनवस्थितो भ्रान्तोऽपि भवतीति' आता ज्ञानेश्वरास गीतेत हठयोगही नाही हे दाखवावयाचे आहे. एकदा सद्गुरुकृपापूर्वक योगदीक्षेने कुंडलिनी जागृत झाली असता साधकास प्रयत्नपूर्वक आपणहून काही करावे लागत नाही. त्याने निदान दोन्ही संधिकालात तरी निरहंकार पूर्वक सद्गुरूस अनन्यशरण बैठकीस बसावयाचे; कुण्डलिनी आपला मार्ग आपसूकच चोखाळते. सद्गुरु, शक्ती अथवा मंत्र किंवा शक्ति संपुटित नाम ही एकच आहेत असा त्याचा दृढ निश्चय मात्र पाहिजे. 'मग तेथ आपण। एकाग्र अंतःकरण। करूनि सद्गुर स्मरण अनुभविजे ॥१८६॥ तैसें स्मरते नि आदरें। सबाह्य सात्विकें भरें। जंव कठिणपण विरे। अहंभावाचे ॥ १८७ ॥ विषयाचा विसरु पडे। इंद्रियांची कसमस मोडे। मनाचि घडी घडे हृदयामाजीं ॥ १८८ ॥ ऐसें ऐक्य हें सहजें। फांवे तव राहिजे। मग तेणेंचि बोधें बैसिजे। आसनावरी ॥ १८९ ॥ आतां आंगातें आंगकरी। पवनातें पवनुचि धरी। ऐसी अनुभवाची उजरी। होंचि लागे ॥ १९० ॥ प्रवृत्ति माघौति मोहरे। समाधि ऐलाडी उतरे। आघवें अभ्यासूं सरे। बैसत खेवो ॥ १९१ ॥ अ. ६. ते पुढे म्हणतात ऐसी शरीराबाहेरलीकडे। अभ्यासाचि पाखर पडे। तंव आंतु वाय मोडे। मनोधर्माची ॥ २११ ॥ कल्पनानिमे। प्रवृत्त शमे। आंग मन विरमे। सांवियाचि ॥ २१२ ॥ ह्यांत कुठलें आले साधन व बाह्य खटाटोप !! पण हे योगदीक्षापूर्वक पश्चिम मार्ग म्हणजे सुषुम्नापथ खुलला म्हणजे होते; एरवीं नाही हे पूर्णपणे लक्षांत ठेवावयास पाहिजे. ज्ञानदेव म्हणे मी चाड़ं। सद्गुरूंनीं केला कोडें। माथां हात ठेविला तें फुडें। बीचिवाइलें ॥ ४९२ ॥ ही दीक्षा दर्शन, स्पर्शन (Glance, touch) भाषण म्हणजे मंत्र देणे वा नाम देणे, मुख्य म्हणजे सद्गुरूंच्या शिव संकल्पाने मिळते. याची उदाहरणे अपूर्व अशा गुरु शिष्य जोडीत दाखविता यतील. ज्ञानेश्वरी अध्याय अकरा ओव्या १७७-१९४ पहा अथवा अध्याय अठरा ओव्या १४१८ ते १४२६ पहा: 'नातरीमधुवनीं ध्रुवासि केले। जैसे कपोळ शंखे शिवतले। आणि वेदांचियेही मति ठेले। ते लागला बोलो ॥ १८४ ॥ अ. ११. 'ऐसे जे काही एक। बोलाबुद्धी सीही अटक। ते द्यावयामिख। खेवाचे केले ॥ १४२० ॥

हृदया हृदय येक जाले।
ये हृदयींचे ते हृदयीं घातले।
द्वैत न मोडिता केले।
आपणा ऐसें अर्जुना ॥ १४२१ ॥

हा देव व अर्जुनातील प्रसंग किंवा असाच श्रीकृष्ण व उद्धवातील प्रसंग भागवतात पहा 'यालागी कृष्ण जगजेठी। उद्धवाची पाठी थापटी। अति गुह्यचि गुह्य गोष्टी। तुझे कृपेसाठी मी बोलतो ॥ १२७ ॥ पाठी थापटावयामिसें जाण। करीत **स्वशक्ति संचरण**। तेणे अद्वय बोध लक्षण। उद्धवासी जाण प्रकाशी ॥१२८॥ भागवत एकादशस्कंध अकरावा अध्याय श्लोक चार वरील टीका पहा : 'उद्धव उचलीला श्रीधरे। तरी प्रेम न सावरे देवाचे ॥ ३०४ ॥ हाव न बाणेचि दोंकरी। मग चारी भुजा पसरी। उद्धवाते हृदयावरी। प्रीति थोरी आलिंगी ॥ ३०५ ॥ हृदयीहृदय एक जाहले। ये हृदयीचे ते हृदयी घातिले। कृष्णे सर्वस्व जे आपुले। ते हृदयी सूदले उद्धवाचे ॥ ३०६ ॥ एकादश स्कंध, एकुणिसावा अध्याय श्लोक २४. अध्यात्म रामायणात श्रीरामरायाने मारुतीस दिलेले गाढ आलिंगन (परिष्वंग) प्रसंग वाचा. सुंदरकाण्ड पंचमसर्ग अखेर श्रीमुकुंदराज आपल्या विवेकसिंधूत त्यांच्या गुरूंनी शक्तिपात केला असे सांगतात. योगी महीपती सांगतात 'सद्गुरूनाथ अजिपाया। मुझे पकड दस्त बैठाया। दो अच्छर बीज पढाया। मेरे सिरपर हात चढाया. 'साँई अलखपलखमे चलना' हे पद पहा. श्रीरामकृष्णांनी आपला पाय नोरेन (विवेकानंद) च्या छातीशी भिडवून हीच दीक्षा दिली. गॉस्पेल ऑफ रामकृष्ण वाचा. श्रीरमणकृपाकटाक्षाने Glance हेच करीत. तुकोबा सांगतात 'सापडविले वाटे जाता गंगास्नाना, मस्तकी तो जाणा ठेविला करू' असो. 'हठ योगात इंद्रियांचा निग्रह **बलात्काराने** करीत असतात ... यावरून गीतेत हठयोग विवक्षित नाही हे उघड होते' (टिळककृत मूळ गीता व भाषांतर पृष्ठ ११६) लहान आवृती १९२६. देहाला षट्क्रियांनी अगदी हलका करावा लागतो. त्या क्रिया

धौतिर्बस्तिस्तथानेतिस्त्राटकं नौलिकं तथा । कपालभातिश्चैतानि षट्कर्माणि प्रचक्षते ॥ ह. प्र. प्रकरण २. म्हणजे नेति, बस्ती, धौती, नौली, त्राटक व कपालभाती यांची ओझरती चर्चा मूळ गीतेत वा ज्ञानेश्वरी सर्वमान्य टीकेत नाही. प्रातःस्नान नको तर अग्निसेवा वर्ज. पथींश्रम नकोत तर उपवास वर्ज. एकांत सेवन, पथ्य, आहाराची एक यादीच आहे. तेही अल्पभोजन ब्रह्मचर्यावर मुख्य भर. भस्त्रिका अभ्यास व शक्तिचालन. हठयोग्यांना आसन जय साधून नाडीशुद्धि करणे हे एक आवश्यक अंग आहे. पूरक व रेचक प्राणायाम हे उपोद्बलक म्हणजे सहायभूत आहेत. मुख्य म्हणजे कुंभक 'प्रच्छर्दन विधारणाभ्याम् वा प्राणस्य' म्हणजे प्राणाऽपानाची गती रुद्ध करणे कोंडलेला प्राण इच्छित अशा सुषुम्नानाडीत प्रवेश करविणे व तेही **बलात्कारपूर्वक** होय. 'गंगायमुनयोर्मध्ये बालरण्डातपस्विनीम् । **बलात्कारेणगृह्णियात** तद् विष्णोः परमं पदम् ॥१०९॥ उद्घाटयेत् कपाटं तु यथाकुञ्जिकया **हटात्** । कुंडलिन्या तथा योगी मोक्षद्वारं विभेदयेत् ॥ १०५ ॥ जे कार्य सद्गुरुकृपापूर्वक सहज व्हावयाचे त्यास हा दृढ धर्मी हठ योग काय कामाचा ? याचा वाचकांनीच विचार करावा. इतकेही करून कुंभकाने रोखलेला वायू अवांच्छित स्थळी गेला म्हणजे रोगी होवून असाध्य व्याधी कायमचाच जडणार व प्रसंगी प्राणासही मुकावे लागते ! मूर्ख हठयोगी साधकामुळे योग मात्र भयावह व बदनाम झाला आहे. डॉ. शं. दा. पेन्डसे यांना आम्ही प्रेमपूर्वक सांगू इच्छितो की भ्रुमध्याचा लय हा तात्पुरत्या स्वरूपाचा लय म्हणजे योगविश्राम आहे. वास्तविक तेथून सहस्रारापावेतो सात स्थाने आहेत. पूर्णअमनस्क, निर्विकल्प समाधि, जीवशिवऐक्य वा शिवशक्ती सामरस्य केवळ सहस्रारातच होते. हठयोगात कुंडलिनीची चर्चा आहे व तीच ज्ञानेश्वरीत आहे. म्हणून ते अभावितपणे चकले असून त्यांना आपल्या ग्रंथात अपरिमित अशी हठयोग प्रदीपिका व व शिव, घेरंड संहिता यांची उद्धरणे दिली आहेत. अर्जुनाने न कळत पंथराजाचे काठीण्य पाहून देवास विचारले की 'देवा याला विशेष अधिकार असल्यावाचून हे समजणार कसे' ? देवाने स्मितपूर्वक उत्तर केले 'बाबारे ! योग्यतेवाचून कोणचेच कार्य साधणार नाही हे खरेच ! तथापि अधिकारगची काही खाण का आहे' ? 'युक्ताहार विहारश्च' यावरील टीका पहा. नावेक विरक्तु । जाहला देहधर्मी नियतु । तरी तोचि नव्हे व्यवस्थितु । अधिकारिया ॥ ३४२ ॥ येतुला लियें आयणी माजि येवढें । योग्यपण तूंतेंही जोडे । ऐसें प्रसंगें सांकडें । फेडिले तयाचें ॥ ३४३ ॥ ज्ञानेश्वरी अ. ६. गीताश्लोक १६ वरील साग्र टीका वाचा ...... तू प्राप्तीची चाड वाहसी । परि अभ्यासींदक्षु नव्हसीं । तरी सांगपाकायभ्रिहसी । दुवाडपणा ॥ ३६० ॥ तरी पार्था हे झणें । सायास घेशी हो मनें । वायाबागुलइयें दुर्जनें । इंद्रियें करिती ।। ३६१ ॥ ...... एऱ्हवीं योगासारिखें काही आहे ॥ ३६३ ॥ हे केवळ शक्तिपातरहस्य किंवा कुण्डलिनीयोगासच अनुलक्षून आहे. पण हे सौकर्य केव्हां —तर ...... **पुत्रशोकु संकल्पा । दाखविजे** ॥३७५॥ या सोपिया योगस्थिती । उकलु देखिला गा बहुति । **संकल्पाचिया संपत्ती । रूसोनिया** ॥ ३८७ ॥ तया स्वान्तःकरण जिता । सकळ कामोपशान्ता । परमात्मा परौता । दूरि नाही ॥८१॥ ... ... **जीवाब्रम्हत्व आहे । संकल्पलोपीं** ॥ ८२ ॥ शक्तिपातरहस्य हा विषय विस्तृत आहे त्याची चर्चा हा प्रस्तुत लेखाचा विषय नाही.


श्री. क. वा. केळकर

# भूकंप

## लेखांक- २

ज्वालामुखींच्या किंवा इतर स्फोटांच्या धक्क्यांमुळे होणाऱ्या भूकंपांचे वर्णन पहिल्या लेखांकात केले. आणखी एका वेगळयाच कारणानेही भूकंप होत असतात व मनुष्याच्या दृष्टीने ते महत्त्वाचे असतात. वर्तमानपत्रात येणारी वर्णने बहुधा त्यांच्याविषयीच असतात. अशा भूकंपांचे कारण कळण्यासाठी पृथ्वीच्या रचनेचे ढोबळ स्वरूप तरी माहीत असणे आवश्यक आहे. एखाद्या गोल वस्तूभोवती एकावर एक अशी निरनिराळ्या पदार्थांची व निरनिराळ्या जाडीची पुटे बसविलेली असावी तशी पृथ्वीच्या गोलाची रचना आहे. कांदा सोलताना एकाच्या आत एक अशी पुटे दिसतात तशी पुटे पृथ्वीचा गोल सोलता आला तर दिसतील. त्यापैकी सर्वात बाहेर असलेले पुट पृथ्वीच्या पृष्ठभागी आढळतात तशा खडकांचे आहे. त्याला पृथ्वीचे कवच, भूपटल किंवा शिलावरण अशी नावे आहेत. पृथ्वीच्या कवचाचे पृष्ठ खडबडीत, उंच सखल आहे व त्याच्या सखल भागावर सागरांचे पाणी असून उंच भाग जमीन झालेले आहेत. जमिनींचे खडक व त्यांची रचना विशेषशी अडचण न येता आपण पाहू शकतो. खोल सागरांच्या तळाशी असलेल्या खडकांचे नमुने मिळविणे त्या मानाने बरेच अवघड आहे. पण गळासारखी व यांत्रिक गिरमिटासारखी उपकरणे वापरून सागर-महासागरांच्या तळाशी असलेल्या खडकांचे नमुने मिळविणे व त्यांची रचना कळून घेणे शक्य झालेले आहे. तसे नमुने मिळविण्यात आलेले आहेत. जमिनींच्या व सागरांच्या तळाखालच्या खडकांची आपणास आता बरीच माहिती मिळालेली आहे. पण हे सर्व नमुने कवचाच्या उथळ भागातल्या खडकांचे आहेत. गिरमिटे वापरून खडकात नळा-सारखी भोके पाडता येतात व खोल जागेतले नमुने मिळविता येतात. पण अशा भोकांची खोली पृथ्वीच्या मानाने अत्यल्प असते. व कवचाच्या खोल भागात किंवा कवच भेदून त्याच्या खालच्या पदार्थात जाऊन पोचेल इतके खोल भोक पाडणे शक्य झालेले नाही व कवचाच्या खालील भागात कोणते पदार्थ आहेत या विषयी प्रत्यक्ष माहिती अर्थातच नाही. परंतु क्ष किरणांच्या साहाय्याने शरीरातल्या सांगाड्याची माहिती मिळते, त्याप्रमाणे भूकंपांच्या साहाय्याने पृथ्वीच्या घटकांच्या रचनेविषयी माहिती मिळते. त्या माहिती-वरून पृथ्वी ही संकेंद्री कवचांची बनलेली आहे व तिचे (१) कवच ( क्रस्ट ) (२) प्रावरण (मँटल) व (३) गाभा किंवा गर्भ (कोअर) असे तीन प्रमुख भाग आहेत असे कळून आलेले आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाजवळच्या थराची म्हणजे कवचाची जाडी सर्वत्र सारखी नाही. त्याचे काही भाग ५–७ कि. मी. ( ३–४ मैल ) तर काही भाग ३५ कि. मी. व काही त्यापेक्षा अधिक जाड आहेत. कवचाची सरासरी जाडी सुमारे २० कि. मी. ( १२.५० मैल ) म्हणजे पृथ्वीच्या त्रिज्येच्या (सुमारे ६४०० कि. मी.) सुमारे एक तीनशे विसांश इतकीच जेमतेम भरते. एखाद्या फळाला पातळ पापुद्र्यासारखी साल असावी तसे पृथ्वीचे कवच आहे. प्रावरण हे पृथ्वीच्या कवचा-खाली असून त्याची जाडी सुमारे २९०० कि. मी. व त्याच्या आत व पृथ्वीच्या मध्याशी गाभ्याचा गोल आहे. त्याची त्रिज्या सुमारे ३५०० कि. मी. आहे. प्रावरणाच्या घटक पदार्थांचे गुणधर्म घन पदार्थासारखे आहेत व गाभ्याच्या घटकांचे गुणधर्म द्रवासारखे आहेत असे भूकंप-तरंगांच्या पुराव्यावरून कळून आलेले आहे. बहुसंख्य भूकंप पृथ्वीच्या कवचा-तच व फारच थोडे त्याच्यापेक्षा खोल भागात उत्पन्न होतात. ७२० कि. मी. ( ४५० मैल ) पेक्षा म्हणजे पृथ्वीच्या त्रिज्येच्या सुमारे एकदशांशापेक्षा खोल जागी उत्पन्न झालेल्या भूकंपाची नोंद झालेली नाही.

आकृती : पृथ्वीचे प्रमुख भाग व त्यांची रचना दाखविणारा पृथ्वीचा छेद




पपनसाला साल असावी तसे पृथ्वीचे कवच सलग एकसंध नसून सिताफळाच्या सालीसारखे म्हणजे अनेक तुकडे जुळून बनलेले आहे. त्याचे घटकही सर्वत्र सारखे नसून कठीण, नरम, मऊ अशा निरनिराळ्या खडकांचे ते बनलेले आहे. त्याच्यात ठिकठिकाणी भेगा व चिरा आढळतात. पृष्ठाजवळील भागात चिरांची संख्या अधिक व खोल भागात कमी असते. पण कवचाच्या खूप खोल भागात किंवा त्याच्या खालच्या म्हणजे प्रावरणाच्या उथळ भागातही काही चिरा असणे शक्य असते.

एखाद्या जुन्या व जिची डागडुजी नीट होत आलेली नाही अशा इमारतीच्या पायाचे काही दगड खचलेले किंवा तिरपे झालेले, व पूर्वी सरळ आडव्या असलेल्या तुळयांना खाली बाक आलेले, तिच्या फरसबंदी जमिनीला भेगा पडलेल्या, काही फरशा तिरप्या झालेल्या दिसतात. तशाच गोष्टी पृथ्वीच्या कवचात होत असतात.

वारा, वाहाते पाणी, पृथ्वीवरील जीव इत्यादींच्या क्रियांमुळे पृथ्वीच्या पृष्ठात व पृष्ठाजवळच्या खडकात अगदी मंद गतीने पण सतत फेरफार होत असतात. जमिनी झिजत असतात. जमिनीच्या झिजेमुळे तयार होणारा वाळू-माती सारखा गाळ वाहात्या पाण्याबरोबर वाहात जाऊन सखल जमिनीवर किंवा समुद्राच्या तळावर साचत असतो. कवचाखाली असलेल्या भागातही काही फेरफार होत असतात व त्यामुळे कवचाचे काही भाग वर तर काही खाली, किंवा काही पुढे तर काही मागे सरकविले जातात. अशा विषम हालचालीमुळे कवचाचे काही भाग ताणले तर काही पिळवटले जातात तर काही बाजूकडून दाबले जातात. जमिनीवर पसरलेली चटई

दोन शेवटाकडून आत दाबली म्हणजे तिला प्रथम कमानी-पन्हळासारख्या व दाबणे चालू ठेवले तर मिटलेल्या भाल्यासारख्या घड्या पडतात. एखादी कामटी टोकाकडून दाबून वाकवीत असताना प्रथम तिला कमानीसारखा बाक येतो व नंतर ती कमानीच्या माथ्याच्या जवळपास तुटते. एखादी तार ताणीत असताना अखेर ती तुटते. एखाद्या काडीला किंवा खडूच्या कांडीला पीळ दिल्यास ती तुटते. खडकावरही दाब, ताण, व पीळ यांचे असेच परिणाम होतात.

कवचाच्या हालचाली व त्यांच्यामुळे उत्पन्न होणारे दाब पडणे, ताणले जाणे इत्यादी परिणाम अगदी मंद गतीने घडून येतात. खडकांचे थर हे काही प्रमाणात दाब, ताण इत्यादी सहन करू शकतात किंवा वाकू शकतात पण त्यांची तीव्रता विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक होताच खडक अकस्मात भंग पावतात. त्यानंतरही भंग पावलेल्या खडकांची विषम हालचाल होणे शक्य असते. खडक भंग पावून तयार झालेल्या भेगेच्या एका बाजूचे खडक वरती, खालती, पुढे किंवा मागे सरकतात. अशी विषम हालचाल होऊन तयार होणाऱ्या रचनेला विभंग ( फॉल्ट ) म्हणतात. खडकात निर्माण होणाऱ्या घड्या, भेगा, किंवा विभंग ही केवळ सूक्ष्मदर्शकानेच दिसू शकतील इतकी सूक्ष्म किंवा मोठी किंवा फार मोठी असतात. काही सेंटिमीटरांपासून तो कित्येक हजार किलो मीटरांइतकी लांबी असणाऱ्या भेगा किंवा विभंग आढळतात. विभंग किती मोठे असू शकतात हे पुढील उदाहरणांवरून कळून येईल. भारताच्या द्वीपकल्पाचा पश्चिम किनारा जवळजवळ सरळ आहे. त्याच्या शेजारीच त्याला जवळ जवळ समांतर अशी सह्याद्रीच्या तुटलेल्या कड्यांची रांग आहे. किनाऱ्याची ही रूपे विभंगामुळे निर्माण झालेली आहेत अशी कल्पना आहे. पूर्वी भारताच्या द्वीपकल्पाची जमीन पश्चिमेकडे अधिक दूरवर पसरली होती. काही लक्ष वर्षांपूर्वी विभंग होऊन या जमिनीचा पश्चिमेकडचा काही भाग खचून खाली गेला व त्याच्या जागी अरबी समुद्र आला. त्यामुळे आजच्यासारखा पश्चिम किनारा निर्माण झाला. हिमालयाच्या पायथ्यालगत सिंधूपासून ब्रह्मपुत्रेपर्यंतच्या, डोंगरांच्या रांगा असलेल्या पट्ट्यात त्या रांगांच्या लांबीइतकी लांबी असलेले विभंग आहेत व त्यांच्यामुळे विभंगांच्या दक्षिणेस असलेले खडक विभंगांच्या उत्तरेकडील खडकांवर चढविले गेले आहेत. वरील उदाहरणांतील विभंगांसारखे विभंग सर्व खंडांत व पर्वतांच्या रांगांत आढळतात.

विभंग उत्पन्न होताना खडकांस एकाएकी तडा गेला व खडकांची तुटलेली खडबडीत पृष्ठे एकमेकांवर घासटत सरकली म्हणजे भूकंप होतात. विभंगांची उत्पत्ती कवचाच्या रचनेशी निगडित असल्यामुळे त्यांच्यामुळे उद्भवणाऱ्या भूकंपास सांरचनिक ( टेक्टॉनिक ) भूकंप म्हणतात. ते का व कसे उत्पन्न होतात याचा विचार पुढील लेखांकात करू.

---

डॉ. नगेन्द्र अनु० प्रा. प्यारेलाल गोहेल

# स्वातंत्र्योत्तर कालातील हिन्दी-वाङ्मय

भारताच्या पार्लमेंटने हिंदीला राजभाषा म्हणून जाहीर करणे हे जसे हिंदीचे सद्भाग्य तसेच दुर्भाग्यही म्हणावे लागेल. सद्भाग्य यासाठी की भारतासारख्या विशाल देशाचे राष्ट्रीय ऐक्य निर्माण करू शकणाऱ्या सूत्रधारकाचा मान तिला मिळाला व दुर्भाग्य यासाठी की राजकारणाच्या चक्रव्यूहात तिला फसावे लागले. हिंदीचे व्यासपीठ राजकीय पुढाऱ्यांनी इतक्या वाईट पद्धतीने वेढले आहे की साहित्यकारांना त्या ठिकाणी मुळी जागाच उरली नाही. परिणाम असा झाला की हिंदी साहित्यकारांची शक्ति दोन भिन्न पण परस्पर विरोधी दिशेकडे विभागली गेली. प्रथम तर भाषेचा प्रश्न सोडवावा लागला. नंतर साहित्य समृद्ध करण्याचा प्रश्न पुढे आला. व्यापक अर्थाने साहित्याची दोन प्रमुख अंगे आहेत. एक शास्त्रीय आणि दुसरे काव्य-विषयक. शास्त्रीय म्हणजे ज्ञान-व्यवहाराचे वाङमय आणि काव्य-विषयक म्हणजे रसात्मक वाङमय. याप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळात हिंदी-साहित्यकारासमोर तीन प्रमुख समस्या निर्माण झाल्या. त्यांचे स्वरूप जरी परस्पर संबंधित असले तरी तात्त्विक दृष्टीने ते भिन्न आहे. समस्या अशा – १. भाषेची २. व्यावहारिक साहित्याची आणि ३. काव्य म्हणजे रसात्मक वाङमयाची.

सन १९४७ ते १९६१ या चौदा वर्षांत हिंदी–वाङमयविकासाच्या या तीन दिशा आहेत. याच आधाराने वाङमयीन वाटचालीचे सिंहावलोकन केले जाऊ शकते.

भारताची राजभाषा मान्य झाल्यावर हिंदी भाषेच्या प्रश्नाने आपोआप एक नवीन स्वरूप धारण केले. या प्रश्नाची एक राजकीय बाजू असून अनेक रथीमहारथी,त्या संदर्भातून लढत आहेत त्यांच्याविषयी आमच्या मनात भीतियुक्त आदर आहे, जसा सामान्य बुद्धिजीवी व्यक्तीला योध्याविषयी असतो तसा. भाषेची वाङमयीन बाजूदेखील आहे; आणि त्याविषयी आमची काही जबाबदारी पण आहे. तसे पाहिले तर रामप्रसाद निरंजनीपासून तर आजच्या पिढीतील हिंदी लेखकापर्यंत हिंदी भाषेच्या शक्तींचा उचित विकास झाला आहे. महावीर प्रसाद द्विवेदींनी तिला स्थैर्य प्राप्त करून दिले. पद्मसिंह शर्मांनी नैतिक अधिष्ठान निर्माण केले. मुन्शी प्रेमचंद यांनी तिच्या व्यावहारिक शक्तींचा विकास केला. रामचंद्र शुक्लांनी तिच्यात गंभीर-विवेचनाचे माध्यम स्थिर केले. पंतांनी तिच्या सूक्ष्म-सौंदर्यानुभूतीची जाणीव करून दिली आणि १९४७ साली आधुनिक हिंदीने एक प्रौढ परिपक्व भाषेचे स्वरूप धारण केले. राजभाषा बनल्यानंतर मात्र तिच्या पुढे अनेक प्रश्न निर्माण झाले आणि साहित्यिक जबाबदारी पार पाडण्याचा आत्मविश्वास धारण करणारी हिंदीभाषा नवीन आलेल्या जबाबदारीच्या भारामुळे काही काळ ती कंपायमान झाल्यास नवल नाही. परंतु आधार पक्का होता. डॉ. रघुवीरांसारखे मेधावी आचार्यांनी सर्व शक्ती एकवटून हिंदीच्या अंतर्भूत सामर्थ्याच्या उचित विकासाला प्रारंभ केला. त्यांच्या बरोबर इतर शब्दकार या दिशेने अग्रेसर झाले. उदाहरणार्थ महापंडित राहुल सांकृत्यायन आणि हिंदीचे वयोवृद्ध कोषकार बाबू रामचंद्र वर्मा. सुरवातीला आचार्य रघुवीरांना फार विरोध झाला. मी प्रथमच जेव्हा त्यांचेबरोबर 'संसदीय – अनुवाद-समितींचे कार्य सुरू केले तेव्हा त्यांची भाषा आणि भाषेपेक्षा त्याची असहिष्णु-वृत्ति खटकली. परंतु जसजसे आम्ही शब्दांच्या अंतर्मनात प्रवेश करू लागलो तसतसा माझा विश्वास दृढ होत गेला की सर्व गुणदोषासहित त्यांचाच मार्ग सुसंगत नि योग्य आहे. त्यांच्या स्वभावाचे हे वैशिष्टच आहे की प्रथम त्यांचे दोष दिसतात व नंतर गुण. त्यांचा प्रमुख दोष म्हणजे त्यांचा हिंदी भाषा व वाङमयाच्या अंतःप्रवाहाशीं विशेष संबंध नाही आणि दुसरे म्हणजे मूलतः ते शब्दकार आहेत शैलीकार नव्हे. तरी देखील

ते आपल्या स्थानी अद्वितीय आहेत. त्यांची ज्ञान-साधने समृद्ध आहेत. संस्कृत-वाङमयाच्या निर्माणक्षमतेचे त्यांना पूर्ण ज्ञान असून गेल्या १५ वर्षांचा शब्द-निर्माण-कलेचा त्यांचा दांडगा अभ्यास आहे. लक्षावधी शब्द-निर्माण करण्यातच त्यांच्या कार्याची चमक दिसून येते.

त्यांनी एकट्याने लक्षावधी शब्द तयार केले आहेत. शब्दाविष्कार आणि सफल प्रयोग करण्यात त्यांची विद्वत्ता दिसून येते. सर्व बाजूंनी त्यांना विरोध झाला परंतु शेवटी त्यांच्याच पद्धतीचा अवलंब केला गेला. ज्यांना ती अमान्य आहे त्यांनी मात्र 'बिचबंदी' 'खोली' सारखे शब्द निर्माण करून राष्ट्रभाषेचा अपमान केला आहे. डॉ. रघुवीर नंतर शिक्षण खात्याने हे काम हाती घेतले. खात्याने आपल्या अधिकारात अनेक भाषाशास्त्रज्ञांना व विविध विषयातील विद्वानांना एकत्र आणून त्यांच्या साहाय्याने पारिभाषिक शब्दांची विपुल निर्मिति केली व त्या आधारावर पारिभाषिक शब्दकोषाचा पहिला भाग मुद्रणासाठी तयार होत आहे. ही शब्दावली अधिक व्यापक आहे. एकतर तिच्या रचनेत अनेक प्रतिष्ठित विद्वज्जनांचे साहाय्य आहे आणि केन्द्रीय शिक्षणखात्याची त्याला मान्यता आहे. याच कारणामुळे शब्दावलीचा प्रचार व प्रसार वाढत आहे. मध्यंतरीच्या काळात अनेक सुलभ कोषदेखील प्रकाशित झाले आहेत. उदा०– डॉ. हरदेव बहारीचा 'इंग्रजी – हिंदी-कोष' व श्री. रघुनाथ गुप्तांचा 'समाजशास्त्र – मानवशास्त्र–पर्याय-कोष.' या दृष्टीने श्री. नरवणे संपादित 'व्यवहार-कोष' देखील उल्लेखनीय आहे. त्यात सर्व भारतीय भाषांचा पर्याय एकत्र केलेला आहे. या प्रयत्नामुळे हिंदी-भाषेची शब्दशक्ती निश्चितपणे वाढली असून तीन दिशेने तिचा विकास झाला आहे.

(१) मोठ्या संख्येने नवीन शब्दांची निर्मिती

(२) शब्दांची रूपे स्थिर झालेली आहेत, होत आहेत.

(३) आमच्या भाषेत अर्थगत सूक्ष्मातिसूक्ष्म भेदांना अभिव्यक्त करण्याची क्षमता प्राप्त झाली.

भाषेची ही शक्ती सन १९४७ पूर्वी नव्हती. या प्रश्नाची दुसरी बाजू देखील आहे. आमच्या अनेक साहित्यकारांना अशी भीती वाटते की संस्कृतचा वाढता प्रभाव हिंदीच्या मूळ स्वरूपाला ग्रासून टाकील. ही शंका पूर्णपणे निराधार नसली तरीदेखील त्याविषयी मला चिंता वाटत नाही; तसे झाल्यास नुकसानीपेक्षा लाभ अनेक आहेत. भाषेचे सौंदर्य, चित्रात्मकता, आणि व्यंजना-शक्तींचा जितका विस्तार संस्कृत वाङ्मयाच्या आधारावर होऊ शकतो तितका इकडच्या तिकडच्या नियमरहित क्रमानुसार निवडलेल्या शब्दांनी होऊ शकत नाही. या विकासशील भाषेविरुद्ध आणखीही एक आक्षेप आहे तो देखिल वास्तविक निराधार मानता येणार नाही. आम्ही एक अनुवाद-भाषेचा विकास तर करीत नाही ना ? हा तो आरोप होय. आज ज्या नवनिर्मित शब्दांनी हिंदी समृद्ध झाली आहे ते सर्व अनुवादित शब्द आहेत. अशा स्थितीत हा विकास स्वाभाविक मानता येईल काय ? ही शंका माझ्या मनात निर्माण झाली परंतु त्याचे उत्तर कठीण नाही. कोणतीही सामर्थ्यशाली भाषा अनुवादाची भाषा राहू शकत नाही. जे भाषांतरित शब्द आज आलेले आहेत ते लवकरच समर्थ लेखकांच्या अभिव्यंजन-प्रक्रियेत येऊन भाषेशी एकजीव होऊन मिसळून जातील. ज्या देशाची संस्कृती एकानंतर दुसरी अशा अनेक विदेशी जातींच्या संस्कारांना आत्मसात करीत आली आहे त्या देशाच्या भाषेला नवीन शब्दांना पचविण्यास असा किती वेळ लागणार आहे ?

भाषेनंतर राजकीय दृष्टीने जो दुसरा प्रश्न समोर आला तो म्हणजे व्यावहारिक-साहित्याचा. इतर भारतीय भाषांच्या तुलनेने हिंदीचे हे अंग खरोखरच अविकसित होते आणि आज देखिल आहे; याचे कारण म्हणजे तशा प्रकारच्या विकासाला वेळच मिळाला नाही; शासन आणि शिक्षण दोन्ही क्षेत्रातील माध्यम इंग्रजी होते एवढेच नव्हे तर विविध-ज्ञान-साहित्य त्यातूनच निर्माण होत राहिले. परंतु स्वातंत्र्यानंतर शासन आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रात हिंदी भाषेच्या व्यवहाराचा प्रश्न आला तेव्हा मात्र वरील प्रकारांच्या साहित्याची आवश्यकता भासू लागली. गेल्या चौदा वर्षात निश्चितपणे प्रगती झाली आहे. भौतिक आणि सामाजिक शास्त्रांच्या क्षेत्रात अनेक ग्रंथांचे प्रकाशन झाले आहे. काही दिवसापूर्वी शिक्षण-

खात्याने आयोजित केलेल्या सर्व-भाषा-वैज्ञानिक ग्रंथांच्या प्रदर्शनाने हे सिद्ध झाले आहे की विचित्र विषयांवर बरीचशी सामुग्री आज उपलब्ध आहे.

या दिशेने सर्वात चांगले कार्य म्हणजे नागरी–प्रचारिणी–सभेतर्फे प्रकाशित झालेला 'हिन्दी–विश्वकोष' भाग पहिला हे होय. याशिवाय उत्तर–प्रदेशाच्या हिन्दीसमितीने व बिहार–राष्ट्र-भाषा परिषदेने देखील अनेक उपयुक्त ठरणारी प्रकाशने केली आहेत. एवढे असून देखिल अपुरेपणा फार मोठा आहे. हिन्दी भाषेतील ही उणीव भरून काढण्यासाठी नियमितपणे मोठ्या प्रमाणावर युद्ध–तयारीच्या गतीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. दुर्दैवाने दोषा-रोपणाची गती फार, निर्माण-कार्याची मात्र मंद गती. केंद्र आणि राज्य सरकारांनी आपल्या योजना बनविल्या आहेत. थोडे बहुत कार्यही होत आहे परंतु आवश्यकतेच्या दृष्टीने हे कार्य फारच जुजबी आहे, अधोगतीच्या अनेक कारणांपैकी एक कारण म्हणजे बहुतेक सर्व क्षेत्रात इंग्रजीचा वापर होत असून हिंदी–लेखकांना प्रेरणा मिळू शकत नाही. दुसरे म्हणजे या विषयात हिंदीचे चांगले लेखक फार थोडे आहेत. तिसरे, शासन आणि शिक्षण दोन्ही क्षेत्रात प्रमुख स्थानांवर दुर्दैवाने ज्यांना हिंदीचे आवश्यक ज्ञान नाही, अशा व्यक्ती विराजमान आहेत. सर्वांचा हिंदीला विरोध नाही, अनेकांच्या मनात हिंदीविषयी वास्तविक प्रेम आहे परंतु प्रश्न आजच्या परिस्थितीचा आहे. चौथे, अशा काही व्यक्ती आहेत की ज्यांच्या मनात स्वार्थामुळे व काहींचा सिद्धान्ताच्या आग्रहामुळे द्वेषभावना निर्माण झाली आहे. या लोकांनी तर्ककुतर्कांचा चक्रव्यूह निर्माण केला असून त्यामागे लपून ते आपल्या हितसंबंधांचे रक्षण करू इच्छितात. त्यांच्या मते हिंदीमध्ये योग्य ग्रंथांचा अभाव आहे त्यामुळे ती उच्च शिक्षणाचे तसेच शासनाचे माध्यम होऊ शकत नाही आणि जोपर्यंत हिंदीचा या क्षेत्रात उपयोग केला जात नाही तोपर्यन्त योग्य ग्रंथ निर्माण होणार नाहीत. हा पेच खरोखरच चिंतेचा विषय आहे. परंतु आम्ही निराश होता कामा नये. राष्ट्राचे हित व्यक्तीच्या हितापेक्षा श्रेष्ठ आहे आणि कालाच्या या शक्तिशाली प्रवाहाला विपरीत दिशेला वळविणे कदापि शक्य नाही. या दिशेने लवकरच प्रयत्न होणे आवश्यक आहे. रिकाम्या विद्वानांच्या संकुचित मनोवृत्तीने हे कार्य कधीही होणे शक्य नाही त्यासाठी बृहद्–राष्ट्रीय–ज्ञान परिषदेची स्थापना होणे अनिवार्य आहे.

आता सृजनात्मक–साहित्य किंवा रसात्मक–वाङ्मयाविषयी. साहित्याचे हे अंग स्वभावतःच अदम्य असते– ते राजकीय आदेश पाळीत नाही; कोणत्याही योजनेच्या चक्रव्यूहात ते बद्ध होऊ शकत नाही. तरीसुद्धा रस–सृजन करणारा कलाकार परिस्थितीनिरपेक्ष असू शकत नाही. स्वातंत्र्य प्राप्ती व भारताचे विभाजन यासारख्या घटना घडल्या. १९४७ नंतर घडलेल्या घटनांचा प्रभाव संवेदनशील व्यक्तींच्या अंतःकरणावर झाल्याशिवाय राहिला नाही. प्रथम, स्वातंत्र्यप्राप्तीची घटना ही मुळी एक भव्य घटना होती. अनेक शतकांनंतर अशी घटना घडली. भारताचे कवी व कलाकार तसेच अनेक युगे अपमानित झालेल्या अंतरात्म्यांनी निश्वास टाकला. त्यांच्या मनात एक नवीन आत्म–विश्वास निर्माण झाला. विश्वकल्याणाच्या ज्या स्वप्नांना गांधी आणि पूर्व ऋषींच्या मंत्रबलाने गुलामीच्या अंधकारात देखील जतन करून ठेवले होते, त्यांना प्रथमच सार्थक बनविण्याची नवीन संधी चालून आली होती. अहंकार व गर्वरहित भारताच्या सुसंस्कृत मनाने आपल्या स्वातंत्र्याला अखिल मानवाच्या स्वातंत्र्याचे प्रतीक मानले. भारताच्या राजनीतितज्ञांनी व कवींनी एका स्वरात त्याचा उद्घोष केला –

**भारत स्वतंत्र आहे जेव्हा सर्व स्वतंत्र होतील.**

काळाच्या गतीने भारताच्या जागतिक–मैत्रीचे स्वरूप अधिकाधिक स्पष्ट होत गेले. आमच्या वाङ्मयाचा त्याच्याशी प्रत्यक्ष संबंध आहे. खरे पाहता या मनोवृत्तीचा मूलाधार काव्यात्मक आहे. त्याचा विकास राजकीय मुत्सद्यांच्या डावपेचावर आधारलेला नाही. रवीन्द्रनाथ आणि त्याच्या सारख्या पूर्वीच्या आणि नंतरच्या कवींच्या वाणीचा तो प्रभाव आहे. उपनिषदापासून तर छायावादापर्यंत भारतीय परंपरेचा पवित्र आधार त्यामागे आहे. हिंदीत अनेक कवींनी अनेक रचना केल्या, त्यातील बऱ्याचशा कलाकृतीत काव्यगुण नगण्य आहे तरीदेखील मह-

त्याचा प्रभाव पंत, सियारामशरण गुप्त, 'नवीन' व दिनकर यांचा दिसून येतो. पंत आणि सियारामशरण यांच्या काव्यात राष्ट्राच्या स्वतंत्र आत्म्याचा पवित्र उल्हास होता तर 'नवीन' व दिनकर मध्ये त्याचे सात्विक तेज होते.

स्वातंत्र्याचे हे वरदान विभाजनाच्या अभिशापाबरोबर आले. मुक्त आकाशात अरुणोदय झाला पण गृहकलहाचे काळे ढग जमू लागले. गुलाम राष्ट्राच्या उपचेतन मनात संग्रहित झालेली विकृती सहजपणे उफाळून निघाली व संपूर्ण देश पाशवी शक्तीच्या हट्टाग्रहाने निनादू लागला. हे दिवस येथील मानव समाजाच्या भयंकर विफलतेचे होते परंतु साहित्यात त्याचा प्रभाव क्वचितच दिसून आला. भारतीय वाङ्मयाशी परिचित असणाऱ्यांची हृदये त्यामुळे गर्वाने फुलून गेली. कारण हिंदीच्या एकाही साहित्यकाराने सांप्रदायिक झगड्यांना आश्रय दिला नाही. या घटनेच्या प्रेरणेतून जे वाङ्मय आज उपलब्ध आहे त्यात तत्कालीन विक्षिप्त पशु मनोवृत्तीत मानवतेच्या शुद्ध आत्म्याचा शोध निश्चितच लागतो. या प्रकारचे वाङ्मय संख्येने जास्त नाही. भारताचे विभाजन व त्यानंतर घडलेल्या काही घटनांचे पडसाद काही एकांकी-नाटकातून व क्वचित दोन तीन कादंबऱ्यांतून पडलेले आढळतात. हिंदीच्या अधिकांश समर्थ लेखकांनी देशाच्या या लज्जास्पद घटनांना झाकण्याचाच प्रयत्न केला.

या नरमेध–यज्ञाची पूर्णाहुती गांधीजींच्या बलिदानाने झाली. गांधींचे हौतात्म्य देशाच्या सांस्कृतिक इतिहासात एक महान घटना होती. विश्वकवी रवीन्द्रनाथांची एके ठिकाणी महाकाव्याविषयी म्हटले आहे 'जेव्हा मनाच्या विश्वात एका महान व्यक्तीचा उदय होतो; स्वाभाविकपणे जेव्हा एक महानपुरुष कविमनाच्या राज्यात अधिकारुढ होतो, मानवी चारित्र्याची उदारता मनःचक्षूंपुढे अधिष्ठित होते, तेव्हा त्याच्या उन्नत भावनांनी प्रेरित होऊन त्या महापुरुषाची प्रतिमा प्रतिष्ठित करण्यासाठी कवी भाषासौंदर्याचे मंदिर उभारतो. त्या मंदिराचा आधार पृथ्वीच्या अंतर्मनात असतो व त्याचा कळस मेघमालांना छेदून आकाशात उंच उंच जातो. त्या मंदिरातील प्रतिष्ठित प्रतिमेच्या पवित्र भावनांनी मुग्ध होऊन, तिच्या पुण्यप्रकाश किरणांनी अभिभूत होऊन नाना दिशांनी येऊन मानवसमूह तिला प्रणाम करतात. यालाच महाकाव्य म्हणतात. या दृष्टीने पाहिल्यास मलादेखील असा विश्वास वाटतो की आधुनिक जगाच्या इतिहासात गांधीसारखा महाकाव्योचित चरित्र–नायक जन्मला व त्यांच्या बलिदानापासून तशाच घटनादेखील घडल्या.

गांधींच्या जीवन–मरणाविषयी अनेक कविता लिहिल्या गेल्या. त्या प्रामुख्याने पंत, सियाराम शरण, 'नवीन' दिनकर, बच्चन, नरेन्द्र आणि सुमन आदि कवींच्या चांगल्या रचना आहेत. या कवींनी गांधींच्या बलिदानापासून प्रेरणा घेतली. परंतु त्यांच्या अनेक कविता विषयांची उंची गाठू शकल्या नाहीत. याचे कारण म्हणजे भारतीय काव्यशास्त्रात सामान्यभाव व काव्यगत भाव यात फरक मानला असून आमच्या प्राचीन आचार्यांनी मोठ्या मार्मिकपणे हे स्पष्ट केले आहे कीं जीवनानुभूती आपल्या स्वाभाविक स्वरूपात अभिव्यक्त न होता संस्कारित झाल्यानंतरच काव्याचा विषय बनू शकते. स्वाभाविक-स्वरूपात त्याचे ऐंद्रिक–तत्व रसात्मक अभिव्यक्तीला बाधक होते. गांधींच्या महानिर्वाण-संबंधी-काव्यात यासाठीच अपेक्षित उदात्त रसाचा संचार होऊ शकला नाही. कारण घटनेचा प्रभाव अजून ताजा आहे. आज ज्या कवींनी त्याचा अनुभव घेतला आहे तो अनुभव अजून संस्कारित होऊ शकला नाही. हे खरे आहे की अनेक कालापर्यंत ते संस्कारित होऊ शकत नाही. गांधीजींच्या जीवनावर महाकाव्य कदाचित् काही काला नंतरच लिहिले जाईल. तेव्हा मात्र गांधींच्या जीवन-मरणाशी संबंधित स्वाभाविक अनुभूती तशी न राहता संस्कारित बनेल.

या काळात काव्याचे दोन विषय आमच्या पुढे आले- (१) भारताचे आंतरराष्ट्रीय शांततेचे धोरण (२) संत विनोबांचे भूदान आंदोलन. तात्त्विक दृष्टीने आमच्या देशातील कवींना हे विषय नवीन नव्हते. नेहरूचे शांतीचे धोरण गांधींच्या अहिंसेची राजकीय अभिव्यंजना आहे आणि विनोबांचा सर्वोदय त्या धोरणांची आर्थिक अभिव्यक्ति. काव्यशास्त्राच्या

शब्दात तिघांचा स्थायीभाव एकच आहे. कवी नवीन आणि सियारामशरण यांनी या विषयांचे निष्ठेने ग्रहण केले आहे.

वर ज्या काव्य-विषयांचा उल्लेख केला आहे ते प्रामुख्याने एकाच प्रवृत्तीची विविध अंगे आहेत. अशाच प्रेरणेने प्रेरित होऊन मी 'आधुनिक हिंदी कवितेची प्रमुख प्रवृत्ति' हे पुस्तक लिहिले आहे. ही काव्यप्रवृत्ती काही नवीन नाही. स्वातंत्र्यापूर्वी देखील आमच्या साहित्यात तिचे अस्तित्व होते. स्वातंत्र्या-नंतर वृत्तींत काही बदल घडून आला खरा परंतु मूलभूत-तत्वे तीच राहिली. परतंत्र देशाची अवरुद्ध भावना आज त्यात नसून तिचे स्थान स्वतंत्र राष्ट्राच्या आत्मविश्वासाने घेतले आहे. दुसरे, राजकीय संघर्ष समाप्त झाल्यामुळे अहिंसेवर आमची भावना अधिक दृढ झाली आहे. तसेच अंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतीचे धोरण सफल झाल्यामुळे विश्वबंधुत्वाचा आदर्श प्रत्यक्ष व्यवहारात येऊ लागला आहे. अशा प्रकारे संशय, असहयोग, प्रतिकार इत्यादींचे निराकरण झाल्यामुळे जीवनाच्या आस्तिक मूल्यांचे पोषण झाले. याचा परिणाम असा झाला की स्वातंत्र्यानंतर राष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब ज्या कवितेत उमटते त्यातील तामसिक गुण निःशेष पावले आणि शुद्ध सात्विक, उत्साह व उल्हासादीप्रवृत्तींची अभिवृद्धि झाली. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे असे सांगता येईल की आज राष्ट्रीय-तत्त्वे पृथक् न राहता बऱ्याच प्रमाणात सांस्कृतिक तत्त्वांशी एकजीव झालेली आहेत. आधुनिक हिंदी कवितेचे हे प्रमुख प्रवाह आहेत. स्वातंत्र्य-पूर्व युगातील तिन प्रवृत्ती— ओज आणि उत्साहातून प्रेरित राष्ट्रीय प्रवृत्ती, सत्य-चिंतनातून अनुप्राणित सांस्कृतिक-प्रवृत्ती आणि सौंदर्य-भावनेतून विकसित छायावादी प्रवृत्ती या त्रिवेणीत मिळून तदाकार झाली. कोणी असा प्रश्न उपस्थित करील की यापासून काय प्राप्त झाले? त्याचे उत्तर असे की आधुनिक काव्याच्या अंतर्गत चैतन्याची निर्मिती होत असून आज ना उद्या कोणी सामर्थ्यशाली कवी आपल्या अमृततुल्य वाणीने तिचा उद्‌घोष करीलच.

या क्षेत्राबाहेर देखील एक असा कवींचा वर्ग आहे की ज्यांच्यावर चांगले संस्कार न झाल्यामुळे आस्तिक —मूल्यांना ते ग्रहण करू शकले नाही. ते तर वर उल्लेखलेल्या जीवनविषयक सांस्कृतिक मूल्यांच्या विरुद्ध 'प्रगति' किंवा 'प्रयोग' करीत आहेत. सक्रियतेच्या दृष्टीने हा वर्ग मागे नाही. आपल्या परीने ते जीवनाची व्याख्या करण्याचा प्रयत्न करीत असतात. १९४७ पूर्वी जे प्रगतिवादी होते त्यापैकी काही संस्कारशील कवींनी सांस्कृतिक मूल्ये मान्य केली आहेत. परंतु ज्यांना ते आजही मान्य नाहीत ते एकतर देशाच्या आर्थिक धोरणांच्या विरुद्ध बडबडू लागतात नाहीतर दमित-वासनांची चित्रे काव्यात चितारण्याचा निष्फळ प्रयत्न करीत असतात. मी स्वतः अशा कवितांशी सहमत नाही. परंतु तरीदेखील त्या विषयाचा अभ्यास केल्यानंतर असे वाटू लागते की ही प्रवृत्ती केवळ बौद्धिक विकृति नाही आणि जर बौद्धिक विकृति आहे असे मानले तरी देखील आजच्या जीवनात ती सर्वस्वी अवास्तविक वाटत नाही. आजचा बुद्धिजीवी तरुण आस्तिक नाही. आजचे युग त्याच्या व्यक्तिगत आशा-आकांक्षांना समाधान देऊ शकत नाही. त्याने हे हेरले आहे की आज आपल्या प्रतिभेचे चीज होणे शक्य नाही म्हणून तो क्षुब्ध असतो. समाजाविषयी त्याची भावना इतकी प्रगल्भ नाही की राष्ट्राच्या सामूहिक विकासापासून किंवा कमीतकमी विकासाच्या प्रयत्ना-पासून प्रेरणा ग्रहण करू शकेल. भावी जीवनाची कल्पना स्थिर करू शकेल. एवढा तो सुसंस्कृत श्रद्धावान नाही. अशा स्थितीत तो स्वतः आधुनिक अतिरेकी विचारांनी प्रभावित होतो. दमित-भावना व नास्तिक बुद्धिबरोबरच नाना प्रकारचे खेळ तो खेळतो. आजच्या प्रयोगवादी कवितेची ही अंतरंगी व्याख्या आहे. अशा प्रकारची प्रवृत्ती आजच्या युगात अस्वाभाविक नाही. परंतु तरीदेखील ती खरी नाही. कारण ती नकारात्मक—वृत्तीवर आधारित आहे. विधायकाचा तिला आधार नाही.

साहित्यातील इतर क्षेत्रात देखील बरेच कार्य झाले आहे. हिंदी कादंबरीचा बराच विकास झाला— आज जरी हिंदी कादंबरीत स्वातंत्र्यपूर्व युगाचे चित्रण प्रामुख्याने आढळून येत असले तरी कलात्मक विकासाची पातळी उंचावलेली आहे. प्रेमचंदाच्या सामाजिक, राजकीय परंपरेत अमृतलाल नागरांची

'बुंद और समुद्र' तसेच 'सुहाग के नूपुर' यांचे स्थान मोठे आहे. या वर्गातील इतर ख्यातनाम कादंबरी-कारात भगवतीचरण वर्मा व उपेंद्रनाथ 'अश्क' यांनी गुणात्मक आणि संख्यात्मक दोन्ही दृष्टीने महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. मनोविश्लेषणात्मक कादंबरीच्या क्षेत्रात अज्ञेयाची 'नदीके द्वीप' इलाचंद्र जोशींची 'जहाज का पंछी' व जैनेंद्रांची 'सुखदा' व 'जयवर्धन' आदींची रचना विशेष उल्लेखनीय आहे. हे सांगणे मात्र कठीण आहे की कोणती कलाकृति त्यांच्या पूर्वीच्या कलाकृती पेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. या दृष्टीने वृंदावनलाल वर्माची 'झांसीकी रानी' व 'मृगनयनी' दोन्हीही उत्तम ऐतिहासिक कादंबऱ्या आहेत. हिंदीत त्यांचे स्वतःचे असे विशिष्ट स्थान आहे. इकडे यशपाल कृत 'झूटा सच' देखील महाकाव्योचित गुणश्रेष्ठत्वामुळे प्रगतिवादी-कादंबरीत निश्चितपणे सर्वश्रेष्ठ आहे. स्वातंत्र्यानंतर कादंबरीच्या क्षेत्रात एक नवीनच स्वरूपाचा आविर्भाव झाला आहे तो म्हणजे प्रादेशिक कादंबरीचा, या संदर्भात फणिश्वर रेणूंची 'मैला आंचल' आणि 'परती परिकथा' यांची रचना नवीन दिशेकडील प्रयोगाची यशस्वी वाटचाल दर्शवितात. हे प्रयोग कितपत यशस्वी झाले आहेत हे आजच सांगणे घाईचे होईल.

हिन्दी नाटक आता रंगमंचकाजवळ येऊ लागले आहे. काही प्रतिमा मोठ्या प्रमाणात उफाळून येऊ लागल्या आहेत. अग्रणी नाटककारात लक्ष्मीनारायण मिश्र, उदयशंकर भट, सेठ गोविंददास यांचा रंगमंचकाच्या विकासशील कलेशी अधिक जवळचा संबंध प्रस्थापित झाला आहे. आजच्या काळात सर्वात अधिक विकास समीक्षा-वाङमयाचा झाला आहे. हे निःसंशय आहे की आचार्य शुक्ल सारखे प्रतिभावंत ते नसतील परंतु त्यांच्या असाधारण परंपरेचा १४-१५ वर्षा पासून कमशः विकास होत आला आहे व आताही होत आहे. याशिवाय समाजशास्त्र, मनोविश्लेषणशास्त्र तसेच सौंदर्यशास्त्राच्या नवीन पद्धतीचा सम्यक् उपयोग करून नवीन समीक्षा-प्रणालीचा उगम झाला आहे. इकडे भारतीय आणि पाश्चात्य काव्य-सिद्धांतांचा द्रुत गतीने अभ्यास होत आहे. देशविदेशच्या जवळ जवळ सर्व विद्वानाचे सर्व शास्त्र-ग्रंथ हिंदीत सुलभ प्राप्त आहेत. हिंदीचे काव्यशास्त्र आज भारतीय भाषांमध्ये सर्वात अधिक समृद्ध आहे. नवनवीन शोधांमुळे अप्रकाशित ऐतिहासिक सामुग्री पुढे आली आहे आणि हिंदीचे विद्वान लेखक नागरी-प्रचारिणी -सभेतर्फे आयोजित 'हिंदी साहित्यका बृहद्-इतिहास' या ग्रंथांत तिचा उचित उपयोग करीत आहेत. हा इतिहास म्हणजे एक महान प्रयत्न होय. ग्रंथांचे तीन भाग प्रकाशित झाले असून इतर होत आहेत. पूर्ण झाल्यावर जवळ जवळ १० हजार पानांचा हा महाग्रंथ जागतिक साहित्यात सर्वात मोठा साहित्यिक-इतिहास होईल. त्याच्या तुलनेत इतर 'पुस्तक-किडयांचा काय पाड ? भाषाशास्त्राची प्रगति देखील उपेक्षणीय नाही. विभिन्न भारतीय भाषाच्या विकट संबंधांमुळे तुलनात्मक भाषाशास्त्राच्या अध्ययनासाठी व्यापक क्षेत्र उपलब्ध झाले आहे. त्याप्रमाणे भाषा-विज्ञानाच्या संशोधनामुळे देशाच्या अनेक बोलीच्या अभ्यास-योजनांचे कार्य होत आहे.

शेवटी निष्कर्ष असा की स्वतंत्र भारतात हिंदीच्या विकासाच्या दोन प्रमुख बाबी आहेत-ज्ञान-साहित्यात जेथे अभूतपूर्व उन्नति झाली आहे तेथे रसात्मक वाङमयाची यशस्विता अधिक प्रमाणात समाधानकारक म्हटली जाऊ शकेल. यात अभिमान बाळगण्याचे कारण नाही कारण खरे पाहता हा निर्माण काळ नव्हताच. फार तर निर्माण प्रक्रियेचा काळ म्हणता येईल. किंवा निर्माण-प्रक्रियेच्या आधीचा. काळ. निर्माण आणि सृजन दोघात बाह्य समानता असून देखील भौतिक दृष्टीने त्यात भेद आहे. निर्माण, योजनाबद्ध, विवेकपूर्ण, आणि प्रयत्नसाध्य कर्म आहे. सृजन, अंतःस्फूर्त प्रयत्नसाध्य क्रिया आहे. जी योजनेच्या चौकटीत बसू शकत नाही आणि लाभालाभ-विवेकाने नियंत्रितही नाही. हिंदी साहित्यकार आज निर्माण- योजनात संलग्न आहेत त्याचे अपेक्षित परिणाम काही कालानंतरच दृग्गोचर होतील. म्हणून आजच्या उपलब्ध साहित्याचे मूल्यांकन परिणामाच्या आधारावर नव्हे तर प्रयत्नाच्या निकषावर घासून पाहणे योग्य ठरेल.

प्रा. म. वा. कुलकर्णी

# गीतेतील ‘तस्मात्’ पदाचा विचार

गीतेचे तात्पर्य निश्चित करण्यासाठी मीमांसकांच्या पद्धतीप्रमाणे[1] उपक्रम, उपसंहार, अभ्यास, अपूर्वता, फल, अर्थवाद आणि उपपत्ति या सात गोष्टींचा अवश्य विचार करावयास हवा, अशा आशयाचा विचार लो. टिळकांनी गीतारहस्यात विषयप्रवेश या पहिल्याच प्रकरणात मांडला आहे. या संदर्भात ‘अभ्यास’ या विषयाच्या संबंधात गीतारहस्यातील त्यांचा उतारा पुढे देत आहे. विषयप्रवेश या प्रकरणात ते म्हणतात,

“गीता सांगत असता जागोजाग अनेक प्रकारची अनेक कारणे दाखवून व पुढे ‘तस्मात्’ म्हणजे ‘म्हणून’ हे पद – अनुमानदर्शक महत्त्वाचे पद– अनुमानदर्शक महत्त्वाचे पद– घालून “तस्माद्युध्यस्व भारत”– हे अर्जुना! म्हणून तूं युद्ध कर (२–१८); “तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः”– म्हणून तूं युद्धाचा निश्चय करून ऊठ (गी. २·३७); “तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर”– म्हणून तूं आसक्ति सोडून आपले कर्तव्यकर्म कर (गी. ३–१९); “कुरु कर्मैव तस्मात् त्वं”– म्हणून तू कर्मच कर (गी. ४–१५); “मामनुस्मर युद्ध च”– म्हणून माझे स्मरण कर व लढ (गीता. ७–८); “सर्व कर्ता व करविता मी असून तूं निमित्तमात्र आहेस, म्हणून लढाई कर व शत्रूंना जिंक” (गीता. ११–३३); शास्त्राप्रमाणे प्राप्त झालेले कर्तव्य करणे तुला उचित आहे” (गी. १६–२४); असा निश्चितार्थक कर्मपर उपदेश अर्जुनास केलेला असून, अठराव्या अध्यायातील उपसंहारात पुनः “ही सर्व कर्मे केली पाहिजेत” (गी. १८–६) असे आपले निश्चित व उत्तम मत भगवंतानी सांगितले आहे; ...”

गीतेत पुनःपुन्हा (म्हणजेच अभ्यासाने) कर्म कर, युद्ध कर अशा आशयाचा उपदेश असून तोही विशेषत्वाने तस्मात् पद योजून आलेला आहे ही गोष्ट लो. टिळकांनी ठळकपणे लक्षात आणून दिली आहे. तस्मात् पदाचे वर्णनही त्यांनी ‘अनुमानदर्शक महत्त्वाचे पद’ असे केले आहे.

लो. टिळकांच्या वरील उताऱ्याच्या संदर्भात, आणि विशेषतः तस्मात् पदाला त्यांनी दिलेले महत्त्व लक्षात घेऊन, गीतेतील तस्मात् पदयुक्त सर्वच श्लोकांचे परीक्षण करणे उद्बोधक ठरणार आहे.

एक गोष्ट प्रथमच लक्षात घेतली पाहिजे की अर्जुनास भगवंतांनी युद्ध करावयास सांगितले आहे, किंवा भगवंतांनी गीतेत कर्मयोगाचा उपदेश केलेला आहे ही वस्तुस्थिति, ज्यांना टिळक सांप्रदायिक समजतात त्या भाष्यकारांनीही अमान्य केलेली नाही. प्रामुख्याने कर्मसंन्यासवादी म्हणून टिळकांचा ज्यांच्यावर विशेष रोख आहे त्या आद्य शंकराचार्यांनीही आपल्या गीताभाष्यात प्रारंभीच निवृत्तिपर व प्रवृत्तिपर असे दोन प्रकारचे वैदिक धर्म गीतेत उपदेशिलेले असल्याचे स्पष्ट म्हटले आहे.[2] कर्मयोग-प्रतिपादन गीतेत असल्याचे सर्व भाष्यकार मान्य करतात, मात्र त्यांनी या प्रवृत्तिपर कर्मयोगास “गौण म्हणजे ज्ञानाचे केवळ

---

१. उपक्रमोपसंहारौ, अभ्यासोऽपूर्वता फलम् । अर्थवादोपपत्ती च लिङ्गं तात्पर्यनिर्णये ॥ लो. टिळकांनी हा श्लोक उद्धृत केलेला आहे. गीतारहस्य पृष्ठ २१ पाहा. हे पृष्ठ १९५० साली प्रसिद्ध झालेल्या ६ व्या आवृत्तीनुसार दिलेले आहे. यापुढील गीतारहस्यातील संदर्भ याच आवृत्तीतील समजावे.

२. द्विविधो हि वेदोक्तो धर्मः प्रवृत्तिलक्षणो निवृत्तिलक्षणश्च जगतः स्थितिकारणम् । ... ... स च भगवान् ... ... वैदिकं धर्मद्वयं, अर्जुनाय शोकमोहमहोदधौ निमग्नाय, उपदिदेश ।
पूना ओरिएंटल सीरीज मध्ये क्र. १ ने प्रकाशित झालेले श्रीमच्छङ्कराचार्यांच्या भाष्यासहित गीतेचे पुस्तक (१९५०) पृष्ठ १ व २ पाहा. शांकरभाष्याचे संदर्भ या प्रतीवरून दिलेले आहेत. संक्षेपाने या पुस्तकास गीता-भाष्य म्हटले आहे.

साधन ठरवून आपापल्या संप्रदायात जे जे तत्त्वज्ञान आणि त्याबरोबरच मोक्षदृष्ट्या अखेरचे कर्तव्य म्हणून जे जे आचार वर्णिलेले आहेत ते तेच ... गीतेत प्रतिपाद्य आहेत ... असा गीतार्थाचा निश्चय केला आहे "[1] अशीच केवळ टिळकांची तक्रार आहे. टिळकांच्या दृष्टीने "गीतेत कर्मयोग प्रधान मानिला आहे"[2] इतकेच नव्हे तर गीतेचे तीन शब्दात तात्पर्य सांगावयाचे झाल्यास ते 'ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोग' असेच सांगावे लागेल.[3]

तेव्हा, गीतेत तस्मात् पदयुक्त श्लोकांनी ज्या एका सिद्धान्ताचा अभ्यास केला जातो तो अशा 'ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोग' सिद्धान्ताचा असला पाहिजे असे टिळकांच्या दृष्टिकोनातून पाहिले असता म्हणावे लागेल.

गीतेतील तस्मात् पदयुक्त श्लोकांचे परीक्षण करताना लो. टिळकांच्या दृष्टिकोनातून प्राप्त होणारी वरील अपेक्षाही नजरेसमोर ठेवणे इष्ट होईल.

पुढील २४ श्लोकात गीता 'तस्मात्' पद उपयोजिते. सन्दर्भासाठी सहज उपलब्ध असावे म्हणून हे श्लोक अध्यायानुसार येथे देत आहे. मात्र परीक्षणाचे वेळी हाच क्रम न ठेवता सोयिस्कर गट करता येतील.

अध्याय १ –

३७– तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान् स्वबान्धवान् ।
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ॥

अध्याय २

१८– अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥
२५– अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥
२७– जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥
३०– देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥
३७– हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ॥
५०– बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।
तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥
६८– तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥

अध्याय ३–

१५– कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥
१९– तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥
४१– तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।
पाप्मानं प्रजही ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥

अध्याय ४–

१५– एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥
४२– तस्मादज्ञानसम्भूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ।
छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥

अध्याय ५–

१९– इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ॥

अध्याय ६–

४६– तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः।
कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥

अध्याय ८

७– तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ॥
२०– परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः ।
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥
२७– नैते सृती पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन ।
तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ॥

---

१. गीतारहस्य पृष्ठ १८.

२. ,, ,, १८.

३. गीतारहस्याची लो. टिळकांची प्रस्तावना– पृष्ठ १२. याशिवाय त्यांनी **ज्ञानोत्तर** कर्मयोग हेच गीतेचे प्रतिपाद्य असल्याचे अनेक ठिकाणी म्हटले आहे. उदा० गीतारहस्य पृष्ठ ३४०, ४४९.

अध्याय ११–

३३– तस्मात्त्वं उत्तिष्ठ यशो लभस्व
जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम् ।
मयैवैते निहताः पूर्वमेव
निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥

४४– तस्मात् प्रणम्य प्रणिधाय कायं
प्रसादये त्वामहमीशमीड्यम् । पितेव पुत्रस्य सखेव सख्युः
प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥

अध्याय १६–

२१– त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत् त्रयं त्यजेत् ॥

२४– तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥

अध्याय १७–

२४– तस्माद् ॐ इत्युदाहृत्य यज्ञदानतपः क्रियाः ।
प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् ॥

अध्यय १८–

६९– न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः ।
भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि ॥

१८·६९ या एकाच श्लोकात दोन वेळा तस्मात् हे पद आलेले असल्याने, गीतेत एकूण २४ श्लोकात मिळून २५ वेळा हे पद वापरलेले दिसते.

परंतु त्यापैकी १८·६९ आणि ८·२० या श्लोकातील एकूण तीन वेळा वापरले गेलेले तस्मात् पद केवळ तुलनार्थक असे वापरलेले आहे. शिवाय १·३७ व ११·४४ या टिकाणी अर्जुनाचे भाषण असल्याने तेथील तस्मात् पदानेही गीतेचा - म्हणजे भगवंताच्या उपदेशाचा - सिद्धान्त स्पष्ट होणार नाही, हे स्पष्ट आहे. अशी एकूण ५ वेळची पदे विचारात घेण्याचे कारण राहिलेले नाही.

राहिलेल्या श्लोकांकडे नजर टाकली तर एक गोष्ट स्पष्ट होईल की सर्वच श्लोकात काही ' तस्मात् हे अनुमानदर्शक महत्त्वाचे पद घालून ' कर्माचा उपदेश आलेला नाही. परंतु तस्मात् पदाचे महत्त्व एकदा मान्य केल्यानंतर सर्वच श्लोकांचा विचार अपरिहार्य आहे.

अ

यापैकी ३·१५; ५·१९; व १७·२४ यांचा एक गट होईल. या ठिकाणी ' कर्म कर ' असा उपदेश नाही, इतकेच नव्हे तर तूं अमूक कर असेही इतर ( २·६८ हा अपवाद वगळून ) श्लोकांप्रमाणे अर्जुनास काहीच ' कार्य ' सांगितलेले नाही.

सर्वगत ब्रह्म हे यज्ञात प्रतिष्ठित आहे या वाक्याने ३·१५ मध्ये यज्ञाचे श्रेष्ठत्व सांगितले गेले आहे. पुढे ३·१६ मध्ये गीता ' एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः। अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ सजीवति ॥ " असे म्हटलेच आहे. तेंव्हा ३·१५ मध्ये जरी कोणत्याही कर्माचा साक्षात् उपदेश नसला तरी हा तस्मात् पदयुक्त श्लोक यज्ञस्तुतीद्वारा कर्ममार्गाचेच समर्थन करीत आहे असे म्हणणे शक्य आहे. मात्र येथे ३·१६ मध्ये यज्ञचक्र चालू न ठेवणारा अघायु असून, फुकट जगतो असे सांगणारी गीता, हे यज्ञचक्र न चालविण्याचीही ज्याला मुभा आहे त्याची ओळख लगेच ३·१७ त

' यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।
आत्मन्येव च सन्तुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥

अशी ' तु ' हे विरोधदर्शक अव्यय वापरुन करून देत आहे हेही येथे लक्षात घेतले पाहिजे. तेंव्हां आत्मरतीस आत्मतृप्तास यज्ञचक्र चालविण्याचा उपदेश येथे करण्याचा मनोदय दिसत नाही. त्यामुळे ३.१५ हा तस्मात्पदयुक्तश्लोक ज्ञानमूलक कर्मयोगाच्या सिद्धीच्या दृष्टीने निरुपयोगीच आहे.

५.१९ या श्लोकात, त्यापूर्वीच ५.१८ त सांगितल्याप्रमाणे[1] विद्याविनयसंपन्न ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा त्याचप्रमाणे चांडाळ या सर्वांच्या बाबतीत ज्यांचे मन सम झाले, ते, ब्रह्म सम असल्याने ब्रह्माच्याच ठिकाणी राहिलेले आहेत येवढेच सांगितलेले आहे. असे हे ब्रह्मणि स्थिताः ' हे तत्पूर्वीच्या ( ५·१७ ) श्लोकात वर्णन केल्याप्रमाणे[2] ज्ञाननिर्धूतकल्मषाः' असे

१. विद्याविनयसम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ॥ गीता– ५·१८

२. तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः ।
गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥ गीता. ५·१७.

असून, त्यांनी ज्ञानोत्तर कर्मयोग आचरावा अशा आशयाचा आदेश गीतेने ५·१९ या तस्मात् पदयुक्त श्लोकात दिलेला नाही.[१]

१७·२४ या श्लोकातही तस्मात् ने पुढे कोणताही विधि अथवा निषेध सांगितलेला नाही. ॐ तत् सत् हा ब्रह्माचा त्रिविध निर्देश १७·२३ मध्ये सांगून नंतर या पदांचे महत्त्व सांगण्यासाठी गीतेत पुढील १७·२४, २५, २६, २७ हे एकूण चार श्लोक आलेले आहेत, त्यापैकी एक चौविसावा ! तेव्हा यातील तस्मात् पद गीतेतील सिद्धांताचा अभ्यास करीत नसून केवळ ॐचे महत्त्व सांगते आहे.[२]

आ–

२·२५; २·२७ व २·३० या तीन तस्मात् पदयुक्त श्लोकांचा विचारासाठी एक गट करता येईल. येथे तीनही ठिकाणी अर्जुना, तू शोक करणे उचित नाही असे सांगितलेले आहे.

आत्मा हा अव्यक्त, अचिन्त्य, अविकार्य आहे हे लक्षात घेऊन, तू माझ्याकडून हे सर्व आत मारले जाणार आहेत असा त्यांच्या संभाव्य मरणाविषयीचा शोक करू नकोस, कुणाच्याही देहात असलेला देही हा नेहमी अवध्यच आहे, म्हणून तू कुणाबद्दलच शोक करू नकोस असा उपदेश २·२५ व २·३० मध्ये असून, २·२७ मध्ये तर, ( २·२६ चा विचार करता)[३] जरी तू आत्मा हा जन्ममृत्यूच्या फेऱ्यात सापडणारा आहे असे मानीत असला तरीही जो जन्मतो त्यास मृत्यु व जो मरतो त्यास पुन्हा जन्म ही गोष्ट अपरिहार्य असल्याने, या संभाव्य मरणाबद्दल तूं शोक करू नकोस असे म्हटले आहे.

अशोच्यांबद्दल शोक करणे हे इष्ट नाही[४] हेच येथे प्रतिपाद्य असून या श्लोकांचा ज्ञानोत्तर कर्माशी काहीही संबंध नाही. इतकेच नव्हे, तर अर्जुन हा आत्म्याला नित्यजात नित्यमृत मानीत असण्याची शक्यताही भगवंतानी येथे गृहीत धरली आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे.

इ–

२·६८; ३·४१ व १६·२१ या श्लोकांचा एकत्र विचार करता येईल.

२·६८ हा श्लोक स्थितप्रज्ञलक्षणांमध्ये आलेला असून, विषयात प्रवेशिणारी इंद्रिये मनाच्या द्वारा प्रज्ञा-हरण करतात[५], म्हणून, हे अर्जुना इंद्रियांच्या विषयांपासून इंद्रिये ओढून घेणाऱ्याची प्रज्ञा स्थिर असते असे समज असे येथे भगवंत सांगतात. तेव्हा येथे गीता काही उपदेश करते असे समजावयाचेच असेल

१. " तथापि या अवस्थेतही कर्मे सुटत नाहीत असा गीतेचा अभिप्राय आहे " असे विधान लो. टिळकांनी येथे केले आहे. गीतारहस्य पृष्ठ. ६६९ ज्या १ ते १२ श्लोकांचा हवाला ते यासाठी देतात ते १९ व्या श्लोकापासून बरेच पूर्वी आलेले असून, प्रस्तुत १९ व्या श्लोकानंतर मात्र अध्यायसमाप्तीपर्यंत एकदाही कर्मासंबंधींचा उल्लेख गीता करीत नाही, हे येथे लक्षात घेतले पाहिजे.

२ ' ब्रह्मवादिनाम् यज्ञदानतपः क्रियाः ' या वाक्प्रयोगावरून येथे ज्ञानोत्तर कर्म उपदेशिले आहे असे वाटण्याचा संभव आहे.

एक तर तस्मात् पदाने हे साध्य होत नाही हे प्रमुखपणे लक्षात घेतले पाहिजे. शिवाय ब्रह्म शब्दाचा वेद असाही अर्थ होतो. ब्रह्मवादी म्हणजे ब्रह्मज्ञानी असा अर्थही करता येणार नाहीच. ' प्रवर्तन्ते ' म्हणजेही ' प्रवर्तेरन् ' नव्हे.

३. अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ।
तथापि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि ॥
– गीता. २.२६.

४. ' अशोच्यानन्वशोचस्त्वम् ' असे भगवंतांनी अर्जुनास उपदेशाच्या आरंभीच म्हटले आहे.
गीता २.११.

५. इन्द्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते । तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवाम्भसि ॥ गीता. २·६७

तर केवळ इंद्रियनिग्रहापुरताच हा उपदेश मर्यादित मानावा लागेल.[१]

३·४१ मध्येही स्पष्टपणे इंद्रियनिग्रह करण्यासच अर्जुनास सांगितले असून, मनुष्याच्या पाचरणास प्रेरक कारण ठरणारा जो काम[२] त्याला तू मार असा स्पष्ट आदेश येथे दिलेला आहे. येथील 'आदौ नियम्य' ह्या पदांनी, अर्जुनास अद्याप इंद्रियनिग्रह साधलेला नाही, त्यामुळे त्यांचा आश्रय घेऊन काम राहिलेला आहे, त्याला मारणे अत्यावश्यक आहे, अशी अर्जुनाची अज्ञानी इंद्रियाधीन मोहग्रस्त अवस्था सूचित झालेली आहे.

१६·२१ मध्ये तर नुसताच काम नव्हे, तर त्यासह त्याची दोन भावंडे, क्रोध व लोभ, या सर्वांची अनर्थकारकता (नरकप्रापकता) सांगून त्यांचा त्याग करण्यास सांगितलेले आहे[३]

तेव्हा या तीन श्लोकात गीता ज्ञानोत्तर कर्मयोग सांगत नसून इंद्रियनिग्रह व कामक्रोधलोभ यांचा त्याग येवढेच उपदेशीत आहे.

## ई

ज्यात प्रत्यक्ष युद्धकर्तव्यता प्रतिपादिली आहे असे २·१८, २·३७, ११·३३, व ८·७ हे चार श्लोक दिसतात. पैकी ११·३३ सोडून बाकीच्यात युद्धसम्बद्ध प्रत्यक्ष शब्दही आहे. ११·३३ मध्ये तो आशय आहे.

परंतु २·१८ हा श्लोक २·२५ व २·३० या वर विचारात घेतलेल्या श्लोकांच्याच जातीचा म्हटला पाहिजे. कारण त्यात, हे सर्व मरणार आहेत ही अर्जुनाची आत्म्याविषयींच्या अज्ञानातून उत्पन्न झालेली भीती हाच भगवंतांनी गृहीत धरलेला मुद्दा आहे. म्हणून 'तस्मात् युध्यस्व' असा स्पष्ट आदेश येथे असला तरी तू ज्ञानी आहेस म्हणून कर्मसंन्यासाच्या भानगडीत न पडता कर्मयोगच आचर असा अर्थ येथे अभिप्रेत नसून आत्मस्वरूपाबद्दलच्या अज्ञानामुळे तू हा मरणविषयक शोक करीत आहेस, तेव्हा माझे एक, आत्मस्वरूपाचा विचार करता हे कोणीही मरणार नाहीत, म्हणून तू हा अज्ञानजन्य शोक सोडून स्वतःचा धर्म तेवढा आचर, युद्ध कर, असाच उपदेश अभिप्रेत आहे.[४] इतकेच नव्हे तर जे मरणार नाहीत म्हणून एकदा भगवंतांनी येथे सांगितले, त्यांनाच मी आधीच मारलेले आहे असेही आपल्या विचाराधीन असलेल्यांपैकी ११·३३ या श्लोकात सांगितलेले दिसते आहे. येथे अर्जुनाला केवळ निमित्तमात्र बनण्यास सांगितले आहे, म्हणजेच त्याला गुरुच्या वधामुळे पाप लागेल, श्रेय मिळणार नाही अशी जी भीती वाटते आहे[५] तिचे निराकरण केले आहे. ज्ञानोत्तर कर्मयोगाचा येथे काही संबंध नसून उलट, कर्मयोग्याने ज्या फलाची अभिलाषा ठेवू नये असे भगवंत वारंवार

---

१. या ठिकाणी लो. टिळक लिहितात, "सारांश, मनोनिग्रहद्वारा इंद्रियनिग्रह हा सर्व साधनांचे मूळ होय. इंद्रिये विषयात व्यग्र होऊन सैरावैरा धावत असली म्हणजे आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याची (वासनात्मक) बुद्धीच होऊ शकत नाही. "– गी. र. पृष्ठ ६१८. मात्र आश्चर्य असे की अन्यत्र तेच लिहितात, "... ब्रह्मज्ञान हेच इंद्रियनिग्रहाचे उत्तम साधन होय असा गीतेचा सिद्धान्त आहे" गी. र. पृष्ठ ६१५.

२. अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः । – गीता. ३·३६.
या अर्जुनाच्या प्रश्नाचे उत्तर–
काम एष क्रोध एष– गीता. ३·३७.

३. युद्ध केल्यामुळे स्वतःसह सर्वांना नरकाची प्राप्ति होईल ही अर्जुनास वाटणारी भीती (गीता– १–४२ व ४४) ही त्याच्या नियत स्वधर्माच्या आचरणामुळे खरी होणार नसून उलट काम क्रोध लोभ यांच्या आधीन राहून मोहाने केलेल्या स्वधर्मत्यागामुळे खरी होणार आहे असे येथे सूचित झालेले दिसते.

४. शंकराचार्य तर येथे म्हणतात- "न हि अत्र युद्धकर्तव्यता विधीयते, युद्धे प्रवृत्त एव ह्यसौ शोकमोहप्रतिबद्धस् तूष्णीमास्ते । तस्य कर्तव्यप्रतिबन्धापनयनमात्रं भगवता क्रियते ।" – भाष्य पृष्ठ १९.

५. न च श्रेयोऽनुपश्यामि– गीता. १·३१.
पापमेवाश्रयेदस्मान्– गीता. १·३६.

सांगतात[1] ते फल–' यश मिळव, शत्रूंना जिंकून समृद्ध राज्याचा उपभोग घे ' – येथे अर्जुनास युद्धाला प्रवृत्त करण्यासाठी भगवंतानी निर्देशिलेले आहे. तेव्हा तस्मात् शब्दाने युक्त असलेल्या या श्लोकाने कर्मयोगसुद्धा येथे उपदेशिलेला नाही.

तीच अवस्था २·३७ याही श्लोकाची आहे. मेलास तरी स्वर्ग, जिंकलास तरी राज्य असा उभयथा लाभ अर्जुनास येथे ' युध्यस्व ' म्हणून सांगताना दाखविलेला आहे. [2]

८·७ मध्ये युद्ध हे विधिवाचक आहे. तथापि तस्मात् पदाने प्रथम ' सर्वेषु कालेषु मामनुस्मर ' असे सांगितले आहे; आणि ते भक्तिमार्गनिदर्शक आहे. या पूर्वीच्या श्लोकात मृत्यूच्या वेळी ज्या गोष्टीचे स्मरण होत असेल त्याच गोष्टीप्रत मनुष्य जाऊन पोहोचतो, मात्र त्या गोष्टीचा ध्यास जीवनभर लागलेला असेल तरच त्या गोष्टीचे स्मरण अंतकाली होण्याची शक्यता आहे[3] असे प्रतिपादन करून नंतर अर्जुनाला युद्ध करताना– म्हणजे पर्यायाने कोणतेही कर्म करताना – परमेश्वरचिंतन करण्यास सुचविले आहे. तेव्हा येथे ज्ञानोत्तर कर्माचा काही संबंध नाही.

**उ–**

तस्मात्पदयुक्त श्लोकांचा पुढील गट ३·१९, ४·१५ व १६·२४ यांचा करता येईल. या श्लोकात ' कर्म कर ' असा उपदेश आलेला आहे.

यापैकी १६·२४ प्रथम विचारात घेऊ. " ' कार्याकार्यव्यवस्थिति ' या पदावरून कर्तव्यशास्त्राची म्हणजे नीतिशास्त्राची कल्पना डोळ्यापुढे ठेवून गीता उपदेशिलेली आहे, यासच कर्मयोगशास्त्र असे म्हणतात " अशी टीप लो. टिळकांनी ' रहस्यसंजीवन ' टीकेत या श्लोकावर दिलेली आहे.[4]

कार्य काय व अकार्य काय हे शास्त्राने समजणार असल्याने, त्या शास्त्राने सांगितलेले कर्म तूं कर असे गीता येथे सांगते हे स्पष्ट आहे. परंतु तसे सांगण्याची नेमकी आवश्यकता तरी काय आहे ? शास्त्रविधानोक्त कर्म, म्हणजे क्षत्रियाच्या दृष्टीने युद्ध, मोहाने टाकून अर्जुन, या युद्धाने पाप लागेल, श्रेय मिळणार नाही अशी अज्ञानजन्य समजूत करून घेऊन, स्वधर्मापासून च्युत झाला होता, म्हणून त्यास हे सांगणे आवश्यक झालेले आहे. यासाठीच तर या श्लोकापूर्वीच[5] शास्त्रोक्त विधि सोडून मनास वाटेल तसे वागणारास सिद्धी सुख किंवा श्रेष्ठ गति प्राप्त होत नसते असे जणू काही अर्जुनासच वर्ण्य ठरवून गीतेने सांगितलेले आहे.[6] तेव्हां ज्ञानमूलक कर्मयोगाचा या श्लोकाशी संबंध नाही.

४·१५ या श्लोकातही ' कुरु कर्म ' असा उपदेश आहे. येथे पूर्वीच्या मुमुक्षूंनीही कर्म केल्याचा दाखला दिलेला आहे हेही खरे. त्यामुळे मोक्षाचा व कर्माचा विरोध नाही असे अवश्य म्हणता येईल.[7] परंतु या म्हणण्यास विरोध कुणाचाही नाही.[8]

---

१. गीता– २·४७; २·४९; ५·१२; १८·६.

२. न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो
यद् वा जयेम यदि वा नो जयेयुः । गीता– २·६.
ह्या अर्जुनाला पडलेल्या प्रश्नाचेच हे उत्तर आहे असे म्हटले पाहिजे.

३. यं यं वापि स्मरन् भावं त्यजत्यन्ते कलेवरम् ।
तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः ॥ गीता ८·६.

४. गीतारहस्य– पृष्ठ ७९९, शिवाय ४७ ते ४९.

५. यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।
न स सिद्धीमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥ गीता १६·२३

६. ६·२४ वर भाष्य लिहिताना शंकराचार्यही ' इह इति कर्माधिकारभूमिप्रदर्शनार्थम् ' असे इह चे महत्त्व सांगून हेच सुचवीत आहेत. ( गीता भाष्य– पृष्ठ २४०. )

७. लो. टिळकांनी असे आपले म्हणणे नमूद केले आहे. गीतारहस्य– पृष्ठ ६४९.

८. "प्रवृत्तिलक्षणो धर्मः ... ईश्वरार्पणबुद्ध्याऽनुष्ठीयमानः ... ज्ञानोत्पत्तिहेतुत्वेन च निःश्रेयसहेतुत्वमपि प्रतिपद्यते । " शंकराचार्य – गीता–भाष्य पृष्ठ ३.



अनुक्रमणिका

ज्ञानपूर्वक कर्मयोगच या तस्मात्पदयुक्त श्लोकाने प्रतिपादिलेला आहे असे मात्र येथे खास म्हणता येणार नाही. या श्लोकातील ' ज्ञात्वा ' हे पद ' आत्मज्ञानी होऊन ' अशा अर्थाचे नसून, ' परमेश्वराला कर्म बंधनकारक का होत नाही हे जाणून ' या अर्थाचे आहे.[१]

मात्र ३·१९ हा श्लोक, ज्ञानी व्यक्तीनेही कर्म केले पाहिजे असे स्पष्टपणे सांगतो, असे लो. टिळकांचे प्रतिपादन आहे, ते विशेषत्वाने लक्षात घेतले पाहिजे.

३·१७, ३·१८, व ३·१९ अशा तीन[२] श्लोकांचे एकच वाक्य असून, जो आत्मरति इ. आहे, त्याला ' कार्य ' काही नाही, त्याने करूनही काही व्हायचे नाही व न करूनही काही व्हायचे नाही, म्हणून, न करण्यापेक्षा कर्म करणे हेच इष्ट, म्हणून तू कर्म कर, असा या तीन श्लोकांचा आशय लो. टिळक प्रतिपादितात.[३]

हे प्रतिपादन बरोबर आहे असे मानले तर ३·१९ हा तस्मात्पदयुक्त श्लोक ज्ञानमूलक कर्मयोग सांगतो असे म्हणता येईल.

परंतु तत्पूर्वी लो. टिळकांची ही रचना बरोबर आहे की काय हे पाहिले पाहिजे.

३.६ हा श्लोक[४] यज्ञचक्रप्रवर्तन कसे आवश्यक आहे ते प्रतिपादितो व नंतर ' तु ' हे विरोधदर्शक अव्यय घालून ३·१७ व ३·१८ हे श्लोक आत्मरति इ० स कार्य रहात नाही, त्याचा करणे न करणे इत्यादींशी काहीच संबंध नाही असे सांगतात, व पुढे तस्मात् पदाने गीता अर्जुनाला कर्म करण्यास सांगते अशी या श्लोकांची संगती शंकराचार्यांनी लावलेली आहे.[५]

लो. टिळक व शंकराचार्य यांच्या अर्थामध्ये एक महत्त्वाचा फरक दिसतो. तो हा —

अर्जुन हा आत्मरति, आत्मतृप्त, आत्मनि एव सन्तुष्ट असा आहे, त्यास करूनही काही उपयोग नाही व न करूनही काही उपयोग नाही, तेव्हा त्याने कर्म करावे हे बरे, असा, अर्जुनाबद्दल फार उदार दृष्टिकोन बाळगणारा अर्थ लो. टिळकांनी घेतलेला दिसतो. शंकराचार्य अर्जुनास तसे समजावयास तयार नाहीत.[६]

गीतेतील अर्जुन हा शोक करणारा, मोहग्रस्त शास्त्रविधानोक्त कर्म टाकून कामकारतः वर्तन करणारा, परधर्म स्वीकारण्यास उद्युक्त, असा[७] (त्याच्या अज्ञानित्वाची साक्ष देणारी पुष्कळच स्थाने दाखविता येतील) आहे असे स्पष्ट दिसत असता अर्जुन आत्मरति इ० आहे असे म्हणणे इष्ट होणार नाही. म्हणून ३·१९ या श्लोकाने ज्ञानोत्तर कर्म प्रतिपादिलेले आहे असे म्हणता

---

१. ' न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा ' – गीता ४·१४, येथे कर्मफलाची स्पृहा नसणे हे परमेश्वराला कर्मे बन्धक न होण्याचे कारणच स्पष्ट केले आहे.

२. नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ।
न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥ — गीता ३·१८

३·१७ हा श्लोक वर ३·१५ चे परीक्षण करताना उद्धृत केलेला आहे. ३·१९ तर तस्मात् पदयुक्त असल्याने प्रारंभी दिलेला आहेच.

३. गीतारहस्य पृष्ठ ६३१ ते ६३३.

४. हा श्लोक ३·१५ च्या परीक्षणाच्या वेळी वर उद्धृत केलेला आहे.

५. गीता– भाष्य पृष्ठ ५४.५५.

६. " न त्वमेतस्मिन् सर्वतः सम्प्लुतोदकस्थानीये सम्यग्दर्शने वर्तसे । यत एवम् ... "
गीताभाष्य पृष्ठ ५५.

७. नैवं शोचितुमर्हसि – २.२७
यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति – २.५२
यः शास्त्रविधिमुत्सृज्य ...... १६.२३.
परधर्मो भयावहः ...... ३.३५
इत्यादि वचने.

येणार नाही. आत्मरतीस 'कार्य' राहात नाही असे म्हणून नंतर अर्जुनास 'कार्य' कर्म करण्यास गीता सांगते आहे हे येथे लक्षात घेतले म्हणजे तर येथे संशयास जागाच राहाणार नाही.

ऊ–

विचारात घ्यावयाचे राहिले असे आता केवळ चार श्लोक आहेत. ( २·५०; ४·४२; ६·४६; ८·२७ ) यात सर्वत्र योगी होण्याचा उपदेश ग्रथित आहे. योगी म्हणजे कर्मयोगी असा अर्थ करण्यास हरकत नाही.[१]

२·५० मध्ये योगी का हो, याचे कारण अर्जुनास सांगितले आहे,– बुद्धियुक्त हा पापपुण्याचा येथेच निरास करतो, म्हणून तू योगी हो. ही बुद्धी म्हणजे जिच्या साह्याने कर्मबन्ध सोडता येतात ती योगे बुद्धि होय [२] हे स्पष्ट आहे. या बुद्धीने युक्त होणे, म्हणजेच समत्वबुद्धीने युक्त होणे– कर्मयोगी होणे. हे समत्व फलप्राप्तीच्या संबंधातले– सिद्धी व असिद्धी यांच्या संबंधातले आहे[३] हेही स्पष्ट आहे. मग येथे अर्जुनाने कर्मयोगी व्हावे येवढाच व कुणीही अमान्य न केलेला अर्थ आहे येवढेच म्हणता येईल, ज्ञानमूलक कर्मयोगाचा येथे संबंध नाही.

८·२७ मध्येही तू योगयुक्त का हो याचे कारण सांगताना भगवंत म्हणतात, या सृती म्हणजे शुक्लकृष्णे गती[४] जाणणारा असल्याने योगी कधी मोहग्रस्त होत नाही ! म्हणजे पर्यायाने तुझी मोहावस्था दूर होण्यासाठी तू योगी हो, असेच सुचविलेले आहे. येथेही त्यामुळे ज्ञानकर्मसमुच्चयाचा विचार उद्भवत नाही.

४·४२ मध्ये ज्ञानरूप खड्गाने स्वतःच्या संशयाचा छेद करून योगाचे आचरण कर असे सांगितले आहे. येथे आधी ज्ञान, नंतर योगाचे आचरण असा क्रम दिसतो आहे.

येथे 'संशयात्मा विनश्यति'[५] असे पूर्वी सांगून मनातील संशय काढून टाक असे म्हटलेले असल्यामुळे त्या संशयनिवृत्तीसाठी आवश्यक ते ज्ञान खड्गस्वरूप म्हणून मानले पाहिजे. अन्यथा ब्रह्मज्ञान अथवा आत्मज्ञान असा अर्थ घेतल्यास, व त्या ज्ञानाच्या प्राप्तीनंतर योग आचर असे समजल्यास, याच अध्यायातील ज्ञानविषयक विवेचनास बाध येणार आहे. कारण गीता असे म्हणते की ज्ञानासारखे या विश्वात पवित्र काही नाही, ते ज्ञान योगाने संसिद्ध झालेला कालांतराने स्वतःच्या ठिकाणी प्राप्त करून घेत असतो.[६] येथे योगस्वीकार– तदनंतर योगसंसिद्धि व नंतर कालांतराने ज्ञानाची प्राप्ति असा क्रम स्पष्ट आहे. शिवाय गीता अन्यत्रही योगी हे आसक्ति सोडून आत्मशुद्धीसाठी कर्म करतात असे म्हणते आहे[७] हेही लक्षात घेतले पाहिजे. म्हणून ४·४२ ह्या श्लोकांत ज्ञानोत्तर कर्मयोग प्रतिपादल्याचे मानता येणार नाही.

शेवटचा राहिलेला श्लोक ६·४६. येथे ज्ञानमूलक कर्मयोग सांगितलेला नाही हे अर्थावरूनच स्पष्ट होईल. परंतु येथे योगी होण्याचे कारण सांगत असता तपस्वींपेक्षा, ज्ञानींपेक्षाही आणि कर्मांपेक्षा योगी अधिक (श्रेष्ठ) असल्याने तूं योगी हो असे म्हटलेले आहे. ज्ञानींपेक्षाही (कर्म) योगी श्रेष्ठ हे वचन येथे विचारार्ह आहे.

---

१. असा अर्थ लो. टिळक सर्वत्र करतात. गीतारहस्य पृष्ठ ६१२, ६६२, ६९०, ७१६.

२. एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु ।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबन्धं प्रहास्यसि ॥
गीता २.३९.

३. सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ।
– गीता २.४८.

४. शुक्लकृष्णे गती ह्येते ...... गीता ८.२६.

५. गीता ४.४०.

६. न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ॥ गीता ४·३८

७. योगिनः कर्म कुर्वन्ति सङ्गं त्यक्त्वाऽऽत्मशुद्धये । – गीता – ५·११

एक तर ज्या क्रमाने ही श्रेष्ठता वर्णिली आहे त्या क्रमाचा विचार करता, तपस्व्यांपेक्षा ज्ञानी व ज्ञानींपेक्षा कर्मी श्रेष्ठ होत, असाही अर्थ सूचित होण्याची शक्यता आहे. कर्मयोगाच्या पुरस्कर्त्यांनाही हा अर्थ इष्ट वाटणार नाही. म्हणून, शङ्कराचार्यांनी या श्लोकांत ज्ञान हा शब्द शास्त्रपाण्डित्य या अर्थाने आला आहे[१] असे म्हटलेले आहे, ते योग्य दिसते. तसा अर्थ घेतल्यास हा अनिष्ट अर्थ अनिष्ट राहात नाही.

शिवाय विचारात असलेल्या ६.४६ या श्लोका-पूर्वीच ६.४५ मध्ये गीता म्हणते आहे, योगी, प्रयत्नपूर्वक उद्योग करीत असता, पापमुक्त होऊन, अनेक जन्मांच्या नंतर संसिद्धी प्राप्त झालेला असा, त्यानंतर श्रेष्ठ गति प्राप्त करून घेत असतो.[२] या उलट आत्मज्ञान्याबद्दल तर गीता म्हणते की ते या जन्मातच मुक्त झालेले असतात. ब्रह्मनिर्वाण हे त्यांच्या भोंवतीच असते.[३]

ज्ञानी व्यक्तीस मुक्त ठरविणारी आणि योगी व्यक्तीस अनेक जन्मानंतर परा गति सांगणारी गीता ‘ ज्ञानीं’पेक्षा योगी श्रेष्ठ असे सांगू शकणार नाही. म्हणून, प्रस्तुत श्लोकात ज्ञान म्हणजे शास्त्रपांडित्य असाच अर्थ करणे युक्त आहे.

एवंच, हाही श्लोक, ज्ञानोत्तर कर्म तर सांगत नाहीच, योग हा ज्ञानमार्गापेक्षा श्रेष्ठ असेही सांगत नाहीं.

‘ तस्मात् हे अनुमानदर्शक महत्त्वाचे पद घालून ’ गीता ज्या सिद्धान्ताचा अभ्यास करते असे लो. टिळकांचे मत आहे, तो ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोगाचा सिद्धान्त तस्मात्पदयुक्त श्लोकांनी मुळीच मांडलेला नाही हे येथवर स्पष्ट झाले आहे. तात्पर्यनिर्णयासाठी जे सात निकष मीमांसकांनी सांगितले आहेत, त्यापैकी ‘अभ्यास’ या निकषाबद्दल लो. टिळकांचे प्रतिपादन येथवर तपासून पाहिले गेले आहे. याचा अर्थ मीमांसकांचे निकष गीतेला लावता येणार नाहीत असा मात्र नाही. गीतेत नेमका ‘ अभ्यास ’ कशाचा आहे यासंबंधीचे लो. टिळकांचे प्रतिपादन बरोबर दिसत नाही इतकेच येथे स्पष्ट होईल. (या पद्धतीने त्यांनी इतर निकषांचे केलेले विवेचनही तपासून पाहता येईल. )

तस्मात् पदयुक्त श्लोकांनी गीता ज्ञानपूर्वक कर्मयोग सांगत नसली, तरी, या श्लोकांतून काही सुसंगत विचार प्रकट होत आहेत काय हे पाहिले पाहिजे. या दृष्टीने, परीक्षणासाठी श्लोकांचे जे सहा गट केलेले आहेत ते क्रमाने पाहावे.

पहिला गट कर्माचा दूरान्वयानेच संबंध असलेल्या श्लोकांचा आहे, दुसऱ्यात, तू शोक करू नकोस, हा शोक अज्ञानजन्य आहे, असे अर्जुनास सांगितले आहे. तिसऱ्यात, इंद्रियनिग्रह करण्याची व कामक्रोध लोभ यांचा त्याग करण्याची आवश्यकता प्रतिपादिलेली आहे. चवथ्यात युद्ध कर असे सांगून त्याचा लाभही लक्षात आणून दिलेला आहे. पाचव्या गटात, शास्त्रोक्त कर्म करण्यास सांगितलेले असून, सहाव्यात, हेच कर्म योग-युक्त होऊन, म्हणजे सिद्धी–असिद्धीबद्दल समत्वबुद्धी धारण करून आचरण्यास सांगितलेले आहे.

म्हणजे, हे तस्मात्पदयुक्त श्लोक अर्जुनास–म्हणजेच कोणत्याही मोहग्रस्त व स्वधर्मच्युत व्यक्तीस–इंद्रियनिग्रह, कामाचा त्याग, स्वधर्माचे आचरण व तेही सिद्धी–असिद्धीबद्दल समत्वबुद्धी बाळगून, करण्यास सांगत आहेत.

ज्ञाननिष्ठा ही यानंतर प्राप्त होणारी असून तस्मात् पदयुक्त श्लोकात तिचा विचार दिसत नाही.

---

१. “ ज्ञानमत्र शास्त्रपाण्डित्यं, तद्वद्भयोऽपि ...... ” गीता-भाष्य पृष्ठ ११६.

२. प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥ – गीता ६.४५.

३. अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् । – गीता. ५.२६.

प्रा. म. दा. साठे

# ‘ कालिदासाचे स्त्रीमनाचे मानसशास्त्र ’

कालिदासाच्या वाङ्मयकृतीवर मराठीत त्या-प्रमाणे इंग्रजीत व अन्य भाषांतही विपुल साहित्य आहे. ते सर्वांनीच वाचले असेल असे नाही. त्या वाङ्मयकृतीतून अनेक विषयांविषयी उदाहरणार्थ, तत्कालीन सामाजिक परिस्थिती, धर्म व तत्त्वज्ञान, स्थापत्य व कला, युद्ध व त्यांत वापरण्यात येणारी शस्त्रे, वनस्पतिसृष्टी व जीवसृष्टी, पौराणिक कथा, ज्योतिष, अंधश्रद्धा व लोकभ्रम, क्रीडा व विनोद, आदर्श राजा व त्याची कर्तव्ये-- इत्यादी अनेक विषयांची माहिती उद्धृत केली गेली आहे. संशोधनाचा तो एक विषयच असतो व तो कधीही संपणारा नसतो.

प्रस्तुत विषय हाही एक त्यांपैकीच आहे. स्त्री-मनाचे मानसशास्त्र हे– स्त्रीजात ही सर्वत्र सारखीच असल्यामुळे– एकच असणार. मग कालिदासाने शोधून काढलेले तद्विषयक सिद्धान्त हे भिन्न कोठून असणार ? होय हे खरे आहे. पण मानसशास्त्राच्या सिद्धान्तांत निरनिराळे व संपूर्णपणे भिन्न सिद्धान्त पुढे त्या त्या संशोधकांकडून मांडले जातात हे आपण आजही पाहतो. पूर्वीच्या शास्त्रज्ञांनी मांडलेले सिद्धान्त पुढे खंडित होतात. रागद्वेषादी मनोविकारांनी होणारे शरीरावरचे बदल हे त्या विकारांचा प्रत्यक्ष आविष्कार (प्रादुर्भाव) मनात झाल्याशिवाय घडणे शक्य नाही हे जेम्सचे मत बालगंधर्व, गणपतराव जोशी किंवा गॅरिक या श्रेष्ठ नटांनी आपल्या अभिनयाने खोडून काढले आहे. गॅरिकची गोष्ट अशी सांगतात की अथेल्लोचा अभिनय करीत असता– डेस्डिमोनाचा गळा दाबून खून करीत असता– तो इतका परिणामकारक होत असे की श्रोतृवृंदातील एक श्रोता पिस्तुलाने त्यावर गोळी झाडण्यास प्रवृत्त झाला ! पण प्रत्यक्ष गळा दाबण्याचा अभिनय करीत असता त्याने डेस्डिमोनाला हळूच विचारले की ‘ आजची कॉफी तुला आवडली का ? ’ तात्पर्य, कोणतेही सिद्धान्त अगदी अबाधित असतातच असे नाही.

प्रस्तुत लेखात स्त्रीमनाच्या मानसशास्त्राची चर्चा करीत असता स्त्रीमनाच्या सर्व व्यापारांचे मानस-शास्त्र न देता एका विवक्षित व्यापाराचेच द्यावयाचे आहे. सर्व व्यवहारांत स्त्रीमनाची घडण व प्रक्रिया कशी होते हे कालिदासाने दाखविले नाही. तर तरुणीच्या मनाची स्थिति विवाहापूर्वी प्रियकराच्या प्रथमदर्शनी किंवा नवोढा तरुणीची मनःस्थिति प्रथम संगमाच्या वेळी कशी होते हे कालिदासाने आपल्या वेगवेगळ्या कृतीतून फार उत्कृष्ट प्रकारे दाखविले आहे. शृंगार हा जसा रसांचा राजा आहे तसा तो खुलवून दाखविणारा कालिदास हा कविराज आहे. शृंगाराचे स्वरूपही अनेक प्रकारचे आहे. मुग्ध व सात्त्विक शृंगाराचे स्वरूप आपल्याला शाकुंतल नाटकात पहावयास मिळते. विप्रलंभ ( वियोग ) शृंगार मेघदूत काव्यात सापडतो तर संभोगशृंगाराचे हिणकस स्वरूप कुमारसंभवाच्या आठव्या सर्गात व विशेषतः रघुवंशाच्या एकोणिसाव्या सर्गात दृग्गोचर होते. हे संभोग-शृंगारवर्णनाचे सर्ग कालिदासाचे नाहीतच असे टीकाकार म्हणतात. शाकुंतलातील या विषयीचा कालिदासाने दाखविलेला संयम वरील सर्गात फार वितळून गेला आहे !

या प्रत्येक प्रसंगी स्त्रीमनाची घडण दाखविताना पाश्चात्त्य व भारतीय तरुणीच्या मनाचा आविष्कार भिन्न असतो. भारतीय तरुणीची अशा प्रसंगी वागण्याची पद्धत फार श्रेष्ठ असून त्यात उच्च संस्कृतीचे प्रतिबिंब उमटलेले दिसते व त्यामुळे तिचे सौंदर्य अधिक खुलते ! भारतीय तरुणी संगमोत्सुक असूनही मर्यादा सोडीत नाहीत. कित्येक वेळी अशा प्रसंगी स्त्रियांची दिसण्यात तरी विपरीत मनाची घडण ( an apparent perverse psychology)

दिसून येते! मालविकाग्निमित्र नाटकात याविषयी कालिदासाचा श्लोक आहे तो येणेप्रमाणे –

'हस्तं कम्पयते रुणद्धि रशनाव्यापारलोलाङ्गुलिः ।
स्वौ हस्तौ नयति स्तनावरणता–
मालिङ्ग्यमाना बलात् ॥
पातुं पक्ष्मलनेत्रमुन्नमयतः साचीकरोत्याननम् ।
व्याजेनाप्यभिलाषपूरणसुखं
निर्वर्तयत्येव मे ॥' (मा. ४-१५)

किंवा

'प्रणयविशदां दृष्टिं वक्त्रे ददाति न शङ्किता ।
घटयति घनं काण्ठाश्लेषे रसान्न पयोधरौ ॥
वदति बहुशो गच्छामीति प्रयत्न धृताप्यहो ।
रमयतितरां संकेतस्या तथापि हि कामिनी ' ॥
( रत्नावली ३-९ )

प्रथमदर्शनी प्रियकराला पाहण्याची इच्छा असूनही ती त्याकडे न पाहता दुसरेच काही तरी करील! शाकुंतल नाटकाच्या पहिल्या अंकात दुष्यंताची व शकुंतलेची प्रथम भेट कण्व ऋषीच्या आश्रमात होते तेव्हा दुष्यंत तिला सहज विचारतो 'अपि तपो वर्धते ?' 'काय तपश्चर्या निर्विघ्नपणे चालू आहे ना ?' त्यावर ती काहीही उत्तर न देता खाली मान घालून उभी राहते ! त्यावेळी तिच्या मनात लज्जा व थोडी कातरता उत्पन्न झालेली असते ! कवीने मेघदूत काव्यात याविषयी म्हटले आहे 'स्त्रीणामाद्यं प्रणयवचनं विभ्रमोहि प्रियेषु'। ( मेघदूत १-२८ ). अशा वेळी पाश्चात्त्य तरुणीने त्याच्याकडे पाहून स्मित केले असते. भारतीय तरुणीच्या मनाची घडणच तशी आहे. पाश्चात्त्य रीतिरिवाजामुळे त्यात बदल होत असून ती अलीकडे पाश्चात्त्य वळणावर जात आहे ! यामुळे नाटकात स्त्रियांची कामे स्त्रिया करीत असताही बालगंधर्वाच्या स्त्रीच्या अभिनयाप्रमाणे त्यांना स्त्रीसुलभ लज्जा, विनय, लाजणे, मुरकणे इत्यादी प्रक्रियांचा आविष्कार करता येत नाही. साध्वस किंवा सात्विक शृंगाराचा लोप होत चालला असून त्या ठिकाणी पुरुषी धिटाई येत चालली आहे असे काही आधुनिक टीकाकारांचे मत आहे. कुमारसंभवात पार्वतीला जेव्हा शंकराचे बटूच्या वेषात ( सर्ग ५-८५ ) दर्शन होते तेव्हा तिच्या अवस्थेचे कवीने फार सुंदर वर्णन केले आहे ( 'शैलाधिराजतनया न ययौ न तस्थौ'।) शाकुंतल नाटकात पहिल्या अंकात दुष्यन्ताने शकुंतला आपल्याविषयी उत्सुक झाली आहे हे तेव्हाच ताडले ! तो म्हणतो –

'वाचं न मिश्रयति यद्यपि मद्वचोभिः ।
कर्णं ददात्यभिमुखं मयि भाषमाणे ॥
कामं न तिष्ठति मदाननसंमुखीना ।
भूयिष्ठमन्यविषया न तु दृष्टिरस्याः ॥
( शाकुं. १-२७ )

शकुंतला दुष्यंत नसताना त्याला पाहण्याचा धीर करते पण प्रत्यक्ष पाहिल्यावर तिचा बेत जागच्या जागीच राहतो. दुष्यन्त म्हणतो –

'अभिमुखे मयि संहृतमीक्षणं हसितमन्यनिमित्तकृतोदयम् । विनयवारितवृत्तिरतस्तया न विवृतो मदनो न च संवृतः ॥' (शाकुं. २-१४) एका ग्रंथकाराने म्हटले आहे : 'The innermost upsurging joy at the birth of a new love finds an outlet in involuntary smiles and simpers for which she is hard put to it to invent ever fresh pretexts'. दुष्यन्ताला पाहण्यासाठी पायात काटा टोचल्याचे किंवा पदर वृक्षवेलीत अडकल्याचे मिष करून शकुंतला त्याच्याकडे तिरप्या नजरेने पाहते असे कालिदासाने वर्णन केले आहे. पहा –

'दर्भाङ्कुरेण चरणः क्षत इत्यकाण्डे ।
तन्वी स्थिता कतिचिदेव पदानि गत्वा ॥
आसीद्विवृत्तवदना च विमोचयन्ती ।
शाखासु वल्कलमसक्तमपि द्रुमाणाम् ॥
( शाकुं. २-१२ )

कालिदासाच्या इतर नाटकातूनही असे अनेक प्रसंग आहेत. जगन्नाथ पंडिताने 'भामिनीविलास' काव्यात नवतरुणीचे असेच वर्णन केले आहे. विस्तारभयास्तव ही स्थले व प्रसंग येथे देता येत नाहीत.

पाश्चात्त्य देशात दिसून येणारे चुंबनाचे व आलिंगनाचे उघड उघड प्रकार भारतात दिसून येणार नाहीत. भारतीय तरुणींचा हा विशेष आहे.

सिनेमातून व नाटकातूनही भारतात चुंबनप्रकार निषिद्ध मानला जातो व तसा तो कोठे आढळल्यास सेन्सार कात्री लावतात. विवाहपूर्व तर असले प्रकार कधीही नव्हते व आजही मान्य नाहीत. इतकेच काय पण विवाहानंतरही नवोढा स्त्री अशा प्रकाराला आपसुखात उघड उघड मान्यता देत नाही हे मागे सांगितलेच आहे. उपवर तरुण स्त्री विवाहाच्या गोष्टीतही उघडपणे लक्ष देण्याचे टाळते तसे सोंग करते. शंकरासाठी पार्वतीला मागणी आली तेव्हा तिने ते न ऐकल्याचेच सोंग केले व ती कमलाची पानेच मोजीत राहिली !

‘ एवं वाहिनि देवर्षौ पार्श्वे पितुरधोमुखी ।
लीलाकमलपत्राणि गणयामास पार्वती ’ ॥
( कुमारसंभव ६-८४ )

— विवाहानंतर प्रथम भेटीच्या वेळी तरुणीची मनःस्थिति कशी होते हे कुमारसंभवाच्या आठव्या सर्गांत शंकर-पार्वतीच्या प्रथम मीलनाचे वर्णन करताना कालिदासाने दिले आहे पण ते अभिरुचीला सोडून असल्याने येथे देता येत नाही.* प्रोषितभर्तृकेच्या मनःस्थितीचे वर्णन मेघदूत काव्यांत विस्ताराने आढळते. काय असेल ते असो. विवाहानंतर विवाहित जोडप्याच्या वरातीची मिरवणूक निघते तेव्हा स्त्रिया घरातील सर्व कामे टाकून घराबाहेर ती पाहण्यासाठी जमतात ! कालिदासानेही अज – इंदुमती किंवा शंकर-पार्वती यांचा सोहोळा पाहण्यासाठी स्त्रियांनी अशीच सोत्सुक गर्दी केली असे वर्णन केले आहे. आज हजारो वर्षे झाली तरी स्त्री-मन तेच म्हणजे ‘ Eternal feminine ’ आहे !

तात्पर्य, मागे म्हटल्याप्रमाणे स्त्रीजात व तिचे मन सर्वकाली सर्व देशांत जरी सारखे असले असे गृहीत धरले तरी संस्कृतीच्या दृष्टीने त्याचा आविष्कार भिन्न प्रकारे होतो हे आपण वर पाहिलेच आहे. ‘ O Darling, I love you ’, असे भारतीय स्त्री कदापि म्हणणार नाही ! स्वयंवर असो किंवा गांधर्वविधि असो ती आपली नैसर्गिक मर्यादा सोडणार नाही. मग अलीकडे बोलपटातून व नाटकातून त्याचा आविष्कार कसाही रेखाटला जावो !

---

श्री. एस्. ए. सबनीस यांच्या ‘ Kalidas – his style and Time's ’च्या आधारे

* ‘ व्याहृता प्रतिवचो न संदधे गन्तुमैच्छदवलंबितांशुका ।
सेवते स्म शयनं पराङ्मुखी सा तथापि रतये पिनाकिनः ’ ॥ — कुमार. ८-२
‘ नाभिदेशनिहितः सकम्पया शंकरस्य रुरुधे तया करः ।
तद्दुकूलमथ चाभवत्स्वयं दूरमुच्छ्वसितनीविबन्धनम् ॥ ’ — कुमार. ८-४
‘ चुम्बनेष्वधरदानवर्जितं सन्नहस्तमदयोपगूहने ।
क्लिष्टमन्मथमपि प्रियं प्रभोर्दुर्लभप्रतिकृतं वधूरतम् ’ ॥ — कुमार. ८-८
‘ यन्मुखग्रहणमक्षताधरं दत्तमव्रणपदं नखस्य यत् ।
यद्रतं च सदयं प्रियस्य तत्पार्वती विषहते स्म नेतरत् ’ ॥ — कुमार. ८-९

वरील वर्णन उत्तान शृंगाराचे असल्याने त्याचा अनुवाद केला नाही. दिसण्यात विपरीत वागणूक वास्तवाचे दर्शन घडविते असे टीकाकार म्हणतात. संभोग शृंगारचे उत्तान वर्णन करणारे अलीकडील प्रसिद्ध कादंबरीकार यापेक्षा वेगळे तरी काय लिहिणार !

प्रा. श. श्री. पुराणिक

# " महा -- भारत "

' महाभारत ' या महाग्रंथावर चार शब्द लिहिण्याचा प्रसंग येणे ही भाग्याची गोष्ट आहे पण त्याही पेक्षा ' महाभारता 'वर लिहिण्याचा अधिकार असणे ही अधिक भाग्याची गोष्ट आहे. हे भाग्य ' आगळे ' आहे. ते प्रत्येकाला लाभत नाही. आजही हिंदुस्थानात ' महाभारत ' ज्यांनी वाचले आहे आणि पचविले आहे असे अधिकारी विद्वान् हाताच्या बोटावर मोजण्या इतकेच सापडतील. ' महाभारताचा उपसंहार ' लिहिणारे चिंतामणराव वैद्य, की ज्यांना ' भारताचार्य ' ही पदवी लाभली हे गेल्या पिढीतील असे उदाहरण आहे. टिळकांचा 'महाभारता'चा व्यासंग दांडगा होता आणि सबंध ' भारत ' त्यांनी मोठ्या शोधक बुद्धीने कमीत कमी तीन वेळा तरी वाचले असावे असे चिंतामणराव वैद्यांनीच म्हटले आहे. ' गीता-रहस्या ' चा एक लक्षात भरण्यासारखा विशेष म्हणजे पानोपानी दिसून येत असलेला टिळकांचा ' महाभारता ' शी दाट परिचय होय. ' धर्मशास्त्राचा इतिहास ' लिहिणाऱ्या डॉ. पां. वा. काण्यांनी ' महाभारत ' आजपर्यंत तीन वेळा वाचले आणि विद्यार्थ्याप्रमाणे त्याची टिपणे काढली त्या वह्या अद्यापही जपून ठेवल्या आहेत. पुण्याचे डॉ. बेलवलकर, डॉ. सुखटणकर, डॉ. पी. एल्. वैद्य, डॉ. दांडेकर, हे आणखी काही ह्या भाग्यवंतांच्या पंक्तीतील विरल मानकरी. पण अशी काही थोडी नावे सोडली तर ' महाभारता ' वर अधिकारवाणीने बोलता येईल अशी व्यक्ती मिळणे जवळ जवळ अशक्य आहे. कारण, एक तर ' महाभारत ' समुद्राप्रमाणे अगाध आणि विस्तीर्ण आहे. भारतातच त्याचे वर्णन ' शतसाहस्री संहिता ' असे केले आहे व ज्ञानेश्वरांनीही त्याला ' सवालक्ष भारत ' असे संबोधिलेले आहे. आणि दुसरे असे की ' भारत ' हे मनोरंजन करणारे असले तरी मनोरंजन हा काही त्याचा उद्देश नाही. ती हिंदु संस्कृतीची विजयगाथा आहे... ' जयो नामेतिहासोऽयं श्रोतव्यो विजिगीषुणा ! ' ... ते महाप्राज्ञ व्यासाचे गंभीर व सखोल जीवनभाष्य आहे. ' Some books are be tasted, some are to be swallowed, some are to be chewed and digested ' – या बेकनच्या प्रसिद्ध उक्तीतील तिसऱ्या प्रकारचा हा ग्रंथ आहे. त्याचे चर्वण आणि पचन करणे हे कालावधीचे व बौद्धिक जीवनशक्तीचे काम आहे. ते जोपर्यंत होत नाही तोपर्यंत महाभारतावर बोलणे व लिहिणे ते सिद्धभावाने नसून साधक भावानेच बोलले पाहिजे. पण हेही काही वाईट नाही. कारण मुक्त होण्यापेक्षा भक्त होण्याचाच आनंद अधिक आहे व मुक्कामावर पोचण्यापेक्षा चालत राहण्याचेच सौंदर्य विशेष आहे. असे ग्रंथ हे मित्र होत व त्यांचा अभ्यास संपला की एक प्रकारचे विषण्ण आणि उदास गांभीर्य मनावर पसरते — जसे एखाद्या मित्राच्या चिरवियोगाने पसरावे. आपल्या जगप्रसिद्ध ग्रंथाचा निरोप घेताना संयमी गिबनला म्हणावे लागले की " I have taken an everlasting leave of an old and agreeable friend. " तेव्हा ह्याही दृष्टीने विचार करिता ग्रंथाभ्यासाच्या समाप्तीच्या सोहळ्यापेक्षा अभ्यास-साधनेचा आनंद अधिक श्रेयस्कर होय. तात्पर्य, ह्या बाबतीत भूमिका असली पाहिजे विनम्र व प्रांजल अभ्यासकाची; पूर्णत्वास पोचलेल्या अधिकारी पुरुषाची नव्हे.

**महाभारत : एक महाकाव्य**

कोहिनूर रत्नाला जसे अनेक पैलू असतात त्याप्रमाणे 'महाभारता'ला अनेक पैलू आहेत. येथे काय नाही ? येथे निसर्गवर्णने आहेत, व्यक्तिरेखा आहेत, युद्ध-वर्णने आहेत, तत्त्वज्ञान आहे, धर्म आहे, नीति आहे, सुख-दुःख, हास्य-अश्रु, जय-पराजय, वादळ आणि चांदणे यांचा महाभारतात नुसता कल्लोळ उसळलेला आहे. ' यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ! ' म्हणून महाभारताचा विचार निरनिराळ्या



अनुक्रमणिका

दृष्टींनी करणे योग्य आहे. त्यापैकी महाकाव्य या दृष्टीने त्याच्याकडे पाहणे बोधप्रद ठरेल. महाकाव्याची जी तांत्रिक लक्षणे आहेत ती महाभारताला लागू पडतातच. विस्तार, निसर्गवर्णने, युद्धवर्णने, शृंगार-वीर-करुण इत्यादी नवरसांचा आविष्कार, धीर व गंभीर नायक हे सर्व महाभारतात आहे. किंबहुना महाभारत हे पुढील महाभाष्याचे आदर्शभूत काव्य आहे. पण केवळ महाकाव्यांची तांत्रिक, वाङ्मयीन किंवा बाह्य शारीरलक्षणे आहेत म्हणूनच महाभारत हे महाकाव्य झाले आहे काय, असा प्रश्न विचारला म्हणजे त्याचे उत्तर देणे सोपे नाही हे लक्ष्यात येते. कारण, संस्कृतात महाकाव्ये अनेक आहेत. महाभारत हे ऋषींनी लिहिलेले 'आर्ष' महाकाव्य आहे, व बाकीची कवींनी लिहिलेली वाङ्मयीन काव्ये आहेत. महाभारतात कलेचे निर्व्याज व विशुद्ध स्वरूप दृष्टीस पडते. पुढील महाकाव्यात कला ही अधिक जाणीवयुक्त, Conscious किंवा deliberate झालेली आहे, ती पुढे अधिक कृत्रिम होत गेली, व अखेर तर 'न' किंवा 'म' असे एकाक्षरी श्लोक लिहिण्यात कलेचा कारागिरीत अधःपात झाला. ही सर्व महाकाव्ये आपापल्या परीने श्रेष्ठ आहेतच. पण त्यापैकी कोणालाही महाभारताने निस्तुल वैभव व उंच पदवी लाभलेली नाही. महाभारत हा आबालवृद्धांचा ग्रंथ आहे, त्याचे स्थान ग्रंथालयात नाही, जनतेच्या हृदयमंदिरात आहे– जसे 'ज्ञानेश्वरी'चे आहे, जसे 'दासबोधा'चे आहे. असे इतर महाकाव्याबद्दल आपणास म्हणता येईल असे वाटत नाही. कालिदास हा महाकवी आहे पण व्यासाप्रमाणे तो 'सर्व जनीन' आहे काय ? **भारवेरर्थगौरवम्** हे मान्य आहे, तरीही भारवी व माघ हे विद्वानांचे कवी आहेत, 'तावद्भा भारवेर्भाति यावन्माघस्य नोदयः । उदिते तु पुनर्माघे भारवेर्भा रवेरिव ॥' ही माघ व भारवी यांची पदवी ठरविण्याची झटापट पंडितांची आहे, सामान्यांची नव्हे. आणि 'नैषधं विद्वदौषधम्' असे ज्याच्याबद्दल म्हटले आहे, त्या नैषधाबद्दल प्रश्नच नाही. मुद्दा असा आहे की, महाभारताप्रमाणे हीही महाकाव्ये असूनही त्यांना महाभारताची अपरंपार लोकप्रियता, सामान्यांचे असामान्य प्रेम लाभले नाही. तेव्हा या सर्व महाकाव्यात जे नाही, असे काहीतरी विशेष महाभारतात असले पाहिजे हे उघड आहे. हा विशेष शोधल्याशिवाय या कोडयाची उपपत्ती लागत नाही.

पण हा विशिष्टपणा शोधण्यापूर्वी महाकाव्य या शब्दाची थोडी औपपत्तिक चिकित्सा करणे आवश्यक आहे. छंदोबद्ध रचनेला काव्य म्हणतात; पण छंद म्हणजेच काव्य काय ? अनेक वेळा पद्य असे असते की त्याला गद्य म्हणता येत नाही म्हणूनच पद्य म्हणणे भाग पडते, व कित्येकदा गद्य असे काव्यमय असते की त्याला गद्य म्हणणे जिवावर येते– त्याला 'गद्य काव्य म्हटले जाते.' शिवरामपंत परांजपे यांची 'कालाची विशालता,' 'शिवाजीची एक रात्र' माझ्या पर्वता,' 'उच्च पर्वताच्या उच्च शिखरावर,' 'सांपडलेले संपुष्ट' ही अप्रतिम गद्यकाव्ये ज्याने एकदा वाचली आहेत तो ती कधीच विसरणार नाही. तेव्हा कल्पनेची भरारी, भावनांची उत्कटता, शब्दशक्तीचा विलास, दिव्यता आणि उदात्तता यांनी काव्य होते– नव्हे सौंदर्याविष्कार हे काव्याचे सार-सर्वस्व आहे, काव्य हे मूर्तिमंत सौंदर्य, निराकार सौंदर्याचे साकार, सशब्द, सगंध, सरस स्वरूप ही खरी काव्याची व्याख्या करावी लागते. 'वाक्यं रसात्मकं काव्यम्', 'रमणीयं शब्दार्थं काव्यम्' या संस्कृत काव्यकोविदांच्या व्याख्या किंवा 'Poetry is emotion and 'imagination,'' 'Poetry is musical thought,' Poetry is indeed something divine, it is at once the centre and circumference of life' ह्या पाश्चात्य काव्यशास्त्रज्ञांच्या व्याख्या हेच दर्शवितात. 'Poetry is criticism of life' ही मॅथ्यू आर्नोल्डची व्याख्या तर महाभारताला अनेक अर्थांनी लागू पडते. त्याचा विचार नंतर करू. सध्या इतकेच स्पष्ट आहे की सौंदर्याविष्कार व जीवनभाष्य ही काव्याची व्यवच्छेदक लक्षणे आहेत, केवळ गेयता किंवा छंदोबद्धता नव्हे. जाता जाता हेही लक्षात असावे की कवी या शब्दाचा अर्थ 'कविः क्रान्तदर्शी" असा शंकराचार्यांनी दिलेला आहे. या अर्थाने कवी हा केवळ स्रष्टा नव्हे, तर द्रष्टाही असतो. महाकर्ता तर असतोच असतो. क्रान्तदर्शी कवीचे हे वर्णन शेलेच्या 'Poets are the unacknowledged legislators of the world,

they are the mirrors in which futurity casts its gigantic shadows ' या कवित्वनाशी खूपच मिळते जुळते आहे, हे सांगणे नकोच. समर्थांनीही कवींना ' शब्द-सृष्टीचे ईश्वर ' म्हटले आहे व शारदेला ' महापुरुषाची भार्या ' म्हणून संबोधिले आहे.

आता ' महाकाव्य ' या शब्दातील महा, महान्, महत् या शब्दाचा अर्थ पाहू. महान् म्हणजे मोठा हे तर शाळेतले पोर सुद्धा सांगू शकेल. पण मोठा कशाला म्हणावे ? मोठा कोण ? व्यवहारातही मोठा या शब्दाने शारीर लक्षणांपेक्षा आत्मिक किंवा आन्तर लक्षणेच अधिक अभिप्रेत असतात असे म्हणावेसे वाटते. शरीराने, वैभवाने, कीर्तीने, बुद्धीने मोठा त्यापेक्षाही मनाने आत्म्याने अन्तःकरणाने मोठा तो खरा मोठा हाच अर्थ आपण व्यक्त करीत असतो. कारण आत्म्याचा अंतरंगाचा व्यक्तिमत्त्वाचा मोठेपणा हा चिरंतन, निष्कलंक व अबाधित असतो व तोच सर्व खऱ्या मोठेपणास बीजभूत झालेला असतो. म्हणूनच लक्षाधीशापेक्षा किंवा महापंडितापेक्षा संताला, तत्त्ववेत्त्याला आपण अधिक मान देतो. बुद्ध ख्रिस्त सॉक्रेटीस यांची वंदनीयता त्यांच्या पांडित्यात नव्हे तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या महनीयतेत आहे व याच अर्थाने कुंतीनेही धर्मास ' मनस्ते महदस्तु च । ' असा उपदेश केलेला आहे. प्रा. हिरेन् मुखर्जींनी " But among all leaders this little figure proved tallest. " असे गांधींबद्दल उद्गार काढले आहेत ते याच अभिप्रायाने. जीवनाचा हा नियम वाङ्मयासही लागू आहे. मानवी जीवनाची विराटता, सखोलता, उत्तुंगता यांचे भेदक दर्शन घेण्याची व चित्रण करण्याची ज्यांची बौद्धिक ऐपत असेल, आणि या चित्रणावर सौंदर्य आणि दिव्यत्व यांची झळाळी ज्याच्या प्रतिभेने व प्रज्ञेने विलसते तो महाकवि व त्याचे काव्य ते महाकाव्य होय. भाग्य हे जीवनाचे प्रतिबिंब आहे व या अथांग अपार विविध मानवतेचा व मानवी मनाचा यथातथ्य आलेख रेखाटणे हे महाकाव्याचे कार्य होय. हा महाकाव्याचा आत्मा आहे व तो जेथे असेल तेथे महाकवीची पाउले उमटली असे निःशंक समजावे. केवळ तटस्थ जीवन-दर्शन नव्हे तर सखोल जीवन-भाष्य हे वैभव केवळ महाकाव्याचेच. अंधारलेल्या मानवी अंतरंगावर प्रकाशाची बरसात करणे व करुणा चारित्र्य धर्म भावना यांनी ते उजळणे, जीवनाच्या करुण व गंभीर समस्येचा अन्वयार्थ लावणे, ही जीवन-भाष्याची किमया महाकवीची होय. हे नसेल तर पुष्कळ पाने लिहून किंवा श्लोकसंख्येची रास रचून महाकाव्य होणे नाही. शिरस्त्राण व वाघनखे चढवून शिवाजी होता येत नाही किंवा सुपारी खाऊन टिळक होता येत नाही. तेथे टिळकांच्या कित्त्यापेक्षा अडकित्त्याचीच महती मानलेली आहे. याच न्यायाने कोश पाठ करून व श्लोकांच्या उतरंडी रचून महाकवि होता येत नाही. तेथे ' शोकः श्लोकत्वमागतः ' अशा विशाल सहानुभूतीची व समर्थ प्रतिभेची जरूर आहे. त्याशिवाय महाभारत व रामायण, पॅरेडाइज लॉस्ट व डिव्हाइन कॉमेडी, लॅ मिझरेबल व वॉर अँड पीस अशा थोर सारस्वताचा संभव होणार नाही. ही सर्व महाकाव्येच आहेत. फक्त यांतील काही गद्यात आहेत एवढाच फरक.

## स्वभावचित्रें हें वैभव :

### भीष्म : तत्त्ववेत्ता व मुत्सद्दी.

या दृष्टीने पाहिले म्हणजे महाभारताचे वैभव समजावून घेण्यास त्यांतील स्वभावचित्रांकडे वळण्याशिवाय मार्ग नाही. कारण महाभारताचा तो प्राण आहे. कारण वाङ्मय हे जीवनाचे प्रतिबिंब आहे व जीवन नेहमी मानवी व्यक्तिरेखातून व्यक्त होत असते. महाभारतातील स्वभावलेखनाचे वैशिष्ट्य हे आहे की त्यात पराकोटीचा कठोर प्रांजल तरीही सहानुभूतीपूर्ण वास्तववाद ओतप्रोत भरलेला आहे. मानवी मनाची स्खलनशीलता इतकी विलक्षण आहे की ' सर्वथा दुर्लभं यौवनमस्खलितम् इति ' हे बाणाने यौवनाचे केलेले वर्णन सर्व जीवनाला लागू पडते. मनुष्याच्या मनाच्या विलासाचा आलेख हा सरळ रेषेत कधीच व्यक्त होणार नाही तर चढ उतार असलेल्या नागमोडी रेषेतच व्यक्त होईल. मोठा मनुष्य आपणाला वाटतो तितका मोठा नसतो, व लहान मनुष्य आपणास वाटतो तितका लहान नसतो. दुर्जनात सौजन्य, सज्जनात दौर्जन्य, रुप्यात हीण व हीणात रूपे नेहमी असते, म्हणूनच ' Saints have past and Sinners have future ' असे म्हणतात. किंबहुना या अपूर्णतेत स्खलनशीलतेतच

मानवाचे मानवत्व आहे. सज्जन आणि दुर्जन असे तडकाफडकी वर्गीकरण जो करतो तो अडाणी समजावा. त्याला जीवन समजले नाही. वर्गीकरण नसून ते मिश्रीकरण आहे, अविभाज्य संघात आहे ही जाणीव ज्याला आहे त्याला जीवन कळले. आणि या दृष्टीने व्यासाचे जीवनाचे ज्ञान इतके अचूक आहे की 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम्' ही उक्ति अर्थवाद नसून भूतार्थ व्याहृति आहे असे म्हणावे लागते.

या स्वभावचित्रात नितांतरम्य स्वभावचित्र आहे भीष्माचे. भीष्म हा महान् योगी व परम ईश्वरभक्त आहे. त्याची पितृभक्ति इतकी उज्ज्वल आहे की सत्यवती शन्तनूस देण्यास तिचा पिता माघार घेऊ लागला, कारण तिला होणाऱ्या मुलास भीष्म असेपर्यंत राज्याभिषेक होणे शक्य नाही; तेव्हा भीष्माने त्याला आश्वासन दिले की 'हे दाशा, आजपासून आमरण मी ब्रह्मचर्य पाळीन' व ही प्रतिज्ञा त्याने जन्मभर पाळली. "अद्य प्रभृति मे दाश ब्रह्मचर्यं भविष्यति । अपुत्रस्यापि मे लोकाः भविष्यन्त्यक्षया दिवि ॥" जसा पितृभक्त तसाच तो तेजस्वी आहे. प्रसंग आला तेव्हा प्रत्यक्ष गुरू असलेल्या परशुरामाशीही तो लढण्यास सिद्ध झाला, कारण 'गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः । उत्पथप्रतिपन्नस्य न्याय्यं भवति शासनम् ।' आणि परशुरामाला त्याने खडखडीत बजाविले की 'क्षत्रियांचा मी संहार केला म्हणून तूं जी वेळी अवेळी बढाई मारत असतोस ती पोकळ आहे. त्यावेळी भीष्म जन्माला आला नव्हता म्हणून तुला ते जमले.'

"न तदा जातवान भीष्मः क्षत्रियो वापि मद्विधः ।
पश्चाज्जातानि तेजांसि तृणेषु ज्वलितं त्वया ।"...

तो शूर असला तरी क्रूर नाही. त्याच्या शौर्यावरही सुसंस्कृतीची कोमल झळाळी पसरलेली आहे. म्हणूनच तो शिखंडीवरती बाण टाकीत नाही. कारण स्त्री, स्त्रीपूर्वक, स्त्रीनाम, स्त्रीस्वरूप अशा व्यक्तींवर बाण टाकावयाचा नाही ही त्याची प्रतिज्ञा आहे, व या प्रतिज्ञेमुळे मृत्यूचा प्रसंग आला तरी तो माघार घेत नाही. त्याच्या शरपंजरी शयनामध्ये, जीवनाच्या सूर्यास्तात, महाकाव्याची उदात्तता व गंभीरता आहे, आणि या शरशय्येवरून भीष्माने केलेले धर्मप्रवचन हा त्याच्या पांडित्याचा, प्रज्ञेचा व प्रतिभेचा प्रकर्ष व अर्क आहे. राजनीती, राजधर्म, आपद्धर्म, मोक्षधर्म, सुखदुःखविवेचन... जीवनाचे असे एकही अंग नाही की ज्याला भीष्माच्या सर्वस्पर्शी प्रतिभेने स्पर्श केलेला नाही. 'Death is crown or shame to life' या न्यायाने भीष्माचा मृत्यु हा त्याच्या जीवनाचा कळसाध्याय आहे. असा हा भीष्म पण तोही पैशापुढे नमतो! पांडवांचा पक्ष न्यायाचा आहे हे माहीत असूनही तो त्यांची बाजू घेऊ शकत नाही व द्रौपदीच्या मानभंगाच्या वेळेसही तो स्वस्थ बसतो. पैशाने येणारा मिंधेपणा व असहायता भीष्मासारख्या महाविरक्त वीरालाही सुटत नाही हा केवढा नियतीचा कठोर उपरोध आहे!" अर्थस्य पुरुषो दासः दासस्त्वर्थो न कस्यचित्" हे भीष्माने केलेले जीवनावरचे भाष्य आहे... कठोर तितकेच सत्य, करुण तितकेच वास्तव! येथे व्यासाने मानव ओळखलेला आहे. पंख आकाशात भराऱ्या मारत आहेत पण पाय जमिनीला बांधलेले आहेत! पतंग आकाशात उडत आहे पण दोरा पृथ्वीवर आहे! मर्यादित तरीही अमर्यादित आणि अमर्यादित तरीही मर्यादित!

## ताठ कण्याचा दुर्योधन

जसा भीष्म तसाच दुर्योधन. पण दुर्योधनाचे वैभव वेगळ्या प्रकारचे आहे. पांडवांचा जळजळीत द्वेष हा दुर्योधनाचा स्थायीभाव आहे. पांडवांचे लहानपणापासूनचे ऐश्वर्य व उत्कर्ष त्याच्या डोळ्यात सारखा सलत असतो; आणि शस्त्राने त्याना जिंकता येत नाही तर द्यूताच्या शास्त्राने तो त्यांना जिंकतो; आणि द्रौपदीवस्त्रहरणाच्या प्रसंगी तर त्याचा हा आसुरी आनंद शिगेला पोचतो. पण येथे व्यासाचे एक स्वभावरेखेचे कौशल्य लक्षात घेतले पाहिजे. दुर्योधनाच्या द्वेषाला कारण तसे काहीच दाखविता येत नाही. आणि हाच खरा द्वेष म्हटला पाहिजे. कारण प्रेमाप्रमाणे द्वेषही 'Love's reason is without reason' या न्यायाने निष्कारण निरपेक्ष म्हणून जास्त उग्र व तीव्र असतो. आयागोच्या 'Motiveless malignity' मध्ये शेक्सपीयरने हेच चातुर्य दाखवले आहे. तरीही दुर्योधनाच्या द्वेषाला कारण दाखवणे हाही कलात्मकतेचा भाग आहे. द्रौपदीची विटंबना करणारा दुर्योधन सज्जन नव्हेच, पण आपण हेही विसरता कामा नये की मयसभेत पाय घसरून पडलेल्या दुर्योधनाला द्रौपदी खदखदा हसली होती! ते हास्य ती विसरली असेल, पण दुर्योधन

विसरला नाही. कारण तो मानधन आहे. अपमान व तोही स्त्रीकडून झालेला, कोणता वीर पुरुष सहन करील बरें ? द्रौपदीचा तेजोभंग हा दुर्योधनाच्या आसुरी आनंदाचा उद्रेक आहे हे तर खरेच, पण त्याचबरोबर वीराने घेतलेला अपमानाचा तो प्रतिशोध आहे हेही दुर्योधनाच्या बाजूनें लक्षात ठेवले पाहिजे. त्याचबरोबर पांडवांचा द्वेष करणारा दुर्योधन हा उत्कृष्ट राजा होता हे भारवीने सांगितलेले आहे. पांडवांचा हा द्वेष दुर्योधनाच्या रोमरोमात इतका भिनलेला आहे की ते पाच गांवे मागू लागले तरीही तो सुईच्या अग्रावर राहील इतकी मातीही देण्यास तयार होईना, उलट तो म्हणतो की, युद्धात आम्ही मोडू पण वाकणार नाही ! ...... " उद्यच्छेदेव न नमेदुद्यमो ह्येव पौरुषम् । अप्यपर्वणि भज्येव न नमेत कदाचन " ...... याला म्हणावे माणूस. खरोखर, दुर्योधन ही पोलादाची कांब आहे ! ' मरेल पण हटणार नाही ' अशी ' मरहट्ट ' शब्दाची कोणी व्याख्या केली आहे. त्या दृष्टीने पाहता दुर्योधन हा मरहट्टांचा अग्रणीच म्हटला पाहिजे. आणि भीष्म, द्रोण, कर्ण, शल्य, शकुनी यांच्यासारखे धुरंधर वीर व अकरा अक्षौहिणी सेना गारद झाली तरी दुर्योधनाचा ताठरपणा रतिभरही वाकत नाही. फार काय, भीमाच्या गदेने मांड्या छिन्नभिन्न झालेल्या असताही, धुळीत लोळत असताना तो कृष्णाला ठणठणीत बजावतो की, त्याचे जीवन सफल आहे, स्वर्ग त्याचा आहे– " अधीतं विधिवद्दत्तं प्रशास्ता भूः स सागरा । मूर्ध्नि स्थितममित्राणां को नु स्वन्ततरो मया ॥ ... अशा माणसाला जिंकणार कोण आणि वाकवणार कोण ? दुर्योधन अजिंक्य आहे ! त्याचा मृत्यु पाहून आनंद वाटत नाही तर विषाद वाटतो, मन स्तिमित होते हीच तर व्यासाची चरित्र-चित्रणातील कुशलता, आणि त्याचे कारण दुर्योधनाच्याही अंतरंगाचा ठाव घेणारी " पुढां स्नेह पाझरे । माघां धावती अक्षरें । शब्द पाठीं अवतरे । कृपा आधी ॥ " अशी व्यासाची विशाल सहानुभूती ! व्यासानंतर ही सहानुभूती " मानशरीराः राजानः " असे म्हणणाऱ्या भासानेच दाखवली आहे. हे पाहिले म्हणजे वाटते की, 'The duty of a biographer is not to propose, nor to impose but to expose ' हा अर्वाचीन चरित्रशास्त्रातील दंडक या प्राचीन लेखकांना माहीत असावा.

## कर्ण : दैवाचा दारुण उपरोध

महाकवी व्यासाच्या स्वभावलेखनकलेचा कर्ण हा निस्तुल व रमणीय अलंकार आहे. पांडवांच्या विरुद्ध पक्षाचा असल्यामुळे दुर्योधनाप्रमाणे तोही खलनायक म्हणूनच समजला गेला आहे; पण त्याचे व्यक्तिरेखन अशा कौशल्याने केले आहे की त्याच्याबद्दल प्रत्येक सहृदय मनुष्याच्या मनात अपार करुणा निर्माण व्हावी; कारण कर्णाचीं दुष्कृत्ये हा त्याच्या प्रेरणेपेक्षाही परिस्थितीचा परिपाक आहे. " He is more sinned against than sinning " – कर्णाच्या दुर्दैवाचा प्रारंभ त्याच्या जन्मापासूनच होतो. त्याच्या आईने लोकापवादाच्या भीतीने जन्मतःच त्याला गंगामातेस समर्पण केले आणि त्याचे सूतांनी पालन केले. सामान्यतः आईपेक्षा मुलाचा मोठा त्राता नव्हे. आयर्विंगने म्हटल्याप्रमाणे तिच्या मुलाला सर्व जगाने टाकले तरी तोच तिचे सर्व जग होऊन राहतो. He becomes the whole world to her; आणि ' कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति' असे शंकराचार्यांनीही म्हटलेले आहे. पण येथे आईनेच मुलाला टाकलेले आहे; आणि त्याचा सर्वांत मोठा शत्रु झालेली आहे ! यातून पुढे कर्ण हा जन्मतः क्षत्रिय असला तरी ' सूत–पुत्र ' मानला जातो; आणि त्याचे सौंदर्य, त्याचे शौर्य, त्याचे राजैश्वर्य व त्याचे औदार्य ह्या सर्व महनीय सद्‌गुणांवर आपल्या हीन वंशत्वाची जाणीव एखाद्या आषाढींच्या घनपटलाप्रमाणे आपली काळी सावली टाकते. कर्ण हा कर्मवीर आहे; त्यामुळे वंशदत्त श्रेष्ठत्वापेक्षा कर्मदत्त श्रेष्ठत्व तो श्रेष्ठ मानतो. पण त्याच्या अंतरंगाला कर्करोगाप्रमाणे खाणारी ती दारुण जाणीव तो क्षणमात्रही विसरू शकत नाही. सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम् । दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ॥ " अशा शब्दात भट्ट नारायणाने मर्मज्ञतेने कर्णाची ही करुणोदात्त मनोव्यथा उलगडून दाखविली आहे. द्रौपदीचे वस्त्रहरण करण्यात कर्ण हा अग्रभागी होता हे खरे आहे; पण त्याबरोबर कर्णाच्या बाजूने हेही लक्षात ठेवले पाहिजे की, कर्ण हा अर्जुनाप्रमाणेच रूपशौर्यसंपन्न असूनही तो मत्स्यवेध जिंकण्याच्या उंबरठ्यावर असताना " मी सूतपुत्रास वरणार नाही " असे भर–सभेत सांगून द्रौपदीने त्याचा पराकाष्ठेचा मानभंग केलेला आहे. आपल्या राजवंशाच्या ऐटीत स्त्रीने

केलेला अपमान विसरेल तो पुरुष कसला ? " एतावानेव पुरुषो यदमर्षी यदक्षमी ! " ... दुर्योधनाचे उग्र व उदात्त चरित्र वाचताना " Better to reign in hell than serve in heaven " असे म्हणणाऱ्या मिल्टनच्या सैतानाची जशी आठवण होते, तसेच कर्णचरित्र वाचताना नेपोलियनची स्मृती होते. कारण आपण राजवंशातील नाही हे नेपोलियनचेही दुःख आहे. 'फ्रान्सचा राजमुकुट नाल्यात पडला होता, तो मी उचलला ' असे नेपोलियन म्हणतो. पण फ्रेंच राज्यक्रांतीच्या विराट् वादळावर वरुणाप्रमाणे आरूढ होणाऱ्या ह्या दिगंतकीर्ति वीराला तो कवडीमोल असलेल्या बूर्बोन राजाप्रमाणे राजवंशात जन्मलेला नाही हे दुःख सलत होते ! तीच कर्णाची कथा आहे. कर्णाचे दुसरे दुर्दैव आहे ते हे की, प्रत्यक्ष गुरूंनेही त्याला वेळेवर अस्त्रविद्या आठवणार नाही असा घोर शाप दिला ! ... ... ऐन युद्धाच्या धुमश्चक्रीत ' सर्वं सहा ' पृथ्वीनेही त्यांचे रथचक्र गिळले; आणि सर्वांत शेवटचे दुर्दैव हे की, कृष्णासारखा महाधूर्त प्रतिस्पर्धी त्याला भेटला की ज्याने त्याला चिंडीत गाठून ठार मारिले व मारता मारताही निरुत्तर केले की "तेव्हा कोठे गेला होता राधासुता तुझा धर्म ! " ' ... ... इतका तेजस्वी, इतका सत्त्वशील, इतका उदार आत्मा अशा रीतीने मरण पावावा ! कर्णाचे औदार्य हे औदार्याचे उपमान होऊन बसलेले आहे. इंद्र कवचकुंडले मागण्यास येणार आहे तरी कर्णाने त्याला ती देऊ नयेत अशी हितबुद्धीने सूर्याने सूचना केली असताही कर्णाने त्याला उत्तर दिले का, "जीवितेनापि मे रक्ष्या कीर्तिस्तद्विद्धि मे व्रतम् ! " ...... आणि कर्णाचे औदार्य पाहून इंद्रही चकित झाला, व भासकवीने म्हटल्याप्रमाणे त्याने त्याला आशीर्वाद दिला की " सूर्य इव चन्द्र इव सागर इव हिमवान् इव तिष्ठतु ते यशः ! " ... ... मनुष्याचे जीवन हा निर्दय नियतीचा खेळ आहे याचे यापेक्षा विलक्षण उदाहरण क्वचितच सापडेल. हार्डीच्याच कलाकृतीत सापडावी अशी ही करुण-गंभीर, व्यक्तिरेखा रंगवून व्यासाला हेच कदाचित सुचवावयाचे असेल की, माणसाला दोष देताना फार जपून बोलले पाहिजे. कारण माणूस हा परिस्थितीचा, दैवाचा, ललाटलेखाचा बळी आहे. दुर्गुण काय किंवा सद्गुण काय यांची मक्तेदारी असू शकत नाही. बायकोला पणाला लावण्याइतकी स्खलनशीलता धर्माच्या ठिकाणी असते व देवेन्द्राला लाजविणारे औदार्य कर्णापाशी असू शकते. एका वेश्येला दगड मारणाऱ्या लोकांना ख्रिस्ताने प्रश्न केला की जो शुद्ध असेल त्याने हिला दगड मारावा; असा प्रश्न केल्याबरोबर सर्व हात खाली आले अशी बायबलात कथा आहे. ' सर्वथा दुर्लभं यौवनमस्खलितमिति' असे बाणकवीने म्हटले आहे. यौवनाप्रमाणे सर्वथा अस्खलित जीवनही सापडणे कठीण आहे. म्हणूनच कर्णावर दगड टाकू शकेल असा कोण आहे बरे ?

### द्रौपदी : स्त्रीजन्मा, ही तुझी कहाणी !

" दुःख ही परमेश्वराची मनुष्याला सर्वांत मोठी देणगी होय " असे रवीन्द्रनाथांनी म्हटले आहे. याचा अर्थ असा आहे की दुःखाशिवाय मानवीमनातील उदात्तता; सामर्थ्य, चारित्र्य व्यक्तच होत नाही. " Made perfect through suffering " असा इंग्रजीत एक वाक्प्रचार आहे; दुःख भोगल्याविना मनुष्याला पूर्णता येत नाही. दुःख व संकटे यांचे आघात सोसूनही जे अंतःकरण. तेजस्वी व स्फूर्तिमय राहते तेच खरे अंतःकरण. या सत्याची प्रचीति द्रौपदीच्या जीवनात येते. आपणास असे वाटते की ही पाच महावीरांची महाराणी; तिला दुःख तरी कोणते असेल ? पण ज्याप्रमाणे द्रौपदीइतके सुख कोणी भोगले नाही, त्याप्रमाणे तिच्याइतके दुःखही कोणी भोगले नाही. ही राजसूय करणाऱ्या सम्राटांची स्वामिनी, पण भर-सभेत वस्त्रहरणाची विटंबना तिला सहन करावी लागली ! एकापेक्षा एक असे शूर व प्रतापी पति पण ते त्यावेळी तिच्यासाठी काहीही करू शकले नाहीत ! हे पाहिले म्हणजे **" कालाय तस्मै नमः "** असे म्हटल्याशिवाय राहवत नाही. त्यानंतर बारा वर्षांचा वनवास तिला सोसावा लागला. " क्लमं ययौ कन्दुकलीलयापि या तया मुनीना चरितं व्यगाहत । " ... अज्ञातवासात एखाद्या दासीप्रमाणे विराटाचे चन्दन तिला उगाळून द्यावे लागले कारण तिच्याशिवाय दुसरीच्या हातचे चंदन त्याला चालत नव्हते ! " नान्यपिष्टं हि मत्स्यस्य चन्दनं किल रोचते " ... एवढ्याने दुर्दैवाचे दशावतार पुरे झाले नाहीत म्हणूनच की काय कीचकाची झडप तिच्यावर पडली ..... त्याने तिला लाथ मारली .... त्याच्या सेवेसाठी मदिरेचा पेला तिला न्यावा लागला ! तिच्या अंतः-

करणाने ठाव सोडला व केवळ दैवच तिला शरण्यं झाले ! . . . " सा शङ्कमाना रुदती दैवं शरणमीयुषी । प्रतिष्ठत सुराहारी कीचकस्य निवेशनम् ॥ "... या वनवासातून बाहेर पडल्यावर तरी आपल्या मानभंगाचा प्रतिशोध घेता येईल ही तिला आशा होती, पण पहावे तो भीमार्जुनांसारखे रणरंगधीरही शांततेची बोलणी बोलू लागले ! ... हे पाहिल्यावर तिला संताप आवरेना व ती म्हणाली की " माझा वृद्ध बाप, माझा भाऊ व माझी पाच मुले लढतील व माझ्या अपमानाचा सूड घेतील. तुमच्या क्षात्रतेजाला शतशः धिक्कार असो ! " धिक् पार्थस्य धनुष्मत्तां भीमसेनस्य धिक् बलम् । यत्र दुर्योधनः कृष्ण मुहूर्तमपि जीवति ॥ ... युद्धामध्ये दुर्योधन, दुःशासन, कर्ण यांचा संहार होऊन तिला थोडे समाधान मिळते न मिळते तोच अश्वत्थाम्याने छापा घालून तिच्या सर्व पुत्रांची कत्तल उडविली ! ... दुःखामागून दुःख तिच्या पाठीशी हात धुवून लागलेले आहे. पण या सर्व दुःखपरंपरेतूनही तिचे चारित्र्य भट्टीत घातलेल्या सोन्याप्रमाणे उज्ज्वल राहिलेले आहे. द्रौपदी ही महाभारताची नायिका आहे आणि स्त्री ही राष्ट्राचा मानबिंदु आहे या वचनाची सार्थता तिच्या ठायी दिसल्याशिवाय राहत नाही. पण अशा पतिव्रता व पंडिता मानिनीची ही करुणकथा वाचल्यावर हीच स्त्रीजन्माची कहाणी काय, असा प्रश्न मनात आल्याशिवाय राहात नाही.

महाभारतातील स्त्रीरेखा हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय होईल, पतिव्रता गांधारी, " **राजा कालस्य कारणम्** ' व ' **असंतोषः श्रियो मूलम्** ' ही महातत्त्वे सांगणारी कुंती, 'सरम्भामर्षताम्राक्षी स्फुरमाणौष्ठसंपुटा । कटाक्षैर्निरहन्तीव तिर्यग्राजानमैक्षत " अशी तेजस्विनी शकुंतला, पतिपरायण सावित्री, व दमयंती, या दुय्यम स्त्रीरेखाही अशा कौशल्याने रंगविल्या आहेत की, भारतीय मनात त्यांना अखंड स्थान मिळालेले आहे; आपल्या घरातल्या माणसापेक्षाही सीता, सावित्री, दमयंती या त्यांना जवळच्या वाटत आलेल्या आहेत; कारण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात भारतीय स्त्रीचा कोमल तरीही प्रखर, करुण तरीही उदात्त आत्मा साकार झालेला आहे.

पण वर सांगितलेली स्वभावचित्रे केवळ प्रातिनिधिक म्हणता येतील. या व्यतिरिक्त लहान मोठी इतकी स्वभावचित्रे महाभारतात विखरलेली आहेत की आरशात ज्याप्रमाणे माणूस त्याप्रमाणे महाभारतात मानवता प्रतिबिंबित झालेली आहे. वाङ्मय हा जीवनाचा आरसा आहे असे म्हणतात ते महाभारताच्या बाबतीत अक्षरशः खरे आहे, आणि 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम् ' ही व्यासाची ' स्तुति नव्हे तर वस्तुस्थिति आहे. ' यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत् क्वचित् । ' हे उद्गार धर्मार्थकाममोक्षाप्रमाणे महाभारतातील मानवी स्वभावदर्शनाच्या बाबतीतही खरे आहेत.

### महाभारत : जीवन–दृष्टि

पण स्वभावचित्रण हा ललित-साहित्याचा प्राण असला तरी केवळ त्याने साहित्याला परिपूर्णता येत नाही. साहित्य हे जीवनाचे भाष्य असते आणि या दृष्टीने पाहावयाचे तर महाभारतातील तत्त्वज्ञानाकडे वळल्याशिवाय गत्यंतर नाही. ' शांतिपर्व ' हा महाभारताचा यादृष्टीने अर्क आहे. याशिवाय कणिकनीती, विदुरनीति, कच्चिदध्याय, द्रौपदी-धर्म-संवाद अशा अनेक प्रकरणातून भारतकाराची तत्त्वदृष्टि व्यक्त झालेली आहे. पण महाभारताचे तत्त्वसर्वस्व दृष्टीस पडते ते भगवान् श्रीकृष्णाच्या बहुरंगी चरित्र-चित्रणातच होय, आणि श्रीकृष्णाच्या जीवनाचे सारसर्वस्व म्हणजे निष्काम कर्मयोग होय. भगवद्गीतेला एकाने श्रीकृष्णाचे आध्यात्मिक आत्मचरित्र Spiritual autobiography म्हटले आहे ते खरेच आहे.

संसार हा दुःखमय आहे हे हिंदुतत्त्वज्ञानाप्रमाणे महाभारताचेही आद्य तत्त्व आहे. 'सुखाद्बहुतरं दुःखं जीविते नास्ति संशयः । ' ह्या दुःखामुळे मनुष्य संसारत्याग करितो. पण संसारत्याग ही सोपी गोष्ट नव्हे. तेथे जातीचे पाहिजे, नाहीपेक्षा ' देव ना संसार तुका दोहीकडे चोर ' अशी फजिती मात्र होते. पुन्हा आत्यंतिक निवृत्तिधर्मामुळे लोकयात्रेचा उच्छेद होण्याचा प्रसंग येतो ते निराळेंच. वैभव उत्कर्ष पराक्रम हा प्रवृत्तीचा धर्म आहे व तोच राष्ट्रजीवनास आवश्यक आहे. महाभारत हे प्रवृत्तिधर्माचा पुरस्कार करणारे काव्य आहे. प्रवृत्ती व निवृत्ती यांचा मेळ घालणे हे कठीण आहेच; परंतु ते अशक्य नाही. संसार हा दुःखमय होतो तो कर्मामुळे नसून त्यातील फलाशेमुळे होय. ही फलाशा सोडून अखंड कर्म केले म्हणजे त्याच्या दुःखाचा लेप माणसास लागत नाही. आशा हेच दुःखाचे मूळ आहे. पिंगलाख्यानात हेच तत्त्व



अनुक्रमणिका

"आशायाः परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम् ।" सांगितले आहे; व "योऽसौ प्राणान्तिको रोगस्तां तृष्णां त्यजतः सुखम् ।" या शब्दांनी 'शांति-पर्वा'त आणि 'न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।' या रीतीने ययातीच्या कथेत त्याच तत्त्वाचा पुनरुच्चार केलेला आहे.

तत्त्वज्ञान नेहमीच उदात्त असते; किंबहुना उदात्त असते ते तत्त्वज्ञानच असते. परंतु व्यवहाराच्या पातळीवर जेव्हा तत्त्वज्ञान उतरते तेव्हा त्याला तडजोड करावी लागते. व्यवहार आणि तत्त्वज्ञान यांचा अत्यंत रमणीय समन्वय श्रीकृष्णाच्या चरित्रात झालेला आहे. श्रीकृष्णाने कर्णाचा वध करविला, दुर्योधनाचा ऊरुभंग करविला, भीष्माला शिखंडीकडून ठार मारविले, द्रोणाला फसवून मारविले, जरासंधाचा वध करविला या गोष्टी कपटाच्या वाटल्या तर आपणास व्यवहाराचे तत्त्वज्ञान व तत्त्वज्ञानाचा व्यवहार कळत नाही असे म्हणणे भाग आहे. सत्य, अहिंसा, सर्वभूतहितबुद्धि ही उदात्त तत्त्वे निरपवाद नसून देशकालपात्रांची त्यांना नेहमी मर्यादा पडते. "तस्मान्नित्यं क्षमा तात पण्डितैरपवादिता ।" त्यामुळे अधर्माचा प्रतिकार निर्वैर बुद्धीने का होईना, करावाच लागतो व हेच ईश्वरी अवताराचे प्रयोजन होय. या प्रसंगी हत्येचे पाप कर्त्याला लागत नाही, तो केवळ दुष्टांच्या कृत्यांचा 'As you sow so you reap' या न्यायाने त्यांना मिळालेला फलविपाक आहे. '**मरणान्तानि वैराणि**' या शब्दात रामचंद्रांनी व '**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे** ।" या शब्दात श्रीकृष्णांनी हा तत्त्वज्ञानाचा व्यवहाराशी समन्वय घालून दाखविला आहे व अर्वाचीन काळी शिवछत्रपतींनी अफझुलखानाचा वाघनखांनी कोथळा बाहेर काढला पण नंतर त्याची कबरही बांधली हे याच तत्त्वाचे उदाहरण म्हटले पाहिजे.

हेच महाभारताचे तात्पर्य म्हणावे लागेल. उपक्रम, उपसंहार, अभ्यास, अपूर्वता, फल, अर्थवाद हे मीमांसकांचे नियम लावले म्हणजे "**धर्मबुद्धि**" हे महाभारताचे सारसर्वस्व आहे असे म्हणणे भाग आहे. "**धर्मे मतिर्भवतु वः सततोत्थितानाम्**" हे प्रारंभीचे, "**धर्मादर्थश्च कामश्च स धर्मः किं न सेव्यते ।**" हे अखेरचे उद्गार आहेत.' वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः । एतच्चतुर्विधं प्राहुः साक्षाद्धर्मस्य लक्षणम् ॥' ...... व "धारणाद्धर्ममित्याहुः धर्मो धारयते प्रजा ! "...... ह्या धर्माच्या व्याख्या आहेत. 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावह;' ही धर्मनिष्ठा आहे. 'लोकयात्रार्थमेवेह धर्मस्य नियमः कृतः ।' हे धर्माचे प्रयोजन आहे. गीता अर्जुनाला क्षात्रधर्मास प्रवृत्त झालेली आहे. अर्जुनाचा क्षात्रधर्म बदललेला नाही, त्याच्याकडे पाहण्याची त्याची दृष्टि बदलली आहे हे गीतेचे तात्पर्य आहे. तेव्हा प्रत्येकाने सम व निष्काम बुद्धीने स्वधर्माचे आचरण करणे हे महाभारताचे तात्पर्य आहे, असाच धर्म व्यक्ति व समष्टि यांचा ऐहिक व आध्यात्मिक परमोत्कर्ष गांठू शकतो, कारण '**धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः ।**' असे महाभारतातच म्हटले आहे. हा श्लोक इतक्या महत्त्वाचा आहे की '**तत्त्वमसि**' हे जसे वेदांताचे तसे हा श्लोक हे महाभारताचे महावाक्य म्हणावे लागेल.

सध्याचा काळ हा अर्थ व काम या दोनच पुरुषार्थाच्या उत्कर्षाचा आहे. पण जोपर्यंत धर्मबुद्धीचा उत्कर्ष व उदय माणसाच्या अंतःकरणात होत नाही तोपर्यंत त्याला अखंड प्रसन्नतेचा लाभ होणे शक्य नाही. 'अशान्तस्य कुतः सुखम् ।' ...... धर्म, अर्थ, काम या पुरुषार्थाचा समतोल जेव्हा बिघडतो तेव्हाच व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनात संघर्ष व धरणीकंप होतात. सांप्रतच्या खळबळीच्या, संघर्षशील जगाला महाभारताचा संदेश हाच आहे की, '**अर्थशास्त्रात्तु बलवद्धर्मशास्त्रमिति स्थितिः !**'

असो. महाभारताच्या महनीयतेचे वर्णन करावे तेवढे थोडेच आहे. हा प्राचीन भारतीय ज्ञानाचा ज्ञानकोश आहे, हिंदु संस्कृतीचा सर्वस्वाधार आहे, तत्त्वज्ञानाचे माहेर आहे; मानवी जीवनाचा महान् आलेख आहे. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे ... "ना तरी सकल धर्मांचे माहेर । सज्जनांचे जिव्हार । लावण्यरत्नभांडार । शारदेचे ॥" ज्याच्या अलौकिक प्रतिभेतून अशा अलौकिक महाकाव्याची निर्मिती झाली त्या व्यासाला वंदन करिताना म्हणावेसे वाटते की—

"नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे<br>
फुल्लारविन्दायतपत्रनेत्रः ।<br>
**येन त्वया भारततैलपूर्णः**<br>
**प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः** ॥





अनुक्रमणिका

श्री. अ. का. प्रियोळकर

# लोकहितवादीकृत निबंधसंग्रह –

## पाठनिश्चिति आणि संपादन

ना. एच्. एच्. ॲस्क्विथ २८ एप्रिल १८९८ रोजीं लंडन सोसायटीपुढें टीकाशास्त्र (Criticism) या विषयावर बोलतांना म्हणाले,

"In the eyes of a great number of people a critic is nothing more than a censor, a critical attitude is equivalent to an attitude of disparagement, and criticism is only another name for the science of finding fault."

इतकें बोलून लगेच, टीकेकर (म्हणजे टीकेचे कर्ते) या एकंदर वर्गासंबंधीं "The critics are the men who have failed in literature and art," असेंही त्यांनीं सांगून टाकलें आहे!

ॲस्क्विथच्या वरील शब्दांची आठवण करून देणारे त्रस्त समंध मला वारंवार भेटतात. 'टीकेकर' असें एकाद्याचें आडनांव असलें म्हणजे तर मग विचारूंच नका! ज्याच्या त्याच्यावर टीका करण्याचा जन्मसिद्ध हक्क आपणास प्राप्त झाला असें तो समजतो, आणि 'मॉडर्न ब्रेडा' पासून 'एन्शंट वेदा' पर्यंत पृथ्वीतलावरील प्रत्येक विषयावर लिहिण्याची आपली लायकी आहे, असें तो मानतो.

आडनांव किंवा नांव हें अन्वर्थक असतेंच असें नाहीं. 'आडनांव' या शब्दाचा मूळ अर्थ, 'यथार्थ नव्हे असें नांव', असा दिसतो. या अर्थानें ज्ञानेश्वरमहाराजांनीं हा शब्द वापरलेला आहे:–

कां बधिराचे नीट कान। अपेया नाम पान।
तैसें आडनांव ज्ञान। तामसा तया॥

– ज्ञानदेवी (माडगांवकर) अ० १८, ५८०

'पंडित' असें आडनांव असलेला माणूस मूर्ख असूं शकतो, आणि 'सोनाबाई'च्या हातांत कथलाचे वाळे पाहावयास मिळतात!

एकाद्या टीकाकारानें आपल्या ग्रंथांतील चुका दाखविल्या तर त्याबद्दल वाईट वाटून घेण्याचें बिलकूल कारण नाहीं. आपल्या चुका काढण्याकरितांच तर आपण पगार देऊन प्रुफ-करेक्टर नेमतों. पैसे न देतां जर हें काम मोफत करणारा एकादा ऑनररी करेक्टर लाभला तर, एकनाथमहाराजांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे,

"निंदक आमुचा सखा।
आमुचीं पापें धूतो फुका॥"

असें म्हणून उलट आनंद मानावयास पाहिजे. आपल्या अशा चुका दाखविल्याबद्दल मला मुळींच वाईट वाटत नाहीं. आपल्या नजरेंतून त्या सुटल्या आणि ग्रंथांत राहून गेल्या याबद्दल खेद होतो; पण एकादीदुसरी चूक दाखवून दुष्टबुद्धीनें साराच ग्रंथ टाकाऊ ठरविणारा, किंवा आपल्या अज्ञानानें भलतेच दोष दुसऱ्याच्या गळीं बांधणारा, अशा माणसाची गय करतां येत नाहीं.

मीं संपादन केलेला 'लोकहितवादीकृत निबंधसंग्रह' अलीकडेच प्रसिद्ध झाला आहे. 'नवभारत'च्या गेल्या फेब्रुवारीच्या अंकांत त्याचें परीक्षण आल्याचें कळलें. 'नवभारत'चे संपादक या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या दिवशीं स्वतः बोलणार होते; पण आयत्यावेळीं आजारी पडल्यामुळें त्या दिवशीं ते येऊं शकले नाहींत; म्हणून त्यांनीं आपले विचार आपल्या मासिकांत प्रदर्शित केले असतील अशा कल्पनेनें मीं हा अंक मिळविला. पाहातों तों, ज्याचें घर शेजारीं असावें म्हणून साधुलोक नेहमीं इच्छितात, तो धंदेवाईक जुनाच 'दोस्त' तेथें आढळला!

कांहीं दिवसांपूर्वीं टोपणनांवानें, पुण्याच्या 'साधना' साप्ताहिकांत जें यानें लिहिलें, तेंच आणखी भर घालून त्यानें 'नवभारता'च्या गळीं बांधलें आहे! यांत पुनः आणखी भर घालून तिसऱ्या एकाद्या पत्राकडे त्यानें लेख पाठविला असल्यास मला त्याचें नवल

वाटणार नाहीं. अशी याची दांडगी चिकाटी दिसते !

'साधने'त (१६-१२-१९६७) हा टीकाकार लिहितो, " ह्या जाडजूड ग्रंथात संपादन लेकाचे कुठे गायब झाले ते कळत नाही ! व्यक्ती-वाङ्मय-विचार हा प्रास्ताविक प्रबंध ( पृ. १-६८ ) आणि चार पानाचे निवेदन एवढयात काय ते संपादक चमकले."

माझ्या पुस्तकाच्या संपादकीय निवेदनांत मीं माझ्या संपादनाचीं बारा तत्त्वें सांगितलीं आहेत. या टीकाकाराच्या मताप्रमाणें तें संपादन नसेल ! कांहींतरी उलथापालथ आणि गडबडगुंडा केला म्हणजेच तें संपादन झालें अशी त्याची समजूत असावी !

' लोकहितवादींचीं शतपत्रें ' ( १९४० ) हा त्याच्या संपादनाचा नमुना आपल्यापुढें असल्यामुळें ' संपादना ' संबंधानें त्याच्या कल्पना काय आहेत, तें कळणें शक्य झालें आहे.

शिळाप्रेसवरील लेखसंग्रहांत असलेलीं शतपत्रें "**नव्या शुद्धलेखनाप्रमाणे छापलीं आहेत,**" ही आरंभींच दिलेली संपादकीय कबुली लक्षांत ठेवण्यासारखी आहे. म्हणजे विचार 'लोकहितवादीं'चे, पण शुद्धलेखन या संपादकाचें. असें करण्यांत कांहीं गैर नाहीं; पण मग पाठचिकित्साशास्त्राप्रमाणें हा ग्रंथ मूळ लेखकाचा असें म्हणतां येणार नाहीं. तें या ग्रंथाचें पुनर्लेखन झालें. शिवाय या संपादकानें केवळ शुद्धलेखनच बदललें नसून (१) मूळ शब्दही बदलले आहेत; (२) सर्वस्वी नवे शब्द घुसडले आहेत; ( ३ ) जुने शब्द अजीबात गाळले आहेत; (४) वाक्यांतील शब्द मागें-पुढें केले आहेत. असें करतांना कांहीं ठिकाणीं (५) मूळ लेखकाच्या म्हणण्याची अर्थहानि किंवा खराबी झाली आहे. ( ६ ) कांहीं शब्दांचीं जुनीं रूपें बदलणें अवश्य असतांहीं तीं तशींच ठेविलीं आहेत. ( ७ ) कांहीं ठिकाणीं नवीं बदलून जुनीं रूपें घातलीं आहेत, असे जे अनेक प्रकार या ' संपादनांत ' सांपडतात, त्यांचीं, वानगीदाखल, वरवर पुस्तक चाळलें असतां जीं नजरेस आलीं, त्यांपैकीं कांहीं उदाहरणें खालीं देत आहें :

१. **मूळ शब्द बदलले**– ( कंसांत दिलेले मूळ शब्द आहेत )

(१) पृ. ३९. त्यास मोठी शिक्षा **झाली** ( मिळाली ).

(२) पृ. ४०. **मनांत** ( मनास ) येईल त्यास देतात.

चतुर्थीच्या जागीं सप्तमी योजिली हें ' नव्या शुद्धलेखना'प्रमाणें असेल ! पण पुढें लगेच पृ. ४१, ओळ १० येथें मुळांतला ' मनास ' शब्द कायम कां ठेविला ? त्याचें ' मनांत ' असें रूपांतर कां केलें नाहीं ?

(३) पृ. ४०. ... नीति अब्रू यांचा शोध **करण्याचे** ( घेण्याचे ) श्रम करीत नाहींत.

(४) पृ. ३३३. परदेशचे **लोक** ( यवन व म्लेंछ इत्यादि ) राज्य करितात.

(५) पृ. ३३६. घड्याळ जवळ **बाळगिलें** (ठेविलें).

२. **नवे शब्द घुसडले.** ( असे घुसडलेले शब्द कंसांत दिले आहेत )

(१) पृ. ८६. दोन हजार वर्षेपर्यंत ( **सुखानें** ) झोप घेतली.

(२) पृ. २४७. ( **हें** ) आम्ही फार खाल्लें.

(३) पृ. २४७. त्यांचे आयुष्यांत (**अशी**) एकही अशी गोष्ट ... ...

(४) पृ. ३७०. त्याचें मन दुष्ट बुद्धीशीं ...... तन्मय ( **च** ) झालें आहे.

(५) पृ. ४५३. त्याचा स्पर्श (**ही**) उपयोगी नाहीं.

३. **मूळांतले शब्द गाळले.** ( असे गाळलेले शब्द कंसांत दिले आहेत )

(१) पृ. ४१. त्या वाचावयाची ( **एवढी** ) मेहनत कोण करतो ?

(२) पृ. १३७. बाजीरावासारखे ( **झाले ते** ) मनास येईल तसे ब्राह्मणांस द्रव्य देऊं लागले.

(३) पृ. २०४. हा ( **मनाचा** ) तर्क चालविणें.

(४) पृ. २४९. या लोकांस त्यांचे ( **दोन** ) डोळेही ठाऊक नाहींत.

(५) पृ. ३३४. तीनही वर्णांचें काम इंग्रज ( **लोक** ) चालवितात.

४. **वाक्यांतील शब्द मागें-पुढें करणें** ( मूळांतील क्रम कंसांत पहा )

(१) पृ. १००. तिचा कांहींच उपयोग ( उपयोग कांहींच ) नव्हता.

(२) पृ. २४७. याहून दुसरा सुखाचा अनुभव ( सुखाचा अनुभव दुसरा ) कांहीं त्यास नसतो.

(३) पृ० २४८. तो लोक 'शास्त्रीबोवा' असें (शास्त्रीबोवा असें लोक) म्हणूं लागतात.

(४) पृ. ३३२. त्यांचे हातून कांहीं (कांहीं यांचे हातून) पराक्रम.

५. अर्थाच्या किंवा व्याकरणाच्या दृष्टीनें बरा असलेला पाठ खरा असतो असें नाहीं. नवे शब्द घालून, जुना गाळून, इकडचा तिकडे शब्द करून पाठ कदाचित् बरा होईल, पण खरा राहाणार नाहीं. या संपादकानें **मूळांत बदल करून मूळांतील अर्थाची हानि किंवा शुद्धतेच्या दृष्टीनें** खराबी कशी केली आहे तें आतां पहा. (मूळ शब्द कंसांत)

(१) पृ. ३९. हा जर कृपा करून **आपलें** (आपले) पत्रद्वारें प्रसिद्ध होईल.

(२) पृ. ४१. किती एक **अर्जी** (अर्जा) पडतात. 'अर्जी' याचें 'अर्जा' हें अनेकवचन आहे.

(३) पृ० ४२. आपलें (आपले) मागील पत्रीं 'एक हिंदु' या सहीचें पत्र छापलें आहे.

(४) पृ० ९६. म्हणून धर्म (धर्म म्हणून) कोणास कळत नाही.

(५) पृ० १४२. त्यानंतर...... निबंधग्रंथ झाले. त्याने (त्यांणीं) पूर्वीचे सर्वच ग्रंथ ईश्वरी मानून, सर्व ओझें डोकीवर घेतलें.

**६. कांहीं शब्दांचीं जुनीं रूपें बदलणें आवश्यक असतां बदललेलीं नाहींत.**

(१) जुन्या काळीं 'च' किंवा 'ज' या अक्षराचा संस्कृतांतल्याप्रमाणें तालव्य उच्चार करीत, आणि त्याचा दंत-तालव्य उच्चार करावयाचा झाला तर आरंभीं ओळींत ''च', ''ज' असे बिंदु देत.

म्हणजे 'ज्याला' म्हणावयाचें झालें तर 'जाला' आणि 'त्याच्या' म्हणावयाचें झालें 'त्याचा' असें लिहीत. ही जुनी शुद्धलेखनपद्धति माझ्यासारख्या सनातनी संपादकाला देखील बदलण्याची आवश्यकता वाटली. म्हणजे 'जा' चें 'ज्या' आणि 'त्याचा' चें 'त्याच्या' असें मीं केलें; पण 'नव्या शुद्धलेखना'च्या या भक्तानें तीं जशींच्या तशीं ठेविलीं आहेत !

पहा:– जां (ज्यां) जवळ (पृ० १११) द्रव्य आहे. लोकांचा (च्या) नें बंद करवलें असतें काय ? (पृ. ६५). ते पंडित आतांचा (च्या) सारखे असते (पृ. १३०).

(२) 'ह्म' आणि 'म्ह' या दोनही जोडाक्षरांचा उच्चार कांहींसा सारखाच आहे. पहिल्याला ब्राह्मणाचा 'ह्म' आणि दुसऱ्याला म्हशीचा 'म्ह' म्हणतात. आपल्या चालू लेखनाप्रमाणें आम्हीं 'ब्राह्मण' असें लिहितों; 'ब्राम्हण' असें लिहिणें चूक मानलें जातें; पण लोकहितवादी 'ब्राम्हण' आणि क्वचित् 'ब्राह्मण' असेंही लिहीत.

नव्या शुद्धलेखनाचा पुरस्कर्ता 'शतपत्रां'चा संपादक सर्वत्र 'ब्राम्हण' म्हणजे म्हशीचा 'म्ह' वापरतो.

(३) ज्यांनीं, त्यानें, त्यांनीं अशीं सर्वनामाचीं नवीं रूपें आपण वापरतों, पण त्या ऐवजीं बहुतेक ठिकाणीं अनुक्रमें जांणी, त्याणे, त्यांणी, अशीं रूपें या 'शतपत्रां'च्या आवृत्तींत पहावयास मिळतात.

अनेक शब्दांचीं रूपें जुन्याच पद्धतीचीं ठेविलीं आहेत. उदाहरणार्थ–

असती (असते), पृ. ४९.
समजती (समजते), पृ. ९०.
बुडोन (बुडून), पृ. ८४.
नसोन (नसून), पृ. १४१.
दक्षण (दक्षिण), पृ. ७२.
अराधनेंत (आराधनेंत) पृ. ९४.
हिकडे (इकडे), पृ. ६२.
दिल्हा (दिला), पृ. ७२.
प्रमाणिकपणा (प्रामाणिकपणा), पृ. ७४.

७. कांहीं नवीं रूपें बदलून जुनीं केलीं आहेत. (लोकहितवादींच्या मूळ ग्रंथांतील रूपें कंसात दाखविलीं आहेत.)

उदाहरणार्थ–

ब्राम्हण (ब्राह्मण), पृ. ६४, ओ. २२, २४
सहाय्य (साहाय्य), पृ. ८५
नवता (नव्हता), पृ. १०९
यांणी (यांनीं), पृ. ३३२
जाचें (ज्याचें), पृ. ३८८, ओ. १६.

'स्थ' जुन्या काळीं 'स्छ' असा लिहिण्याची लकब होती. हें माहीत नसल्यामुळें या संपादकानें तें 'च्छ' असें लिहिलें आहे ! पहा–

" ते स्वच्छपणानें (स्वस्छपणानें) सुख भोगितात." 'शतपत्रें,' पृ. २४६; 'लोकहितवादीकृत निबंधसंग्रह' (१८६६) पृ. १५५.

'ग्रंथ' या विषयावर आपण सर्वज्ञ व अधिकारी म्हणवून, ज्याच्या त्याच्यावर निरर्गल शेरे आणि ताशेरे झाडणाऱ्या या गृहस्थाला ग्रंथाला पृष्ठें किती आहेत, हें बरोबर सांगण्याची साधी गोष्ट माहीत नाहीं! हा गृहस्थ 'साधनें'त 'लोकहितवादीकृत निबंधसंग्रह' या ग्रंथांचीं पृष्ठें देतो– "५८८." 'नवभारतां'त पृष्ठें नमूद करतो– "६८ + ५८८." आणि प्रत्यक्षांत पुस्तकाचीं पृष्ठें आहेत "१२+२+७२+५८८"! (शिवाय दोन फोटोचीं).

माझ्या पुस्तकांत सेलूटिक (सेल्टिक), नाउगौड (नाडगौड), दिंदी (बिंदी) असे जे चुकीचे शब्द सांपडतात, ते मुळांतील चूकदेखील तशीच ठेवण्याच्या आग्रहामुळें राहिले नसून ते केवळ मुद्रणदोष (misprints) आहेत. मूळ ग्रंथांत कंसांत दाखविल्या-प्रमाणें शब्द आहेत. माझ्या दृष्टिदोषामुळें हें एवढें पुस्तक छापून घेण्याची जबाबदारी पत्करण्यास मी उत्सुक नव्हतों, आणि "अनवधानानें कांहीं मुद्रणदोष राहिले असणें अशक्य नाहीं," असें मीं संपादकीय निवेदनांत स्पष्टपणें नमूद केलें आहे.

'नवभारतां'तील परीक्षणांत ५८ या एकाच पृष्ठावर पहिल्या कॉलमांत 'रूपराम'च्या जागीं 'रूपाराम' आणि दुसऱ्या कॉलमांतील सवा-दीड ओळीच्या उताऱ्यांत 'जाणत' बद्दल 'जाणीत' असे मुद्रणदोष आहेत. यावरून अशा चुका कशा होतात, हें कळण्या-सारखें आहे. 'ताडस' 'गांज', 'सराद' असे शब्द मूळांत आहेत हें खरें; परंतु ते शब्द परक्या भाषांतील किंवा मला अपरिचित अशा संगीतशास्त्रांतील असल्या-मुळें मुळांतील मुद्रणदोषांकडे माझें लक्ष गेलें नाहीं. त्या मुद्रणाच्या चुका जर माझ्या लक्षांत आल्या असत्या, तर त्या शुद्ध केल्या असत्या, किंवा काटकोन कंसांत दुरुस्त्या दाखविल्या असत्या.

'आशिरवाद', 'सिंव्हगड', 'परवती', 'अडंद', 'आउध' अशीं रूपें त्या काळच्या उच्चारानुसार कायम ठेवणेंच श्रेयस्कर. तीं आजच्या प्रमाण-भाषेप्रमाणें बदलून घेण्याची मला मुळींच गरज वाटत नाहीं.

'धर्मसुधारणा' या निबंधांत सोळा सूचना सांगतांना, "चवथें आणि चौथा असा एकच 'आंकडा' चुकून दोनदा आला म्हणून शेवटी १५ वा 'आंकडा' आला," असें टीकाकार लिहितो; पण लोकहितवादींच्या या लिखाणांत 'आंकडा' नाहींच मुळीं! आहेत ते अंक-वाचक शब्द. अशाच गफलती लोकहितवादींनीं आणखीही केल्या आहेत. पत्र नं. ६४ पहा. 'शाक्त-मार्ग' (पत्र नं. ६) या निबंधांत नव्या उमेदवारास या वाममार्गांत प्रवेश देतांना "आठ स्त्रिया एक एक वेगळाले जातीची असावी," असें म्हटलें आहे, आणि ज्या जाती निर्दिष्ट केल्या, त्या भरतात सात! यावर या विद्वान संपादकानें खुलाशादाखल टीप दिली नाहीं. अशा चुका किंवा हस्तदोष वाचकांच्या सहज लक्षांत येतात. त्या जशाच्या तशा ठेवण्यांत कांहीं बिघडलें नाहीं.

"त्यावेळीं (म्हणजे लोकहितवादींच्या काळीं) 'छेदक' पाडण्याची सोय रूढ नव्हती," असें एक अज्ञानमूलक, असत्य व अत्यंत धाष्टर्याचें विधान या परीक्षणलेखकानें केलेलें आहे! त्या काळीं छेदक पाडण्याची प्रथा रूढ होती, इतकेंच नव्हे तर स्वतः लोकहितवादींच्याच इतर ग्रंथांतही छेदक पाडलेले आढळतील. फार काय, प्रस्तुत निबंधसंग्रहांतही छेदक पाडलेले अनेक निबंध आहेत. या टीकाकाराच्या मर्जी-प्रमाणें ते नसतील! छेदक पाडण्याच्या बाबतींत कांहीं तत्त्व व तारतम्य पाळावें लागतें. उंसाचे हात हात लांबीचे जसे तुकडे पाडतात तसे कसेतरी तुकडे पाडले म्हणजे झालें नाहीं. 'शतपत्रां'च्या संपादकानें जे छेदक पाडले आहेत, ते पाहिले असतां हसूं येतें. त्यानें पाडलेले कित्येक छेदक 'परंतु', 'आणि', 'कारण' अशा शब्दांनीं सुरू होतात, तर 'दोन वाक्यांना जोडणारें' 'व' अव्यय अजीबात गाळूनही ते दुसऱ्या वाक्यापासून नवा प्यारा सुरू करतात! (पृ० ४३)

'साधनें'च्या अंकांत हा टीकाकार लिहितो,

"नव्या पिढीच्या वाचकांना टीपांची सोबत पावलो-पावली हवी. असे हे जुने पुराणे लिखाण. पण श्री. प्रियोळकरांना हे ठाऊक नाही असे नाही. त्यांनी सर्व योजना हेतू पुरःसरच केली असेल. **आपण त्यांच्या हेतूबद्दल तर्क करीत बसू या.**"

माझ्या या बाबतींतील हेतूबद्दल तर्क करीत बसण्याचें मीं कोणाला कारणच ठेवलेलें नाहीं. माझा हेतु मीं स्पष्टपणें माझ्या संपादकीय निवेदनांत सांगून टाकला आहे. तो असा—

"हा ग्रंथ लहानसा असता तर कठीण शब्दांचा कोश व अर्थनिर्णायक टीपा दिल्या असत्या. तसेंच लोकहितवादींनीं दिलेल्या माहितींत जे दोष किंवा ज्या उणिवा असतील, त्या अलीकडील अद्ययावत् ग्रंथांच्या आधारानें जरूर तर त्या त्या विषयावरील तज्ज्ञांची मदत घेऊन दाखविल्या असत्या; पण पृष्ठसंख्या वाढेल या भीतीनें तसें करतां आलें नाहीं. विस्तृत सूचीही देतां आली असती, पण तीही वरील कारणामुळें देणें शक्य झालें नाहीं."

'नवभारतां'तील लेखांतही "निबंधसंग्रहास जागोजागी टीपा पाहिजे होत्या," आणि "लोकहितवादींच्या लिखाणात काही विपर्यस्त माहिती आली—तर ती दुरुस्त करणारी टीप लिहिणें आवश्यक होतें. नाहींतर इतका "अज्ञानी इतिहास लिहिणारे" म्हणून नववाचकांची लोकहितवादीबद्दल समजूत झाली, तर तिची जबाबदारी कुणाची ?" असें लिहून लोकहितवादींच्या बदनामीबद्दल या टीकाकारानें मला जबाबदार धरलें आहे !

टीकाकाराप्रमाणें "जडज–जज्ज; न्यायाधीश (Judge); शाबिती केली– सिद्ध केलें; पटविलें" (पृ. ५४), अशा मासल्याच्या प्रगाढ विद्वत्तापूर्ण (!) टीपा देऊन, 'किंकरान्त' (मूळ 'किंकरांत') (पृ. १४३), 'निधूत', (पृ. ३७३,) 'हाडकपाळी' (पृ. ३२२) असे सर्वसाधारण वाचकाला अपरिचित असलेले शब्द टाळावयाचे किंवा "भूगूल– ??" (पृ. ६९), "ध्यंगोमी– ??" (पृ. १११) अशीं, कठीण शब्दांपुढें दोन प्रश्नचिन्हें घालावयाचीं, अशा टीपा मला जमल्या नसत्या !

टीपालेखनाची आणखी एक अजब युक्ति या संपादकाकडे आहे. ती म्हणजे टीपा द्यावयाची तो शब्दच मुळीं बदलावयाचा ! लोकहितवादींच्या ५२ नंबराच्या मूळ पत्रांत शेवटी 'उमाऊन' असा शब्द आहे, तो शब्द 'गमावून' असा बदलून (पृ. ४३१) 'उमाऊन'चा अर्थ देण्याची पंचाईत त्यानें टाळली आहे !

या संपादकानें जर थोडेंसें डोकें वापरलें असतें, आणि मराठी व संस्कृत कोश जरा उघडले असते, तर वर दिलेल्या 'किंकरांत', किंवा 'निधूत' किंवा 'हाडकपाळी' अशा अपरिचित शब्दांचे अर्थ त्याला सहज देतां आले असते; पण इतरांचें उणें पाहाण्यांत आणि टर उडविण्यांत डोकें खर्च झालें, आणि कोश पहाण्याचे तर त्याला कष्ट करावयाला नकोत ! जेव्हां अर्थ लावण्यांत आपलें डोकें चालत नाहीं, आणि कोशांतही तो सांपडत नाहीं, तेव्हांच शब्दापुढें किंवा त्याच्या अर्थापुढें प्रश्नचिन्ह घालावयाचें असतें. पुढील टीप पहा :—

"पोटिस्त अन्यायानें खाल्लेला पैसा (?)" पृ० ८९. या अर्थापुढें प्रश्नचिन्ह घातलें त्यावरून हा अर्थ त्याने अजमासानें दिलेला दिसतो ! पण 'पोटिस्त' (किंवा 'पोटस्त') याचा अर्थ मोल्स्वर्थ देतो :— "Any indirect (esp. as illicit) or indeterminate or subsidiary means of subsistence;" etc. यावरून या सर्वज्ञ संपादकाला कोश पाहण्याची सवय नाहीं, हें उघड होतें !

माझ्या इच्छेप्रमाणें लोकहितवादींच्या पुस्तकास अद्ययावत् माहितीसह टीपा द्यावयाच्या आणि सूचि जोडावयाची म्हणजे आणखीं दोनतीनशें पृष्ठें सहज वाढलीं असतीं, आणि तसें केलें असतें तरीही, "लोकहितवादींच्या चुका दाखवून त्यांना बदनाम केलें, मग असे त्यांचे सदोष लेख छापलेच कशाला ?" असेंही 'मुखमस्तीति वक्तव्यम्' या न्यायानें टीकाकारास बोलतां आलें असतें ! मृदंगास दोनही बाजूंनीं थप्पड देतां येते ! ! सरकारी अनुदान न मिळाल्यास, या ग्रंथाची किंमत, आहे त्या स्थितींत, चाळीस रुपये ठेवावी लागली असती, असें प्रकाशकानें आपल्या निवेदनांत म्हटलेंच आहे. अनुदान न मिळतें आणि टीपा, सूचि वगैरे दिल्यास पृष्ठसंख्या वाढून किंमतीचा आंकडा पन्नास-साठ रुपयांपर्यंत गेला असता. अनुदान मिळतें असें कळल्यावर आरंभींचा चरित्रविषयक निबंध मीं जरा वाढूं दिला. नाहींतर त्याकरितां चार-आठांपेक्षां मीं जास्त पृष्ठें दिलीं नसतीं.

बाकी या ग्रंथाची किंमत साठपाउणशेंपर्यंत वाढली असती, तरी या टीकाकाराला जादा खर्च मुळींच

पडला नसता. आतां मिळाली तितक्याच ( म्हणजे शून्य ) खर्चांत या ग्रंथाची प्रत त्याच्या पदरांत पडली असती ! कारण ' ग्रंथश्च मे फुकटश्च मे ' हा रुद्राध्याय त्याला पाठ आहे ! पण इतर वाचकांना जास्त पैसे मोजावे लागणार, याची मला काळजी होती.

मला बदनाम करण्याचा या टीकाकाराचा हा पहिलाच उद्योग नाहीं. १९५८ सालीं ज्यावेळीं मीं संपादन केलेली ' नवनीता 'ची शतसांवत्सरिक ( १८ वी ) आवृत्ति प्रसिद्ध झाली, त्यावेळीं या गृहस्थाला तें पाहावलें नाहीं. हें पुस्तक सरकारनें कोणत्याही वृत्तपत्राकडे अभिप्रायार्थ पाठविलें नसतांही या महाभागानें मुंबईच्या 'आलमगीर' पत्रांत अत्यंत अज्ञानमूलक आणि खोडसाळ लेख लिहून परीक्षणाच्या सदरांत तो छापून आणला ! पुढें कांहीं दिवसांनीं त्या पत्राचे संपादक दिवाळी-अंकाकरितां माझ्या घरीं लेख मागावयास आले. त्यांना मीं विचारलें,

" तुम्हांला माझा लेख पाहिजे आणि माझी नालस्तीही करावयास पाहिजे, हीं दोनही कामें एकाच वेळीं कशीं होतील ?"

" तुमची नालस्ती कोणी केली ? " संपादक विस्मित होऊन म्हणाले. मीं त्यांच्या हातांत त्यांच्या पत्राचा अंक दिला.

" हें त्या ...... चें काम ! " त्यांच्या तोंडून नकळत शब्द बाहेर पडले.

" तुम्हांला माझा लेख पाहिजेच असेल, तर ' नवनीता'च्या माझ्या आवृत्तीवर आतांपर्यंत असेच मूर्खपणाचे किंवा खोडसाळपणाचे आक्षेप जे घेण्यांत आले, त्या सर्वांना एकाच लेखांत उत्तर देतों आणि तो लेख तुम्हांला दिवाळी अंकासाठीं देतों. " मीं म्हणालों.

" अवश्य द्या. प्रसिद्ध करतों. " ते बोलले.

हा लेख १९५८ सालच्या 'आलमगीर'च्या दिवाळी अंकांत प्रसिद्ध झाला, आणि पुढें तो, माझ्या ' प्रिय आणि अप्रिय ' या निबंधसंग्रहांत ( १९६५ ) पुनर्मुद्रित करण्यांत आला आहे. जिज्ञासूंनीं तो पाहिल्यास त्यांची शंकानिवृत्ति होईल.

परीक्षणाच्या आरंभीं लोकहितवादींच्या ' निबंधसंग्रहा'च्या संपादनामुळें आपणास समानधर्मा ( अशा माणसानें मला ' समानधर्मा ' म्हणावें, यापरतें माझें दुर्दैव कोणतें ? ) लाभला, याबद्दल पूतनेप्रमाणें आपल्या परीक्षणलेखाच्या आरंभीं त्यानें " अपूर्व समाधान " व्यक्त केलें आहे; आणि लेखाच्या शेवटीं तो लिहितो, " एकंदरीनें पहाता ही निबंधसंग्रहाची शतसांवत्सरिक आवृत्ती काढताना संपादकांनी जे व्रत [ मूळाप्रमाणें शक्यतोवर छापण्याचें ] आपणावर लादून घेतले, त्याने वाचकांची सोय साधली नाही, निबंधवाचनाने होणारा लाभ पुष्कळ अंशी कमी झाला, **मुख्य म्हणजे लोकहितवादीवर मोठा अन्याय घडला** "...

आणि वर वर्णन केल्याप्रमाणें या संपादकानें ' शतपत्रे ' छापून लोकहितवादींच्या लिखाणांत जी घाण आणि गोंधळ केला, तो लोकहितवादींवर न्याय झाला !

न्याय-अन्याय कोणी केला, हें सांगण्यास लोकहितवादी कांहीं स्वर्गांतून भूतलावर खालीं उतरत नाहींत; पण या बाबतींत न्याय-अन्याय ठरविण्याची तारतम्य बुद्धि महाराष्ट्रांत जिवंत असलेल्या माणसांतून अद्यापि नष्ट झालेली नाहीं, असा मला विश्वास वाटतो; पण तसें स्पष्ट सांगण्याचें सौजन्य व धैर्य आपल्या लोकांमध्यें आहे कीं काय, याबद्दल मात्र मला जबर शंका आहे. ( तसें केल्यास हा भस्मासुर हात उचलून आपल्या मागें लागला तर ! )

प्रकाशकास 'भाग्या' नें त्यास योग्य संपादक मिळाला, आणि संपादकास त्याच्या ' भाग्या'नें " शक्यतोवर मूळाप्रमाणें छापणाचा " हट्ट पुरविणारे मुद्रक-प्रकाशक लाभले" हें पाहाण्याचा प्रसंग यावा, हें या टीकाकाराचें केवढें बरें दुर्भाग्य ! ही पोटदुखी साधा ' ओवा ' खाऊन बरी होणारी नाहीं. दोनतीन साप्ताहिक-मासिकांमध्यें आपल्या पोटदुखीस कारण झालेल्या पुस्तकाविरुद्ध ' ओव्या ' छापून आणल्या, म्हणजेच आराम वाटावयाचा !

परमेश्वरा ! या त्रस्त माणसाच्या चित्तास शांति दे !

## वीस वर्षानंतर मानवी हक्क

१९६८ हे मानवीहक्क वर्ष म्हणून पाळले जात आहे. त्याबद्दल उत्सवापेक्षा आत्मपरीक्षणाची गरज जास्त आहे असे वाटते. तीस मुद्यांची मानवीहक्क-सनद १९४८ साली संयुक्तराष्ट्र संघटनेने घोषित केली. ज्या ध्येयवादी माणसांनी ही सनद तयार केली त्यांनी पुढील पिढीला एका धाडशी नव्या जगाचे स्वप्न दाखवले होते. पण आजच्या वातावरणात ते स्वप्न साकार झाल्याचे दिसत नाही. पण दुसऱ्या बाजूस वाटले होते तेवढे उदासीन वातावरणही निर्माण झालेले दिसत नाही. शीतयुद्ध थंड झाले असले तरी ते केव्हाही गरम होऊ शकेल. व्हिएटनाममध्ये मानवीहक्क शाबूत आहेत, किंवा कोणत्याही हुकूमशाही राष्ट्रात त्याची पायमल्ली होत नाही हे म्हणणे मानभावी ठरेल. ॲपर-थीडने उभी केलेली गोरी शक्ती भयंकर मोठी काळी-शक्ती निर्माण करीत आहे. मानवीहक्काबद्दल बोलण्या-सारखे वातावरणसुद्धा नाही असे तत्त्वज्ञान्यांना वाट-ल्यास नवल ते काय ? बेंथहॅम सारखे तत्त्वज्ञ तर 'मानवी हक्क एक थोतांड' असे म्हणण्यास तयार आहेत. आपण भ्रातृभावी समाजरचनेकडे आगेकूच करीत आहोत असा उच्च, उदात्त गैरसमज करून घेणे मात्र सर्वस्वी चूक ठरणार आहे. ही सनद म्हणजे मान-वाच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. शिखर अजून खूप उंच, दूर आहे. चढण कठीण आहे पण दिशा स्पष्ट झाली आहे. त्यातही ही सनद सर्वांनीच मान्य केलेली नाही, हा रस्ता सर्वांना पसंत नाही. पण बहुसंख्य राष्ट्रांनी ही सनद मान्य केली आहे; त्यात सुसंस्कृत मानवाची मूल्ये अभिप्रेत केली आहेत. मानवतावाद्यांनी ही मूल्ये अगोदरच आपली म्हटली आहेत. त्यांचेकरता ही सनद म्हणजे प्रत्यक्षात आणा-वयाचा कार्यक्रम आहे.

ब्रिटनमध्ये स्त्रियांना समान हक्क मिळावेत म्हणून कमिटी स्थापन झाली आहे. वांशिक कायदा महत्त्वाचा असला तरी दुय्यम दर्जाच्या नागरिकांचे बाबतीत त्याने भागण्यासारखे नाही. स्त्री-पुरुष भेदाभेद बरवर नाहीसा झाल्यासारखा दिसत असला तरी त्यातील खाचखळगे कायम आहेत. रशिया या बाबतीत सर्वांचे पुढे असला तरी इतर बाबतीत अगदीच पाठीमागे आहे. ब्रिटनमध्ये बहुतेक ठिकाणी बायकांचे वेतन कमी असून त्यांना चांगल्या नोकऱ्या मिळणे जड जात आहे. इतर राष्ट्रांतही हीच परिस्थिती आहे. त्यामुळे मानवतावाद्यांनी या बाबतीत लक्ष घालावयास पाहिजे.

दि ह्युमॅनिस्ट, लंडन, फेब्रुवारी १९६८

## अमेरिकन्सच्या परीक्षेची वेळ

गेल्या आठवड्यात शांततावादी अमेरिकन्सनी आशेचा परमोच्च बिंदू गाठला व त्याच आठवड्याचे शेवटी घडलेल्या घटनेने त्यांना राष्ट्रीय पातळीवर हिंसेच्या गर्तेत लोटून दिले. इतिहासात अशा तऱ्हेच्या घटना क्वचितच घडतात. अध्यक्ष जॉन्सन यांनी आशियात शांतता स्थापण्यासाठी चढाव धोरण आखले व त्याच्या पूर्ततेसाठी व्हिएटनाममधील युद्ध सम-झोत्याने मिटविण्याचे धोरण जाहीर केले. आपल्या शांततेच्या धोरणाला नैतिक पाठिंबा म्हणून आपण आगामी अध्यक्षीय निवडणुकीतून निवृत्त होणार असेही त्यांनी जाहीर केले. सर्वांच्या आशांना मोहोर फुटला. पण आठवडा संपण्याच्या आतच मेंफिसमध्ये काळ्या-गोऱ्यांच्या लढ्यात अहिंसेचा पुरस्कार करणाऱ्या, निग्रोसमाजाच्या रास्त मागण्यांना व त्यांच्या आशा-आकांक्षांना शांततेच्या मार्गाने वाचा फोडणाऱ्या अमेरिकेच्या नैतिक पुढाऱ्याचा, मार्टिन ल्युथर किंग याचा खून झाला. केवढा हा दैवदुर्विलास !

गेल्या आठवड्यातील घटनात सापडलेल्या व्यक्तींच्या जीवनास सोफोक्लिअन शोकान्तिकेचा घाट होता. जगातील सर्वात मोठा बलशाली नेता लिंडन जॉन्सन, जागतिक शांततेकरता सत्तात्याग करतो तर शांततेच्या मार्गाने अमेरिकेतील सामाजिक प्रश्न सोडवू पहाणारा सत्याग्रही वीर बंदुकीच्या गोळीला बळी पडून अमेरि-केत वांशिक युद्धाचे वातावरण निर्माण होते ! पण हे दोघेही नेते त्यांच्या जीवनाच्या शेवटी, कधीही झाले नव्हते एवढे मोठे झाले. त्यांच्या जीवनात त्यांना गाठता आली नव्हती एवढी उदात्तता व भव्यता मिळवून गेले. मार्टिन ल्युथर किंग बलिदानामुळे निग्रोंचा अमर नेता झाला तर सत्तात्याग करून वांशिक समस्या सोडविण्याकरता लागणारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नैतिक नेतृत्व जॉन्सनला मिळाले.

**इस्टर बाजार:–** किंगच्या खुनानंतर जॉन्सनने आपला हवाईला जाण्याचा बेत बदलला. ६२ मोठ्या शहरात दंगे धोपे व जाळपोळीला सुरवात झाली, लुटालुटीला ऊत आला. अनेकांनी आपला इस्टरचा बाजारहाट फुकटात करून घेतला, निग्रो वस्त्यांनाच अनेक ठिकाणी आगी लावण्यात आल्या. वाशिंग्टनच्या बाजारातून धुराचे लोट निघाले तर लिंकनच्या स्मारकासमोरील चेरीची सुंदर फुले जळून खाक झाली. याच स्मारकासमोर आपले काळया गोऱ्यांच्या सामाजिक सलोख्याचे व संवादित समाजाचे चित्र किंगने रंगवले होते. व्हाईटहाऊसच्या जवळ जवळ पर्यंत आगीचे लोळ पसरले. शिकागोत निग्रोंनी आपल्या वस्त्या बेचिराख केल्या व अनेकांना बेघर केले. हार्लेमचा मेअर जॉन लिंडसे शांतता प्रस्थापित करण्याकरता शहरातून पायी फिरला पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही.

**लज्जास्पद वर्तणूक :** नागरी अधिकाऱ्यांनी काही ठिकाणी तातडीची उपाययोजना केल्यामुळे दंगल आटोक्यात आली. मिशिगनला ९००० नॅशनल गार्डस्ना पहारा करावयास लावले तर डिट्रायटच्या मेयरने संध्याकाळ ते सकाळपर्यंत कर्फ्यू जारी केली. वॉशिंग्टनमध्ये व शिकागोला २५००० सैनिकांना गस्त घालावी लागली. दुसऱ्याही अनेक शहरातून आणीबाणीचे उपाय जारी करण्यात आले. अध्यक्ष जॉन्सन यांनी ' डॉ. किंग यांना ज्या हिंसक रीतीने मारले त्या हिंसा मार्गापासून परावृत्त होण्याची मी प्रत्येक नागरिकास विनंती करीत आहे. ' अशी विनंती नभोवाणीवरून केली. उपाध्यक्ष हंफ्रे म्हणाले " की आतापर्यंत कायदा व सुरक्षितता यांच्यावर विश्वास असलेल्या या राष्ट्राला काय झाले आहे ? या राष्ट्राने आपल्या अध्यक्षाचा निर्घृण खून केला, आपल्या नैतिक नेत्यांचे पण खून पाडले तर मानवी हक्काकरता झगडणारांना मारपीट करून मारून टाकले. माझ्या अमेरिकन बांधवांनो असे पुन्हा कधीही होऊ देणार नाही, असा आता तरी निश्चय करा. "

या दुःखाच्या व स्वतः केलेल्या गुन्ह्याच्या जाणिवेच्या वातावरणात दोन्ही वंशाच्या जनतेत समझोता होण्याची शक्यता जास्त आहे असे वाटते. आपण स्वतः सत्तात्याग करणार हे सांगतांना अध्यक्ष जेवढे गंभीर झाले नव्हते तेवढे गांभीर्य काँग्रेसची बैठक घोषित करताना त्यांच्या चेहऱ्यावर दिसले. वांशिक प्रश्न मोडतोड व जाळपोळ न करता सर्जनशीलतेला आव्हान देऊन कसा सोडवता येईल याबद्दल अध्यक्ष जॉन्सन या बैठकीत चर्चा करणार आहेत.

मार्टिन ल्युथर किंगच्या मृत्युबद्दल नुसता शोक करीत बसण्यात अर्थ नाही असेच जॉन्सन यांना सुचवावयाचे आहे. अध्यक्ष केनडी यांच्या मृत्युप्रमाणेच या मृत्युबद्दल प्रायश्चित्त घेतले पाहिजे. त्या मृत्यूला कारणीभूत झालेली परिस्थिती बदलली पाहिजे; ही गोष्ट अमेरिकन नागरिकांचे गळी उतरविण्याचा अध्यक्ष जॉन्सन यांचा प्रयत्न जोरात सुरू झाला आहे. अमेरिकन समाज जास्त चांगला कसा होईल याची त्यांना चिंता वाटत आहे.

– टाईम, १२-४-६८.

## न पडलेला दुष्काळ

बिहारच्या दुष्काळाचे काय झाले ? थोडक्यात उत्तर– बिहारमध्ये दुष्काळ पडलाच नव्हता. दोन वर्षी लागोपाठ झालेल्या अवर्षणाने तीन पंचमांश पिके वाळून गेली होती. १९४३ साली झालेल्या बंगालच्या दुष्काळात तीस लक्ष माणसे मृत्युमुखी पडली. तेव्हाही हीच परिस्थिती निर्माण झाली होती. गेल्या वर्षीच्या उन्हाळयात ६० टक्क्यांची अन्नधान्याची कमतरता बिहारमध्ये निर्माण झाली. अवर्षण, कोरड्या विहिरी, पसरणारी रोगराई यांच्या जोडीला हावरेपणा व कार्यक्षमतेचा अभाव असलेली शासनव्यवस्था या सर्वांची परिणती महासंकटात झाल्यास नवल ते काय ? उन्हाळयातील रखरखत्या उन्हात पिण्याचे पाणी व अन्नधान्य संपल्यानंतर सामुदायिक प्रमाणात होणारी उपासमार थांबवणे कठीण झाले.

पण प्रत्यक्षात उपासमार झाली नाही. बिहार किंवा तेथील रिलीफ यांच्यापेक्षाही इतर दृष्टीने याची कारणे महत्त्वाची व लक्षात ठेवण्यासारखी आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मदतीचे योग्य प्रमाणात झालेले मिश्रण व कार्य करताना दिसून आलेले सहकार्य यामुळे एका अत्यंत मागसलेल्या, ग्रामीण भागात नवचैतन्य निर्माण करता येते याचा प्रत्यय बिहार मध्ये आला.

अमेरिकेच्या नेतृत्वाखाली आंतरराष्ट्रीय मदत वेळेवर आली. कमी भावात तातडीने अन्नधान्य व

जीवनोपयोगी वस्तू पाठवण्यात आल्या. भारतात येणारी एकपंचमांश अन्नधान्य मदत १९६७ साली बिहारमध्ये पोचवण्यात आली. या दोन लक्ष टनाचे वाटपही 'फेअर प्राइस' दुकानातून वा म्हाताऱ्या व पंगु माणसांना बक्षीस म्हणून करण्यात आले. गरजूंना दर दिवशी ४ ते ८ औंसापर्यंत धान्य ५ पेन्सना (४० पैसे) १ रत्तल या भावात मिळू शकत होते. या व्यतिरिक्त अनेक संस्थांनी निरनिराळ्या जीवनोपयोगी वस्तू व खाद्यपेये फुकट वाटली. जयप्रकाश नारायण यांच्या बिहार रिलीफ कमिटीने सबंध भारतातून मदत व कार्यकर्ते गोळा केले. लक्षावधी लोकांना या व अशाच अनेक संस्थांनी फुकट जेवणे घातली. केअर या अमेरिकन संस्थेने ५ लक्ष गरोदर स्त्रिया व मुले यांच्या दुपारच्या जेवणाची व्यवस्था केली. कमीत कमी दरात जेवण मिळण्याची सर्वत्र सोय करण्यात आली.

## सुधारणेच्या वाटेवर शेती

येवढे करूनही काही लोक निःसत्त्व आहाराच्या परिणामाने डिसेन्ट्री, टायफाइड, टायफस, व अपुऱ्या दिवसांची प्रसूती यांना बळी पडले. अनेक वेळा कर्मचाऱ्यांवर भ्रष्टाचाराचा, कार्यक्षमतेच्या अभावाचा आरोप करण्यात आला; परंतु सर्वसाधारण परिस्थिती मात्र त्याला दुजोरा देत नाही, असे म्हणावे लागेल. आहाराबद्दल बोलावयाचे झाल्यास बिहारची एक तृतियांश लोकसंख्या खालच्या जमातींची असून नेहमीच निकृष्ट आहार घेत आलेली आहे. त्यामुळे परिस्थितीत जरासा बिघाड झाला तरी ही जनता भुकी राहू लागते. यातील लक्षावधी लोकांनी आयुष्यात पहिल्यानेच चांगले जेवण दुष्काळाचे वेळी घेतले असेल! कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेबद्दल बोलावयाचे तर ५ कोटी लोकसंख्येतील ४ कोटी लोक दुष्काळात सापडले होते. त्यातील जवळ जवळ १·२५ कोटी भूकबळी होण्याच्या मार्गावर होते. येवढ्या मोठ्या कार्यात कुचराई झाली असती तर काय भयंकर परिस्थिती निर्माण झाली असती याचा विचार करावा. चुकार व अकार्यक्षम कर्मचाऱ्यांना काही ठिकाणी शिक्षा करावी लागली; काही वेळा त्यांच्या बदल्याही केल्या. जास्त बिकट परिस्थिती असलेल्या जिल्ह्यातून लहान लहान ऑफिसर्सना निर्णय घेण्याची सत्ता देण्यात आली. त्यामुळे दिरंगाईचा प्रश्न कमी झाला. त्यांनी कर्ज देणे, तगाई देणे, काम करणाऱ्या अनेक संस्थांना एकमेकाशी जोडणे इत्यादी कामे चोख केली. शासनसंस्था कार्यक्षम बनल्यामुळे अनेक कामे चटकन् व व्यवस्थित झाली. गोळा झालेली राष्ट्रीय व परराष्ट्रीय मदत विशेष नासधूस न होता उपयोगी पडली. स्थानिक शेतीत तर क्रान्ती घडून आली असे म्हणावे लागेल. पाणीपुरवठा सुधारण्याकरता अनेक योजना आखण्यात आल्या; हाती घेण्यात आल्या. पाण्याचे साठे शोधण्याचा उपक्रम सुरू झाला. लहानसहान पाटबंधाऱ्यांची कामे इतक्या निकडीने सुरू झाली की तीन पंचवार्षिक योजनात खोदले गेले नाहीत एवढे कालवे एका वर्षात तयार झाले. त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी पाण्याचे पंप बसविण्यात आले असून जवळजवळ १२०० नव्या नलिका विहिरी खोदण्यात आल्या. पूर्वीच्या १५ वर्षांत १००० विहिरी खोदल्या गेल्या होत्या. त्या बरोबरच शेतीला बांध घालणे, जमीन सपाट करणे, तिच्यातून पाणी काढून घेणे, जुने तलाव दुरुस्त करणे, ओढ्या-नाल्यांचा उपयोग करून घेणे इत्यादि अनेक गोष्टी झपाट्याने झाल्या.

पाणी शोधणाऱ्या अनेक तुकड्यांना जमिनीखाली १० पासून तीस फुटापर्यंत पाण्याचे प्रचंड साठे छोटा नागपूरमध्ये सापडले. तर भयंकर दुष्काळी जिल्हा गया, त्यातील नवाडा भागात १०००० एकर जमीन भिजवू शकेल इतका प्रचंड पाण्याचा साठा जमिनीखाली सापडला आहे. १९६७ च्या दुष्काळाने हा साठा वापरण्यास लागणारी साधने उपलब्ध करून दिली आहेत. बिहारी लोक त्यांचा सतत उपयोग करतील का?

या प्रश्नाचे उत्तर नुसत्या बिहारमध्ये शोधून उपयोगी नाही. भारतीय शेती, उत्पादनवाढीच्या काठावर उभी आहे. नव्या पद्धती, नवे बियाणे, नवा उत्साह सर्वांची सांगड घातली जाऊन कोट्यवधी अर्धपोटी लोकांचा अन्नाचा प्रश्न सुटण्याची शक्यता स्पष्ट दिसत आहे. बिहारमध्ये एवढा प्रचंड दुष्काळ पडला असतानाच पूर्णिया जिल्ह्यात २ लक्ष एकर पडित जमीन लागवडीखाली आणली गेली. कोसी नदीच्या कालव्यामुळे ते शक्य झाले. भारतात अनेक ठिकाणी नवे बियाणे व खते वापरून उत्पादन कल्पनेच्या बाहेर

वाढवल्याची उदाहरणे दृष्टीस पडत आहेत. पाच वर्षा-पूर्वी ही गोष्ट खरीही वाटली नसती.

बिहारचा दुष्काळ हटवताना दर्शविलेला उत्साह व कामसूपणा व बाहेरील थोडीशी मदत यांच्या साहाय्याने परिस्थितीत विशेषतः शेतीमध्ये क्रान्तिकारक बदल घडवून आणणे शक्य आहे असे वाटू लागले आहे. नाही तरी बाह्य मदत कमी कमी होत चाललेली दिसतच आहे.

– दि इकॉनॉमिस्ट, लंडन १३–४–६८.

## तीस राष्ट्रांचे मानवी हक्काबद्दलचे परीक्षण :

मानवी हक्कांचे संरक्षण करण्याचे असल्यास कुटुंब-नियोजनांची चळवळ सर्वत्र सुरू झाल्याखेरीज यश मिळणे शक्य नाही, या तऱ्हेची घोषणा संयुक्तराष्ट्र-संघाच्या वतीने ११ डिसेंबर १९६७ साली झालेल्या समारंभाचे वेळी जगातील तीस राष्ट्रांनी केली.

संयुक्त राष्ट्र संघटणेचे सरचिटणीस यु थांट म्हणाले की, "कुटुंब हे समाजाचे नैसर्गिक व मूलभूत मानक आहे, ही गोष्ट मानवी हक्काच्या जागतिक सनदेने मान्य केली आहे. त्यामुळे या कुटुंबाचा व्याप किती मोठा असावा हे त्या कुटुंबानेच ठरवावे हे साहजिकच आहे. परंतु आपल्या कुटुंबाचा आकार ठरविताना आपल्याला तो पाहिजे तेवढा ठेवण्याच्या सर्व सोई उपलब्ध आहेत याची जाणीव व माहिती जर प्रत्येक कुटुंबाला नसेल तर तो हक्क अमलात आणणे अशक्य होईल म्हणून प्रत्येक कुटुंबाला, कुटुंब नियोजनाच्या उपलब्ध साधनांची माहिती मिळणे व त्याचा योग्य उपयोग कसा करावा हे समजणे आवश्यक आहे." कोलंबियाचे प्रतिनिधी डॉ. जुलिओ सिझर, तुर्बे आयला यांच्या म्हणण्याप्रमाणे भरमसाट वाढणारी लोकसंख्या हे आपल्या जगाचे खरे दुखणे आहे. 'कुटुंब नियोजनाच्या साधनांचा प्रसार सामाजिक नीतिमत्ता धुळीस मिळवील हे खरे नसून अत्यंत गर्दीने व गचडीने जीवन जगण्याने समाजाच्या आरोग्यावर भयंकर परिणाम होत असून त्यामुळे आपला समाज नासून जाण्याची भीती निर्माण झाली आहे' असे त्यांनी प्रतिपादिले. 'गचडीने रहाण्यामुळे स्त्रीपुरुषांना एकत्र रहावयास भाग पाडणे, त्यातून निर्माण होणारे लैंगिक गुन्हे, लैंगिक शिक्षणाचा अभाव, लहान मुलांची गुलामगिरी, सहजासहजी केले जाणारे गर्भपात, व निशापाणी केल्याच्या बेहोषीत घातलेला लैंगिक धिंगाणा ही सर्व लोकसंख्येच्या स्फोटाची फळे आहेत."

ब्रिटनचे प्रतिनिधी लॉर्ड कार्डन आपल्या भाषणात म्हणाले की, 'आपण आतापर्यंत पुष्कळ वेळ दवडला आहे. तो कसा भरून काढावा याचा विचार व्हावयास पाहिजे. आज आकडेशास्त्राने मानवी दुःखाबद्दल आपले डोळे उघडले आहेत. दारिद्र्य, अज्ञान, व रोगराई यांचेबरोबरच द्वेष व भीती यांचे वातावरण या वाढत्या लोकसंख्येने जगात निर्माण केले आहे. आज जर हा प्रश्न आपण डावलला तर कोणताही प्रश्न सोडवण्यात आपल्याला यश येणार नाही. मानवी हक्कांच्या झेंड्याखाली सर्वांनी एकत्र येऊन ही मानवाची चाललेली धूळधाण थांबविली पाहिजे, त्याच्या व्यक्ति-मत्त्वाची, लोकसंख्यावाढीने होणारी पायमल्ली थांबविली पाहिजे."

या घोषणेवर आस्ट्रेलिया, बार्बाडॉस, डेन्मार्क, डोमिनिकन रिपब्लिक, घाना, इंडोनेशिया, इराण, जपान, जॉर्डन, नेदरलॅण्डस, न्युझिलंड, नॉर्वे, पाकिस्तान, फिलिपाईन्स, थायलंड, त्रिनिदाद, टोबॅगो, अमेरिका, ब्रिटन, कोलंबिया, फिनलंड, इंडिया, द. कोरिया, मेलेशिया, मोरक्को, नेपाळ, सिंगापूर, स्वीडन, युनायटेड अरेबिक रिपब्लिक, ट्युनिशिया व युगोस्लाव्हिया यांच्या सह्या आहेत.

– इंटरनॅशनल प्लॅंड पेरेंटहूड न्यूज,
लंडन फेब्रुवारी १९६८